
## ।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

## श्रीमच्छम्भुनृपविरचितम् बुधभूषणम्

## (धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांनी रचलेले बुधभूषण)





श्रीगणेशाय नमः ॥ श्रीनृसिंहाय नमः ॥ देवदानवकृतस्तुतिभाग्यदलया
[illegible]
यानुसार गिरिराजकन्यका सा ममास्तु शुभकामालिका ॥ ५ ॥ सर्वदे
वमयी [illegible] यस्याः कटाक्षमात्रेण जायंते विबुधा

**धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांचे हस्ताक्षर**

**(मूळ बुधभूषणम् ग्रंथ प्रथम पृष्ठ)**

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

**प्रस्तावना**

बुधभूषण हा ग्रंथ संभाजी महाराजांच्या राजनैतिक विचारांचे प्रतिबिंब आहे. एकूणच शिवकालीन राजनीतीचा अनमोल ठेवा म्हणजे हा ग्रंथ आहे. या ग्रंथात एकूण तीन अध्याय आणि सुमारे साडेआठशे श्लोक आहेत. पहिला अध्याय उपोद्घात आहे. दुसरा अध्याय आहे राजनीति आणि तिसरा अध्याय आहे प्रकीर्णनीति.

या ग्रंथातील काही श्लोक संभाजी महाराजांनी स्वतः रचलेले आहेत तर काही श्लोक त्यांनी अन्य संस्कृत ग्रंथांमधून संकलीत केलेले आहेत. यांत महाभारत, रामायण, कामंदकीय नीतिसार, याज्ञवल्क्यस्मृति, चाणक्यनीति, मनुस्मृति इत्यादी ग्रंथातील अनेक श्लोक जसेच्या तसे घेतले आहेत.

संभाजी महाराजांनी हा ग्रंथ वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी लिहिला आहे. संभाजी महाराजांची प्रतिभा आणि विद्वत्ता या दोन्ही गुणांची ओळख हा ग्रंथ वाचताना प्रत्येक पानावर होते.

या ग्रंथाचा विषयच मुळात राजनीति म्हणजे राजकारण हा आहे. इतक्या लहान वयात देखील संभाजी महाराजांची राजनैतिक दृष्टी किती व्यापक आणि प्रगल्भ होती हे सुद्धा या ग्रंथाच्या अध्ययनाने आपल्या ध्यानात येते. राजकारण हा शब्द आज आपण ज्या अर्थाने वापरतो तो संभाजी महाराजांना अभिप्रेत नाही. राष्ट्राच्या, धर्माच्या आणि स्वजनांच्या हिताचे राजकारण त्यांना अभिप्रेत आहे. त्यामुळेच आजच्या काळात देखील राजकारणातील प्रत्येक व्यक्तीने हा ग्रंथ अवश्य अभ्यासला पाहिजे असे मला नेहमी वाटते. शालेय अभ्यासक्रमांत या ग्रंथातील निवडक श्लोकांचा समावेश व्हावा असेही मला नेहमी वाटते.

या ग्रंथातील तत्वांचा प्रभाव ज्याच्यावर असेल तो व्यसन, व्यभिचार, भ्रष्टाचार, अनैतिकता, स्वार्थ, निष्काळजीपणा, दुराचार इत्यादी दुर्गुणांपासून निश्चितच स्वतःला दूर ठेवेल. या ग्रंथातील विचार आत्मसात केल्यास शौर्य, धैर्य, साहस, राष्ट्रभक्ती, धर्मभक्ती, पौरुष, पराक्रम, परोपकार आणि ईश्वरभक्ती हे सद्गुण वाचकांच्या ठायी नक्की निर्माण होतील असा मला विश्वास वाटतो.

राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करण्यासाठी हा ग्रंथ एक प्रभावी साधन आहे. संभाजी महाराजांच्या विचारांचे, विद्वत्तेचे आणि प्रतिभेचे प्रभावी प्रकटीकरण या ग्रंथात झाले आहे. सध्या चालू असलेल्या धर्मवीर छत्रपति श्रीसंभाजी महाराज बलिदान मासाच्या निमित्ताने या ग्रंथाचे सामूहिक अध्ययन करण्याचा हा एक प्रयत्न आहे. धर्मवीर छत्रपति श्रीसंभाजीमहाराज आणि श्री गुरुजींच्या कृपेने हा उपक्रम अपेक्षित राष्ट्रहीत नक्की साधेल ही दृढ श्रद्धा माझ्या मनीं आहे.

पराशर प्रकाशराव मोने
श्रीशिवप्रतिष्ठान हिन्दुस्थान
फाल्गुन वद्य १
श्रीशिवराज्याभिषेक शक ३४४

**।। राष्ट्रांत निर्मू अवघ्या श्रीशिवसूर्यजाळं ।।**

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

**श्रीमच्छम्भुनृपविरचितम् बुधभूषणम्**

**।। श्री गणेशाय नमः ।।**

**।। श्री नृसिंहाय नमः ।।**

**अध्याय १**

**श्लोक क्र १**

**देवदानवकृतस्तुतिभागं हेलया विजितदर्पितनागम्।**
**भक्तविघ्नहनने धृतरयत्नं तं नमामि भवबालकरत्नं नमामि।।**

अर्थ~आपल्या हिन्दु धर्मामध्ये कोणत्याही शुभकार्याचा प्रारंभ श्रीगणेशाचे आणि कुलदेवतेचे पूजन करूनच केला जातो. धर्मवीर छत्रपति श्री संभाजी महाराजांनी देखील याच प्रथेला अनुसरून आपल्या "बुधभूषण" या राजनीती विषयक ग्रंथाची सुरुवात श्रीगणपती आणि श्रीनरसिंह या देवतांना नमन करून केलेली आहे.

श्रीगणेशाला वंदन करताना संभाजी महाराज म्हणतात- "ज्यांची स्तुती देव आणि दानव(राक्षस) हे दोघेही करतात, ज्यांनी मदोन्मत्त हत्तीला अगदी सहज शांत केले, जे भक्तांची विघ्ने नष्ट करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात, अशा भगवान शंकरांचे पराक्रमी पुत्र असणाऱ्या गणपतीला मी वंदन करतो."

**श्लोक क्र २**

**शशांकमौलिं भसितेन भासुरं पंचाननं शैलसुताधिनाथम्।**
**त्र्यक्षम् गिरीशं दशबाहुमंडितं कुबेरमित्रं सततं नमामि।।**

अर्थ~ज्यांच्या मस्तकावर चंद्र आहे, शरीराला भस्म लावल्यामुळे जे पांढरे शुभ्र दिसतात, ज्यांना पाच मुखे आहेत, जे हिमालयाची कन्या पार्वती हिचे पती आहेत, ज्यांना तीन नेत्र आहेत, जे पर्वतांचे स्वामी आहेत, ज्यांनी दशदिशा व्यापल्या आहेत आणि जे कुबेराचे मित्र आहेत अशा भगवान श्रीशंकरांना मी(धर्मवीर श्रीशंभूछत्रपती) नेहमी वंदन करतो.

आपल्या ग्रंथाची सुरुवात करताना शंभूराजांनी गणपती आणि शंकर या देवतांना वंदन केले आहे. यावरून संभाजी महाराज हे परम ईश्वरनिष्ठ होते हे सहज ध्यानात येते.

।। राष्ट्रांत निर्मू अवघ्या श्रीशिवसूर्यजाळं ।।

**अध्याय १**

**श्लोक क्र ३**

**विरिंचीविष्णुवंदितं नगाधिराजकन्यका-**
**विभूषितार्धविग्रहं प्रभूतबंदिसंस्तुतम्।**
**लसज्जटातटस्फुरत्सुरापगाविनिःसर-**
**द्विशुद्धवारिशीतलं नमामि चंद्रशेखरम्।।**

या श्लोकात सुद्धा शंभूराजांनी भगवान महादेव यांची स्तुती केलेली आहे.

ब्रह्मदेव आणि विष्णू हे देखील भगवान शंकरांना वंदन करतात. महादेवांच्या शरीराचा अर्धा भाग हा हिमालयकन्या माता पार्वती यांनी विभूषित केलेला आहे(म्हणूनच महादेवांना अर्धनारीनटेश्वर म्हणतात). अशा भगवान शंकराची स्तुती अनेक भाट-चारण करतात, त्यांच्या जटांमधून भागीरथी गंगा नदी वाहते. या गंगेचे शुद्ध जल त्यांच्या शरीरावरुन वाहत असल्याने त्यांचे शरीर शीतल झालेले असते. अशा त्या चंद्रमौळी(भाळी चंद्र धारण करणाऱ्या) शंकरांना मी(संभाजी महाराज) भक्तीने वंदन करतो.

**श्लोक क्र ४**

**अज्ञानकृष्णसर्पेण दंशिता भुवि मानवः।**
**तेषां जीवनहेत्वर्थम् नौमि जांगुलिकं गुरुम्।।**

हिन्दु संस्कृतीमध्ये गुरूला ईश्वराचे स्थान देण्यात आलेले आहे. म्हणूनच या ग्रंथाच्या आरंभी संभाजी महाराजांनी श्रीशंकरांच्या रूपातील सद्गुरूंना वंदन केले आहे.

अज्ञानरुपी काळ्या सापाने या भूतलावरील ज्या मानवांना दंश केला आहे, जे ज्ञानचक्षूंच्या अभावाने ज्ञानांध झालेले आहेत, त्यांना ज्ञानाच्या रूपाने नवे जीवन प्राप्त व्हावे म्हणून समग्र जगताचे गुरू असणाऱ्या श्रीशंकरांना मी वंदन करतो(वास्तविक जांगुलिक म्हणजे गारुडी अथवा सर्पगुरु. गारुडी जसे सापांना वश करतो तसेच भगवान शंकर हे या अज्ञानरुपी सर्पांना नियंत्रणात ठेवतात असा भावार्थ अभिप्रेत आहे.)

**श्लोक क्र ५**
**या भवेक्षणचकोरचंद्रिका शाम्भवी निजजनस्य पालिका।**
**या तुषारगिरिराजकन्यका सा ममास्तु शुभकालमालिका।।**

या श्लोकात माता पार्वती देवींची स्तुती केली आहे.

शंकरांचा नेत्ररूपी चंद्राच्या चांदण्यामुळे जिच्या नेत्ररूपी चकोराला आनंद मिळतो, जी शिवपत्नी असून सर्व भक्तगणांचे रक्षण करते, जी हिमालयाची म्हणजेच पर्वतराजाची कन्या आहे ती श्रीपार्वतीदेवी माझ्यासाठी कल्याणाची, शुभकाळाची मालिकाच बनून राहो(म्हणजेच श्रीपार्वतीमातेची कृपा सदैव माझ्यावर राहो).

या सर्व श्लोकांतून संभाजी महाराजांच्या ठायीं ईश्वराच्या प्रति दृढ श्रद्धा वसत होती हे प्रकर्षाने जाणवते. महाराष्ट्रातील सर्वच संतांनी अगदी अशाच प्रकारे त्यांच्या ग्रंथांच्या प्रारंभी भगवंताचे आशीर्वाद घेतलेले आहेत.

**अध्याय १**
**श्लोक क्र ६**
**सर्वदेवमयीमीशां नौमि भूषासमान्विताम्।**
**यस्याः कटाक्षमात्रेण जायन्ते विबुधा नरा।।**

अर्थ~जिच्या केवळ नेत्रकटाक्षानेच माणसे बुद्धिमान(सुज्ञ) होतात अशा सर्व देवतांमध्ये स्थित असणाऱ्या आणि विविध अलंकारांनी विभूषित अशा शक्तीस्वरूप दुर्गेला(म्हणजेच श्रीशिवपत्नी ईशादेवींना) मी(म्हणजेच छत्रपती श्रीशंभूराजे) वंदन करतो.

**श्लोक क्र ७**
**भोसलेवंशजस्तुति**
**भृशबलान्वयसिन्धुसुधाकरः प्रथितकीर्तिरुदारपराक्रमः।**
**अभवदर्थकलासु विशारदो जगति शाहनृपा क्षितिवासवः।।**

या श्लोकात संभाजी महाराजांनी आपल्या कुळाचे आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. ग्रंथकर्त्याने आपल्या कुळाचा आणि पूर्वजांचा परिचय ग्रंथाच्या आरंभी करण्याची पद्धतच आहे. त्याला अनुसरूनच संभाजी महाराजांनी या श्लोकात आपल्या भोसले घराण्याच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.

अत्यंत सामर्थ्यवान आणि सेनापतित्वाचा वारसा लाभलेल्या भोसले घराण्यात महापराक्रमी असे शहाजी महाराज होऊन गेले. शहाजी महाराज हे जणू पृथ्वीवरील इंद्रच होते. त्यांचा पराक्रम, कीर्ति आणि उदारता सर्वत्र विख्यात झालेली होती. अर्थसंपादन आणि राजनीति यांसह ते अनेक कलांमध्ये पारंगत बनले होते.

**श्लोक क्र ८**

**येनाकर्णविकृष्टकार्मुकचलत्कांडावलिकर्तित-**
**प्रत्यर्थिक्षितिपालमौलिनिवहैरभ्यर्चि विश्वंभरा।**
**यस्यानेकवसुंधरापरिवृढप्रोत्तुंगचुडामणे**
**पुत्रत्वं समुपागतः शिव इति ख्यातः पुरणो विभु।।**

आकर्ण(म्हणजे कानापर्यंत) ताणलेल्या धनुष्यातून श्रीशहाजी महाराज हे बाणांचा वर्षाव करीत असत. शत्रुराजांच्या कापलेल्या मुंडक्यांच्या राशींनी पृथ्वीची पूजा केली होती. पृथ्वीवर राज्य केलेल्या अनेक राजांचे मुकुटमणी म्हणून शहाजीमहाराज शोभत होते. अशा शहाजीमहाराजांच्या पोटी, सर्वव्यापी परमेश्वराचे अवतार भासणारे असे महाकीर्तिमान पुत्र जन्माला आले. ते शिवाजी या नावाने जगात कीर्तिस प्राप्त झाले.

**श्लोक क्र ९**

**कलिकालभुजंगावलीढं निखिलं धर्ममवेक्ष्य विक्लवं यः।**
**जगतः पतिरंशतोवतापो(तीर्ण) स शिवच्छत्रपतिर्जयत्यजेयः।।**

या श्लोकात संभाजी महाराजांनी आपले वडीलांची म्हणजेच शिवाजी महाराजांची स्तुती केली आहे.

या पृथ्वीवर धर्माला कालिकालरूपी सर्पाने ग्रासलेले आहे. हे पाहून अत्यंत व्याकुळ झालेल्या जगदीश्वराने (म्हणजेच भगवान विष्णूने) पृथ्वीवर अवतार घेतला. तो अवतार म्हणजेच अजिंक्य असे श्रीशिवछत्रपती सदैव विजयी होवोत.

**अध्याय १**

**श्लोक क्र ९**

**कलिकालभुजंगावलीढं निखिलं धर्ममवेक्ष्य विक्लवं यः।**
**जगतः पतिरंशतोवतापो(तीर्ण) स शिवच्छत्रपतिर्जयत्यजेयः।।**

या श्लोकात संभाजी महाराजांनी आपले वडीलांची म्हणजेच शिवाजी महाराजांची स्तुती केली आहे.

या पृथ्वीवर धर्माला कालिकालरूपी सर्पाने ग्रासलेले आहे. हे पाहून अत्यंत व्याकुळ झालेल्या जगदीश्वराने (म्हणजेच भगवान विष्णूने) पृथ्वीवर अवतार घेतला. तो अवतार म्हणजेच अजिंक्य असे श्रीशिवछत्रपती सदैव विजयी होवोत.

**श्लोक क्र १०**
**येन क्षोणितले कलावविकले बुद्धावतारं गते।**
**गोपालेखिलवर्णधर्मनिचये म्लेंच्छे समासादिते।**
**भूयस्तत्परिपालनाय सकलांजित्वा सुरद्वेषिणाः**
**स्वे स्वे वर्णपथे चिरेण विहिता विप्रादिवर्णाः क्रमात्।।**

या अवनीवर कलियुग पूर्णतः अवतरले होते. बुद्धावतार समाप्त झाला होता. सर्व धर्माचा स्वामी असणारे भगवान श्रीकृष्णांनी देखील त्यांचा अवतार संपवला होता. म्लेंच्छानी सर्वत्र काहूर माजवले होते. अशा भीषण परिस्थितीमध्ये देवाधर्माचा द्वेष करणाऱ्या सर्व शत्रूंना जिंकून पृथ्वीवर पुन्हा धर्माचे रक्षण करण्याच्या हेतूने त्यांनी(म्हणजे श्रीशिवछत्रपतींनी) विद्वज्जनांसह सर्व लोकांना आपापल्या कर्तव्यपूर्तीच्या मार्गाला लावले.

शिवाजी महाराजांनी त्यांच्या जीवनात धर्मरक्षणाचे महान कार्य केले असे खुद्द त्यांचेच सुपुत्र श्रीशंभूराजे आपल्या बुधभूषण या ग्रंथात लिहितात.

कथित फुरोगाम्यांना संभाजी महाराजांचे हे लिखाण मान्य होईल काय?

**अध्याय १**
**श्लोक क्र ६**
**सर्वदेवमयीमीशां नौमि भूषासमान्विताम्।**
**यस्याः कटाक्षमात्रेण जायन्ते विबुधा नरा।।**

अर्थ~जिच्या केवळ नेत्रकटाक्षानेच माणसे बुद्धिमान(सुज्ञ) होतात अशा सर्व देवतांमध्ये स्थित असणाऱ्या आणि विविध अलंकारांनी विभूषित अशा शक्तीस्वरूप दुर्गेला(म्हणजेच श्रीशिवपत्नी ईशादेवींना) मी(म्हणजेच छत्रपती श्रीशंभूराजे) वंदन करतो.

**श्लोक क्र ७**

**भोसलेवंशजस्तुति**

**भृशबलान्वयसिन्धुसुधाकरः प्रथितकीर्तिरुदारपराक्रमः।**
**अभवदर्थकलासु विशारदो जगति शाहनृपा क्षितिवासवः।।**

या श्लोकात संभाजी महाराजांनी आपल्या कुळाचे आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. ग्रंथकर्त्याने आपल्या कुळाचा आणि पूर्वजांचा परिचय ग्रंथाच्या आरंभी करण्याची पद्धतच आहे. त्याला अनुसरूनच संभाजी महाराजांनी या श्लोकात आपल्या भोसले घराण्याच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.

अत्यंत सामर्थ्यवान आणि सेनापतित्वाचा वारसा लाभलेल्या भोसले घराण्यात महापराक्रमी असे शहाजी महाराज होऊन गेले. शहाजी महाराज हे जणू पृथ्वीवरील इंद्रच होते. त्यांचा पराक्रम, कीर्ति आणि उदारता सर्वत्र विख्यात झालेली होती. अर्थसंपादन आणि राजनीति यांसह ते अनेक कलांमध्ये पारंगत बनले होते.

**श्लोक क्र ८**

**येनाकर्णविकृष्टकार्मुकचलत्कांडावलिकर्तित-**
**प्रत्यर्थिक्षितिपालमौलिनिवहैरभ्यर्चि विश्वंभरा।**
**यस्यानेकवसुंधरापरिवृढप्रोतुंगचुडामणे**
**पुत्रत्वं समुपागतः शिव इति ख्यातः पुरणो विभु।।**

आकर्ण(म्हणजे कानापर्यंत) ताणलेल्या धनुष्यातून श्रीशहाजी महाराज हे बाणांचा वर्षाव करीत असत. शत्रुराजांच्या कापलेल्या मुंडक्यांच्या राशींनी पृथ्वीची पूजा केली होती. पृथ्वीवर राज्य केलेल्या अनेक राजांचे मुकुटमणी म्हणून शहाजीमहाराज शोभत होते. अशा शहाजीमहाराजांच्या पोटी, सर्वव्यापी परमेश्वराचे अवतार भासणारे असे महाकीर्तिमान पुत्र जन्माला आले. ते शिवाजी या नावाने जगात कीर्तिस प्राप्त झाले.

**अध्याय १**

**श्लोक क्र ११**

**आकर्णाटकदेशतो गिरिवरे सह्योपसह्ये परै-**
**दुर्गाणि क्षितिपालनाय नृपतेर्यो बागलाणावधि।**
**आकृष्णातटमासमुद्रमभितः कृत्वा  कृती दुर्गमे**
**दुर्गे रायरिसंज्ञकेविजयते भूमीभृतामग्रणीः।।**

कर्नाटक देशापासून ते बागलाण देशापर्यंत पसरलेल्या सह्याद्रीच्या उत्तुंग पर्वतरांगांमध्ये शत्रूंना जिंकायला अभेद्य असे अनेक दुर्ग त्यांनी(शिवाजी महाराजांनी) बांधले. पृथ्वीचे रक्षण करणे हाच यामागील उद्देश होता. त्यांनी कृष्णा नदीच्या काठापासून ते समुद्रापर्यंत अनेक जलदुर्ग देखील बांधले. सदैव विजयी होणारे आणि अनेक राज्यांमध्ये अग्रेसर असणारे असे छत्रपती शिवाजी महाराज रायरीच्या गडावर(रायगडावर) राहिले.

**श्लोक क्र १२**
**आपूर्वाचलपश्चिमाम्बुधिमथाप्यासेतुशीताचलं**
**निर्जित्यावनिमंडलं च करदीकृत्याखिलांभूमिपान्।**
**श्रौतं धर्ममवाप्य सद्भिरुदितं राजाभिषेके परं**
**छत्राद्यैर्नृपलक्षणैरनुदिनं सिंहासने राजते।।**

पूर्वेकडील पर्वतांपासून ते पश्चिमेकडच्या समुद्रापर्यंत, तसेच रामेश्वरच्या सेतूपासून ते हिमालयापर्यंत असलेल्या अनेक राजांना त्यांनी(शिवाजी महाराजांनी) जिंकले. या सर्व राजांकडून त्यांनी खंडणी घेतली. सज्जनांनी घालून दिलेल्या श्रौत(श्रुति म्हणजे वेद... अर्थात श्रौत म्हणजे वैदिक) धर्माचा अवलंब करून शिवाजी महाराजांनी स्वतःचा राजाभिषेक करवून घेतला. छत्र-चामरांकित *सुवर्ण सिंहासनावर* ते प्रतिदिन शोभून दिसू लागले.

हे दोन्ही श्लोक संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांच्या म्हणजेच शिवाजी महाराजांच्या स्तुतिपर लिहिले आहेत. या श्लोकांत शिवाजी महाराज हे वेदप्रणित हिंदू धर्माचा अवलंब करत होते असे स्पष्ट प्रतिपादन संभाजीमहाराजांनी केले आहे. शिवाजी महाराजांनी स्वतःचा राजाभिषेक देखील वैदिक पद्धतीने केला हे सुद्धा यातून स्पष्ट होते. तसेच बुधभूषण हा ग्रंथ राजाभिषेकाच्या नंतर लिहिला गेला आहे हे सुद्धा या श्लोकाद्वारे सिद्ध होते. राजाभिषेक समयी संभाजी महाराजांचे वय सोळा वर्षे होते.

शिवाजी महाराजांना निधर्मी/पुरोगामी/सेक्युलर ठरवण्याची धडपड किती व्यर्थ आहे हे देखील या श्लोकांतून ध्यानात येते.

**अध्याय १**
**श्लोक क्र १३**
**नानादेशसमागतान् द्विजवरान्येनाभिषेकोत्सवे।**
**संतर्प्यातुलतोलितैर्बहुधनैर्वस्त्रैर्गजैर्वाजिभि:**
**कीर्ति: सर्वदिगंतरेषु जयिना विस्तारिता भूभृता।।**

छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या राजाभिषेक समयीं वेगवेगळ्या अनेक देशांतून(प्रांतांतून) जे विद्वान लोक आलेले होते त्यांना वजन, माप अथवा मोजदाद न करताच विपुल धन देऊन, तसेच वस्त्रे, हत्ती, घोडे यांचेही दान करून श्रीशिवछत्रपतींनी संतुष्ट केले. चंद्रबिंबापासून विमल आणि शुभ्र अशा चांदण्याचा प्रसार सर्व भूतलावर व्हावा त्याप्रमाणे त्या विजयी शिवरायांनी चतुर भाटगणांकडून(शाहिरांकडून) आपल्या कीर्तिचा सर्व दिशांना विस्तार करविला.

**रायगडवर्णन**

**श्लोक क्र १४**

**सोयं यस्य गडो नरेन्द्रवहितैः प्रासादहर्म्यैरट्टे**
**म्यरापपा(रम्यैरापण) चत्वरैश्च परितः पूर्णः सरोभिर्नवैः।**
**विद्वद्वैदिकवैद्यवर्यगणकै राद्यैश्च सन्मन्त्रिभिः।**
**सैन्यैश्चापि चतुर्विधैरगणितैर्भाति प्रतापान्वितैः।।**

या श्लोकात शंभूराजांनी रायगडाचे वर्णन केले आहे. ग्रंथकर्ता ज्या स्थानी ग्रंथरचना करतो त्या स्थानाचे वर्णन करण्याचा प्रघात पूर्वीपासून चालत आलेला आहे.

अर्थ~अशा त्या श्रीशिवछत्रपतींच्या दुर्गाभोवती राजप्रासाद, राजमहाल आणि राजभवने आहेत, ज्यांत राजे लोक राहतात. तेथे उत्तुंग भवने(वास्तू) आणि सुंदर बाजारपेठा असणारे चौक आहेत. सभोवती नवीन बांधलेली आणि पाण्याने तुडुंब भरलेली तळी-सरोवरे आहेत. त्या गडावर(रायगडावर) विद्वान, पंडित, वैदिक(वेदांचे जाणकार), श्रेष्ठ वैद्य, उत्कृष्ठ दर्जाचे आणि पूर्वापार काम करणारे(अनुभवी) हुशार मंत्री, चतुरंग दले(चार प्रकारची दले- रथदल, गजदल, अश्वदल आणि पायदळ) आणि ज्यांच्या पराक्रमाला सीमा नाही असे अनेक वीर वास्तव्य करतात. या लोकांच्या वास्तव्याने हा रायगड शोभायमान झाला आहे.

संभाजी महाराजांनी केलेले दुर्गराज श्रीरायगडाचे हे वर्णन वाचताना प्रत्यक्ष रायगड डोळ्यासमोर उभा राहिला नाही तरच नवल!

**अध्याय १**

**श्लोक क्र १५**

**आत्मगौरव**

**तस्यात्मजः शंभुरिति प्रसिध्दः समस्तसामंतशिरोवसंतः।**
**यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदंडविद्यार्णवपारगामी।।**

या श्लोकात संभाजी महाराजांनी स्वतःचा परिचय करून दिला आहे.

त्यांना(म्हणजे शिवाजी महाराजांना) "शंभू" नावाचे, आपल्या कीर्तीने विख्यात झालेले एक सुपुत्र आहेत. ते सर्व सामंतांच्या(राजांच्या) मस्तकावरील अलंकार(तुरा) आहेत(जसा वसंत ऋतू हा सर्व ऋतूंत श्रेष्ठ आहे तसेच शंभूराजे या सर्व सामंतांचे मुकुटमणी आहेत). काव्य, साहित्य, पुराणे, संगीत, धनुर्विद्या या सर्व विद्या त्यांनी उत्तमरीत्या आत्मसात केलेल्या आहेत.

**श्लोक क्र १६**

**विविच्य शास्त्राणि पुरतनानामादाय तेभ्य: खलु सोयमर्थम्।**
**करोति सद्ग्रंथममुं नृपाल: स शम्भुवर्मा बुधभूषणाख्यम्।।**

प्राचीन विद्वानांनी, जाणकारांनी अनुभवांती सिद्ध केलेल्या शास्त्रांचे विवेचन करून, त्यातून योग्य तो अर्थबोध घेऊन आम्ही(श्रीशम्भुवर्मा म्हणजे संभाजी महाराज) हा बुधभूषण नावाचा प्रस्तुत महत्वाचा ग्रंथ लिहिला आहे.

बुध म्हणजे देव अथवा क्षत्रिय राजा. पूर्वीच्या काळी राजाला ईश्वराचा अवतार मानायची पद्धत होती. "बुधभूषण" म्हणजे "क्षत्रिय राजांचे भूषण". क्षत्रिय राजांना राजनीति या शास्त्राची माहिती देणारा ग्रंथ म्हणजे बुधभूषण.

**अध्याय १**

**श्लोक क्र १७**

**विविच्य संतः कृतिमस्मदीयां गृह्णन्तु सच्चासदसच्च त्यजन्तु।**
**क्षीरावियुक्तं परिहृत्य नीरं क्षीरं भजन्ते खलु राजहंसा:।।**

(संभाजी महाराज या प्रस्तावनेत म्हणतात,)आमच्या या ग्रंथाचे परिशीलन करून जाणत्या लोकांनी म्हणजेच विद्वज्जनांनी त्यातील सत् अंश स्वीकारावा आणि असत् अंशाचा त्याग करावा. राजहंस जसे दूध आणि पाणी एकत्र केले असेल तर त्यातील पाणी वेगळे करून दूध तेवढे ग्रहण करतो त्याप्रमाणे सर्व विद्वाजनांना संभाजी महाराज सांगत आहेत की नीर-क्षीर विवेक न्यायाला अनुसरून या ग्रंथाचे अध्ययन करावे.

**अध्याय १**

**श्लोक क्र १८**

**भवान्या: स्तुति:**

**(निर्विघ्नसमाप्तये श्रीभवान्या: स्तुतिं स्वकृतामाह)**

या बुधभूषणं ग्रंथाची रचना निर्विघ्नपणे पूर्ण व्हावी यासाठी आम्ही(संभाजी महाराज) श्रीभवानीमातेचे स्तवन करीत आहोत.

**स्फटिकरचितपीठे श्यामलाङ्गी भवानी।**
**मरुणचरणकांतिं भासयन्तीं स्वरूपम्।**
**नखमणिगुणतयुक्ता अङ्गुलीर्भासयन्तीं।**
**विजितसितगरुद्भिर्नूपुरैर्गुल्फयुग्मम्।।**

भवानी मातेची ही स्तुती म्हणजे संभाजी महाराजांच्या उतुंग प्रतिभेचा विलक्षण अविष्कार आहे.

अर्थ~श्यामलवर्णीय श्रीभवानीदेवी आपल्या स्फटिकाने बनविलेल्या पादपीठावर आपले लालसर चरण असलेले स्वरूप प्रकट केले आहे. नखरूपी मणि आणि रत्नांच्या गुणांनी युक्त असलेल्या तिच्या पायाच्या बोटांनी, अत्यंत पांढरेशुभ्र पंख असणाऱ्या हंस पक्ष्यांना सुद्धा पराभूत केले आहे. या दैदीप्यमान अशा नुपूरांनी तिच्या दोन्ही पायांचे घोटे प्रकाशित झाला आहेत.

**श्लोक क्र १९**

**पद्मरागारुणश्रीकशिर:पुष्पेण शोभिताम्।**
**हृतशीतांशुतेजस्कमुक्ताचंद्रोपशोभिताम्।।**

अर्थ~पद्मराग मण्याच्या कांतीप्रमाणे लालसर रंग असलेली तांबूस केशरपुष्पे तिने(श्रीभवानीदेवीने) आपल्या विपुल केशसंभारात खोचल्यामुळे ती(श्रीभवानीदेवी) अत्यंत सुंदर दिसत आहे. चंद्राची कांती ज्यांनी हरण केली आहे अशा त्या मोती आणि मण्यांमुळे तसेच श्रीमहादेवांच्या मस्तकी विराजमान असणाऱ्या चंद्रामुळे ती श्रीभवानीदेवी शोभून दिसते आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र २२**

**विलसद्भालतिलकां मुक्तागुणसमान्विताम्।**
**विभासद्रत्नसंयुक्तां कर्णभूषणशोभिताम्।।**

बुधभूषण ग्रंथाच्या पहिल्या अध्यायातील श्लोक क्र १८ ते २८ हे अकरा श्लोक म्हणजे संभाजी महाराजांनी रचलेले भवानी स्तोत्र आहे. या अकरा श्लोकांमधून शंभूराजांनी श्रीभवानीमातेची मनोभावे स्तुती केलेली आहे. यातून त्यांच्या मनातील भवानीमातेविषयी असलेली दृढ भक्ती प्रतीत होते.

वर दिलेल्या श्लोकांत संभाजी महाराज भवानीमातेच्या अत्यंत मोहक रूपाचे वर्णन करत आहेत.

अर्थ~तिच्या(म्हणजेच श्रीभवानीमातेच्या) कपाळावरील रक्तिम(लालबुंद) कुंकुमतिलक शोभून दिसत आहे. या भवानीने मोत्यांची माळ गळ्यात परिधान केलेली आहे. तिचे शरीर चमचमणाऱ्या आणि तेजाने झळाळणाऱ्या रत्नांनी अलंकृत झालेले आहे. तिच्या कानाची पाळी कर्णभूषणांनी सुशोभित झालेली आहेत.

**श्लोक क्र २८**

**इति चन्द्रचूडरमणीस्तुतिमेणा-**
**धरणीशशम्भुरचितामतिभक्त्या।**
**मनुज: पठेदनुदिनं स किलोच्चै-**
**र्भुवि भारतीजलधिजानिलयं स्यात्।।**

अर्थ~चंद्रचूड म्हणजे शिव. चंद्रचूडरमणी म्हणजे शिवपत्नी म्हणजेच श्रीभवानी. या भवानीचे हे स्तोत्र या धरणीचे भूपाल(म्हणजे छत्रपती) श्रीशंभुराजे यांनी टोकाच्या भक्तीभावनेने लिहिले आहे. जो कोणी हे श्रीभवानीस्तोत्र नित्यनेमाने(प्रतिदिन) पठण करील, त्याला जलधि-जा म्हणजेच समुद्राची कन्या अर्थात श्रीलक्ष्मीदेवी आणि श्रीभारती म्हणजेच सरस्वतीदेवी या दोघींच्या दरबारात(निलय) उच्च स्थान प्राप्त होईल.
शंभुराजांनी या श्लोकांत माता श्रीसरस्वतीदेवींना भारती या नावाने संबोधले आहे. भा म्हणचे प्रकाश. अर्थातच ज्ञानाचा प्रकाश. भारती म्हणजे ज्ञानाच्या प्रकाशात आकंठ बुडालेली. आपल्या ज्ञानाच्या प्रकाशाने सर्व भूमंडळ तेजाने उजळून टाकणारी देवी म्हणजे भारती अर्थात सरस्वती.

हा श्लोक म्हणजे धर्मवीर शंभुराजांनी लिहिलेल्या श्रीभवानीस्तुतीची फलश्रुतीच आहे. स्तोत्राच्या अखेरच्या श्लोकांत फलश्रुती लिहिण्याचा प्रघात हिन्दु धर्मातील स्तोत्रवाङमयात नेहमी आढळतो. इथेही त्याचेच प्रत्यंतर येते.

**अध्याय १**

**श्लोक क्र ३७**

**नवनीलमेघरुचिरः पुर: पुमान्।**
**अवनीमवाप्य धृतगोपविग्रह:।।**
**नवनीतकीर्तिरमरैरपि स्वयं।**
**नवनीतभिक्षुरधुना स चिन्त्यते।।**

या श्लोकात धर्मवीर श्रीसंभाजी महाराजांनी भगवान श्रीकृष्णांची स्तुती केलेली आहे.
अर्थ~ते सर्वश्रेष्ठ पुरुष(श्रीकृष्ण) नव्याने आकाशात आलेल्या निळ्या मेघाप्रमाणे(कृष्णवर्ण, नवनील) शोभून दिसतात. पृथ्वीवर येऊन त्यांनी गोपालाचे(गायी पाळणाऱ्याचे) रूप धारण केलेले आहे. त्यांची स्वतःची ख्याती नवनीताप्रमाणे(नवनीत म्हणजे लोणी, लोण्याप्रमाणे स्निग्ध, शुभ्र आणि शुद्ध अशी कीर्ति) सर्वत्र आणि चिरंतन पसरलेली आहे. या लोणी मागणाऱ्याचे(म्हणजेच श्रीकृष्णाचे) चिंतन तर देव सुद्धा करतात.

**श्लोक क्र ३८**

**अतिविपुलं कुचयुगलं**
**रहसि करैरामृशन्मुहुर्लक्ष्म्या।**
**तदपि हृतं निजहृदयं**
**जगति हरिर्मृगयमाण इव।।**

हा श्लोक भगवान श्रीविष्णूंच्या जयजयकार करण्यासाठी लिहिला आहे.

अर्थ~आपले हृदय चोरीला गेलेले आहे, लक्ष्मीमातेच्याच ठायीं ते आहे आणि आपण त्याचा शोध घेत आहोत अशा अविर्भावात श्रीलक्ष्मीमातेकडे त्याचा शोध घेण्यासाठी आलेल्या श्रीविष्णुदेवांचा जयजयकार असो, ते सदैव विजयी होवोत.

या श्लोकांत हरि हा शब्द विष्णू या अर्थाने वापरला आहे. हरि या शब्दाचा आणखी एक अर्थ सिंह असाही आहे. एका शब्दाला अनेक अर्थ आणि अनेक अर्थाचा एकच शब्द हे संस्कृत भाषेचे वैशिष्ठ्य आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र ४१**

**श्रीविष्णुदशावतारवंदन**

**वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते।**
**दैत्यं दारयते बलीं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते।**
**पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते।**
**म्लेंच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः।।**

या श्लोकात धर्मवीर श्रीसंभाजी महाराजांनी भगवान श्रीविष्णुदेवांच्या दहा अवतारांचा उल्लेख करून त्यांना वंदन केला आहे.

संभाजी महाराजांचे आजोबा म्हणजे शहाजी महाराज. जयराम पिंडये नावाच्या एका कवीने शहाजी महाराजांच्या जीवनावर "राधामाधवविलासचम्पू" हा ग्रंथ लिहिला आहे. यात देखील शहाजी महाराजांना माधव म्हणजे श्रीकृष्ण मानूनच ग्रंथाची रचना केलेली आहे.
तसेच कवींद्र परमानंद गोविंद नेवासकर यांनी सुद्धा त्यांच्या "सूर्यवंश" नावाच्या ग्रंथात शिवाजी महाराजांना भगवान विष्णू मानून वर्णन केले आहे.

आता या श्लोकाचा अर्थ जाणून घेऊया.

अर्थ~
१. वेदांचा उद्धार करणारे(मत्स्यावतार),
२. जगताचे वहन करणारे(कूर्मावतार),
३. पृथ्वीचा गोल उद्धरणारे(वराहावतार),
४. दैत्यांचा संहार करणारे(नृसिंहावतार),
५. बळीला शासन करणारे(अद्दल घडवणारे)(वामनावतार),
६. क्षत्रियांचा सत्तेचा क्षय(संकोच) करणारे(परशुराम अवतार),
७. पौलस्त्यांवर(पौलस्ती म्हणजे रावण...छलकपट करणाऱ्याला पण हा शब्द वापरतात) विजय मिळवणारे(श्रीरामावतार),
८. नांगर हाती धारण करणारे(म्हणजे श्रीकृष्ण आणि त्यांचे ज्येष्ठ बंधू बलराम),
९. करुणा या तत्वाचा प्रसार करणारे(बुद्धावतार) आणि
१०. भविष्यात म्लेंच्छांना(म्हणजे यवनांना) मूर्च्छित करणाऱ्या(कल्की अवतार) अशा भगवान श्रीविष्णूंच्या श्रीकृष्णरूपा तुला वंदन असो.

शार्दूलविक्रीडीत वृत्तात रचलेल्या या श्लोकांत संभाजी महाराजांनी आपल्या दिव्य प्रतिभेच्या आधारे भगवान विष्णूंच्या दशावतारांचे अत्यंत सुरेख वर्णन केले आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र ४२**

**तं वंदे पद्मसद्मानमुपवीतच्छटाछलात्।**
**गंगा स्रोतस्त्रयेणैव यं सदैव निषेवते।।**

अनुष्टुभ छंदातील हा श्लोक संभाजी महाराजांनी श्रीब्रह्मदेवांच्या स्तुत्यर्थ लिहिलेला आहे.

यज्ञोपवीताच्या(यज्ञोपवीत म्हणजे जानवे) तीन धाग्यांच्या रूपाने गंगा नदी ज्यांचा आश्रय घेते, ज्यांची सेवा करते अशा त्या पद्मरूपी गृहात(कमळात) वास्तव्य करणाऱ्या श्रीब्रह्मदेवांना मी(छत्रपती संभाजी महाराज) अभिवंदन करतो.

**श्लोक क्र ४३**

**शुकतुंडच्छविसावितुश्चंडरुचे: पुंडरीकवनबंधो:।**
**मंडलमुदितं वंदे कुंडलमाखंडलाशाया:।।**

ही संभाजी महाराजांनी लिहिलेली सूर्यवंदना आहे. सूर्याला आपल्या हिन्दु परंपरेत भगवंताचे स्थान आहे. ऊर्जेचा अखंड स्रोत म्हणजे भगवान श्रीसूर्यनारायण. म्हणूनच आपल्या बुधभूषण ग्रंथाच्या आरंभी सूर्यनारायणाची वंदना संभाजी महाराजांनी केली आहे.

शुक म्हणजे पोपट. शुकतुंड म्हणजे पोपटाचे तोंड म्हणजे चोच. ज्यांचा रंग पोपटाच्या चोचीप्रमाणे लाल आहे, ज्यांचे तेज उग्र आहे, जे कमळाच्या फुलांच्या(सूर्यविकसिनी) वनांचे मित्र आहेत, जे इंद्राच्या दिशेचे(म्हणजे पूर्व दिशेचे)कुंडल म्हणजे कर्णभूषण आहेत अशा श्रीसूर्यनारायणांच्या उगवलेल्या गोलाकार तेजोमंडलास मी(संभाजी महाराज) नमस्कार करतो आहे.

**अध्याय १**
**श्लोक क्र ४५**
**श्रीगणेशवंदना**
**गण्डस्थलीगलदमन्दप्रवाह-**
**माद्यद्द्विरेफमधुरस्वरदत्तकर्णः।**
**हर्षादिवालसनिमीलितनेत्रयुग्मो**
**विघ्नच्छिदे भवतु भूतपतिर्गणेशः।।**

या श्लोकाद्वारे संभाजी महाराजांनी श्रीगणेशाला वंदन केले आहे.

अर्थ~श्रीगजाननांच्या गंडस्थळातून सतत वाहणाऱ्या मदाच्या प्रवाहात त्याचे(मदाचे) सेवन करणारे भुंगे अत्यंत मधुर असा गुंजारव करतात. त्या गुंजारवाचा मधुर स्वर जे कान देऊन ऐकतात आणि त्याच्या श्रवणाने झालेल्या आनंदामुळे जडावलेले(गुंगी आलेले) आपले डोळे अर्धवट मिटून घेतात ते श्रीगणेशजी भूतपती आपल्या सर्वांच्या विघ्नांचा नाश करोत.

**श्लोक क्र ४६**
**श्रीभवानीस्तुती**
**अनुकृतमरकतवर्णा शोभितकर्णा कदम्बमुकुलेन।**
**नखमुखमुखरितवीणा मध्ये क्षीणा शिवा शिवं कुर्यात्।।**

ही श्रीभवानी स्तुती संभाजी महाराजांनी आर्या वृत्तात लिहिली आहे. श्रीभवानी ही भोसले कुलाची कुलस्वामिनी असल्याने या ग्रंथाच्या प्रस्तावनेत भवानीमातेची स्तुती गाणारे अनेक श्लोक संभाजी महाराजांनी रचलेले आहेत.

अर्थ~पाचूच्या हिरव्या वर्णाचे रत्नालंकार जिने परिधान केले आहेत, जिचे कान कदम्बफुलांच्या कळ्यांमुळे शोभून दिसत आहेत. आपल्या नखाग्रांच्या आघाताने जी वीणेच्या तारांमधून निरंतर स्वरझंकार छेडीत असते आणि जिची अंगकाठी अत्यंत बारीक आहे(मध्ये क्षीणा म्हणजे सिंहकटी) अशी ती भगवान श्रीशिवांची पत्नी श्रीभवानी(शिवा) आमचे कल्याण(शिवं) करो.

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

**अध्याय १**

**श्लोक क्र ६१**

**सूर्याची स्तुति**

**सिन्दूरस्पृहया स्पृशन्ति किरणं कुम्भस्थमाधोरणा।**
**भिल्ली पल्लवशङ्कया विचिनुते सान्द्रं द्रुमदाणिषु।।**
**कान्ता: कुंकुमशङ्कया करतले मृद्गन्ति लग्नं च यत्।**
**तत्तेजः प्रथमोद्भवं भवकरं सौरं चिरं पातु वः।।**

शार्दूलविक्रीडीत वृत्तात रचलेल्या या श्लोकात संभाजी महाराजांनी हिन्दु परंपरेत भगवंताचे स्थान लाभलेल्या श्रीसूर्यनारायणाची प्रार्थना केली आहे.

अर्थ~सूर्याचा किरण जर मदोन्मत्त हत्तीच्या गंडस्थळावर पडला तर तो लालबुंद शेंदूराप्रमाणे भासतो आणि माहूत त्यास शेंदूर समजून स्पर्श करतो. तोच सूर्यकिरण जर वृक्षांच्या वनांत पडला तर त्या वृक्षांची पाने कोवळी(पालवी प्रमाणे) भासतात आणि वनातील भिल्लीण त्यास स्पर्श करून तोडू पाहते. हाच सूर्याचा किरण जर सुंदर स्त्रीच्या तळहातावर पडला तर तो केशराप्रमाणे दिसतो आणि ती सुंदरी त्यास चुरगळण्याचा प्रयत्न करते.

असा हा संपूर्ण विश्वाला जागे करणारा, प्रथमच पृथ्वीवर आलेला आणि विश्वाचे कल्याण करणारा सूर्यकिरण तुमचे सदैव रक्षण करो.

**अध्याय १**

**श्लोक क्र ८१**

**मेघस्तुति:**

**शैलेयेषु शिलातलेषु च गिरे: शृङ्गेषु गर्तेषु च।**
**श्रीखण्डेषु बिभीतकेषु परित: पूर्णेषु रिक्तेषु च।**
**स्निग्धेन ध्वनिनाखिलेषु जगतीचक्रे समं वर्ततो।**
**वन्दे वारिद सार्वभौमि भवतो विश्वोपकारि व्रतम्।।**

वारि म्हणजे पाणी. वारिद म्हणजे पाणी देणारे अर्थातच मेघ. या श्लोकांत संभाजी महाराजांनी मेघांना वंदन केले आहे.

हे मेघा, तू पर्वतांवर, पाषाणशीळांवर, पर्वतशिखरांवर तसेच खोल खड्डयांत, चंदनवृक्षांवर तसेच बिबव्याच्या(बेहेड्याच्या) झाडांवर, रिक्त जागी तसेच भरलेल्या जागी अशा सर्वच ठिकाणी एकसारख्याच प्रेमाने, समताबुद्धीने व्यवहार करतोस. अशा तऱ्हेने समत्व बुद्धीने संपूर्ण विश्वाला उपकृत करण्याचे तुझे हे व्रत सार्वभौमत्वाचा(सर्वव्यापकतेचा) आविष्कार आहे. हे मेघा, मी तुला पुन्हा पुन्हा नमस्कार करतो.

**।। राष्ट्रांत निर्मू अवघ्या श्रीशिवसूर्यजाळं ।।**

आपल्या सर्वच संतांनी समत्वाचा नेहमीच पुरस्कार केलेला आहे. त्याचा संभाजी महाराजांच्या वृत्तीवर असलेला प्रभाव या श्लोकाद्वारे जाणवतो. ज्ञानोबारायांनी हरिपाठात "समबुद्धि घेतां समान श्रीहरि" असे म्हटले आहे. मेघांच्या(खरं तर निसर्गाच्या) ठायीं असलेल्या याच समबुद्धीचे सुंदर वर्णन या श्लोकात शार्दूलविक्रीडीत वृत्तांत केले आहे.

हिन्दु संस्कृतीने निसर्गातील विविध घटकांचे आपल्यावरील ऋण नेहमीच कृतज्ञतापूर्वक स्वीकारलेले आहे. एखाद्या निर्जीव वस्तूला जरी पाय लागला तरी आपण त्या वस्तूला नमस्कार करतो ते त्यामुळेच. यालाच प्रमाण मानून संभाजी महाराजांनी आपल्यावर सदैव उपकार करणाऱ्या पर्जन्यदायी मेघांना नमन केले आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र १५७**

**गंगास्तुतिः**

**यद्यपि दिशि दिशि सरितः परितः परिपुरिताम्भसः सन्ति।**
**तदपि पुरंदरतरुणीसंगतिसुखदायिनी गङ्गा।।**

या श्लोकांत संभाजी महाराजांनी सर्व विश्वाला वंदनीय असणाऱ्या गंगा नदीचे माहात्म्य वर्णन केलेले आहे.

हा श्लोक आर्या वृत्तात रचलेला आहे. आर्या हे प्रवाही वृत्त आहे म्हणूनच गंगा नदीच्या प्रवाहीपणाचे वर्णन करण्याकरिता संभाजी महाराजांनी आर्या वृत्ताचा वापर केला आहे.

बारामतीचे प्रसिद्ध कवी मोरोपंत यांनी हेच आर्या वृत्त मराठी भाषेमध्ये प्रचलित केले. त्यापूर्वी आर्या वृत्त केवळ संस्कृत भाषेतील काव्यरचनांसाठी वापरले जात होते. "आर्या मयुरपंतांची" हे वचन सुप्रसिद्धच आहे.

बुधभूषण ग्रंथाची रचना करताना संभाजी महाराजांनी संस्कृत व्याकरणातील अनेक वृत्ते आणि अलंकारांचा अत्यंत प्रभावीपणे वापर केला आहे. या सर्वच श्लोकांचा अभ्यास केल्यावर संभाजी महाराजांची काव्यनिर्मितीच्या क्षेत्रातील उत्तुंग प्रतिभा प्रत्ययास येते. अलिकडकच्या काळात तर मराठी भाषेमध्ये सुद्धा वृत्तांत काव्यनिर्मिती करणे ही गोष्ट जवळपास हद्दपार झालेली आहे.

अर्थ~पुरंदर म्हणजे इंद्रदेव. पुरंदरतरुणी म्हणजे इंद्रदेवांची पत्नी इंद्राणी अथवा शची.

अनेक दिशांना पाण्यानी तुडुंब भरलेल्या अनेक नद्या सर्वत्र दिसतात. हे जरी सत्य असले तरी पर्जन्यदेवाच्या म्हणजेच साक्षात देवेंद्रांच्या पत्नीच्या(इंद्राणी) सहवासाचे अत्यंत पवित्र सुख देणारी केवळ गंगा नदीच आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र ८५**

**क्षुद्राः सन्ति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः।**
**स्वर्थो यस्य परार्थ एव परमा नेकः सतामग्रणीः।**
**दुःपूरोदरपूरणाय पिबति स्रोतःपतिं वाडवो।**
**जीमूतस्तु निदाघसंभृतजगत्संतापविच्छित्तये।।**

ही अन्योक्ती आहे. मेघाचे रूपक करून संभाजी महाराजांनी सज्जनांच्या परोपकारी वृत्तीचे वर्णन केले आहे.

अर्थ~सहस्रो क्षुद्र(म्हणजे सामान्य) जीव स्वतःचे पोट भरण्याच्या उद्योगातच गुंतलेले असतात, पण इतरांसाठी झटणे, झिजणे हाच ध्यास ज्यांना असतो, हाच ज्यांचा स्वार्थ असतो, असा पुरुषच सज्जनांमध्ये अग्रेसर असतो. स्वतःचे उदरभरण(स्वार्थ) साधण्याकरिता वडवानल(म्हणजे समुद्रात पेटलेला वणवा) सुद्धा पाणी पीतच असतो. परंतु सर्व जगाचा दाह शमवण्यासाठी उन्हाळ्यांत स्वतःमध्ये पाणी साठवून ठेवणारा केवळ मेघाच असतो.

या श्लोकात मेघाला, म्हणजे पाणी साठवून ठेवणाऱ्या ढगाला शंभुराजांना सज्जनांची उपमा दिलेली आहे. मेघ जसा जगाच्या कल्याणासाठी प्रतिकुल स्थितीत(उन्हाळा) स्वतःमध्ये जल साठवून ठेवतो तसेच सज्जन जगावर प्रतिकुल परिस्थिती असताना स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून इतरांसाठी झटत असतात.

पुण्यश्लोक श्रीशिवछत्रपती आणि धर्मवीर श्रीशंभुछत्रपती या पिता-पुत्रांनी देखील असेच अत्यंत कठीण परिस्थितीत देश, देव आणि धर्माच्या संरक्षणासाठी निस्वार्थीपणे कष्ट उपसले. त्याचाच परिणाम म्हणून आज हिंदुस्थानचे अस्तित्व जगाच्या नकाशावर टिकून आहे.

**अध्याय १**

**श्लोक क्र १९३**

**रघुकुलभूषणश्रीरामचन्द्रवंदना**
**वर्णो यस्य विराजते जलनिधिं योसौ बबन्ध क्षणा।**
**द्यो लङ्केशशिरोच्छिनद्वसुमतीं व्यापुर्यदीया: शरा:।**
**मं वंदे रघुनंदनं यशदनुगा रक्षांस्यवाघ्नन् बला।**
**ज्जम्बूवज्जलबिंदुवज्जलजवज्जम्बालवज्जालवत्।।**

हा शार्दूलविक्रीडीत वृत्तातील श्लोक प्रभू श्रीरामांना वंदन करण्यासाठी संभाजी महाराजांनी रचलेला आहे.

अर्थ~ज्यांची अंगकांती अत्यंत शोभून दिसते आहे. ज्यांनी अवघ्या काही क्षणांतच समुद्रास बंधनात अडकविले(समुद्रावर सेतू बांधला), ज्यांनी लंकाधिपती रावणाचे मस्तक उडविले, ज्यांच्या बाणांनी पृथ्वी(वसुमती) व्यापून टाकली अशा त्या रघुकुलनंदन श्रीरामांना मी वंदन करीत आहे.

याच रामचंद्रांच्या अनुयायांनी जांभळे पाडावी, पाण्याचे थेंब उडवावेत, कमळे उपटून टाकावी, चिखल दूर करावा(तुडवावा), जाळ्या जळमटे झटकावीत त्याप्रमाणे आपल्या बळाच्या आधारे राक्षसांचा सर्वनाश केला.

शेवटच्या चरणातील अनुप्रास इतका अप्रतिम आहे की आद्यशंकराचार्यांच्या स्तोत्रांची आठवण होते. संभाजी महाराजांच्या अंगी किती अलौकिक प्रतिभा होती हे या आणि अशा अनेक श्लोकांतून वारंवार प्रत्ययास येते.

श्रीमच्छम्भुनृपविरचितम् बुधभूषणम्
(धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांनी रचलेले बुधभूषण)
॥ श्री गणेशाय नमः ॥
॥ श्री नृसिंहाय नमः ॥
अध्याय २ (राजनीती)

श्लोक क्र २
मेधावी मतिमानदीनवदनो दक्ष: क्षमावान् ऋजु।
धर्मात्माप्यनसूयको लघुकर: षाड्गुण्यविच्छक्तिमान्।
उत्साही परंध्रवित्कृतधृतिर्वृद्धिक्षयस्थानवित्।
शूरो न व्यसनी स्मरत्युप्रकृतं वृद्धोपसेवी च यः॥

अर्थ~या श्लोकांत संभाजी महाराजांनी राजाच्या अंगी असणाऱ्या लक्षणांची सूचीच सांगितली आहे.
मेधा म्हणजे उच्च प्रतीची विद्वत्ता. मेधावी म्हणजे अत्यंत बुद्धिमान. ज्यांच्या ठायीं उच्च कोटीची बुद्धिमत्ता असते, ज्यांच्या चेहऱ्यावर नेहमी प्रसन्न भाव असतात(उदास/लाचार भाव नसतात), जे सदैव सावधचित्त असतात, ज्यांच्या ठायीं क्षमाशीलता, सरलता, सहनशीलता आणि ऋजुता(कोमलहृदयता) असते, जे धार्मिक वृत्तीचे(धर्मात्मा) असतात आणि कोणाचाही द्वेष मत्सर करत नाहीत, जे लघुकर म्हणजे अल्प काळात मोठे कार्य साधणारे(गतिमान) असतात आणि ज्यांच्या ठायीं समर्थ्यासह षड्गुण वास्तव्य करतात(ते सहा गुण-संधी, विग्रह, यान, आसन, द्वैध आणि आश्रय. संदर्भ-मनुस्मृती), जे नेहमी उत्साही असतात, शत्रूची वैगुण्य स्थाने(weak points)जाणतात, जे राज्याच्या अभिवृद्धी, क्षय अथवा सुसमा स्थितीची कारणे जाणतात, जे शूर आणि निर्व्यसनी असतात, जे इतरांनी केलेल्या उपकारांचे सदैव स्मरण ठेवतात आणि जे वडीलधाऱ्यांची सेवा-शुश्रुषा करतात तेच खऱ्या अर्थाने राजे असतात.

ही लक्षणे पाहतां, हिंदवी स्वराज्यात राजा होण्याकरिता किती मोठी पात्रता आवश्यक होती हे आपल्या ध्यानात येते. या लक्षणांनी युक्त असा नेता(राजा) आजच्या काळात तरी अप्राप्यच आहे.
हिन्दुस्थानच्या सौभाग्याने श्रीशिवछत्रपती आणि धर्मवीर शंभुराजे यांच्या रूपाने हे सर्व सद्गुण अंगी बाणणारे राजे आपल्याला त्या काळी लाभले.

श्लोक क्र ३
बुद्धिशास्त्र: प्रकृत्यङगो धनसंवृत्तिकञ्चुकः।
चारेक्षणो दूतमुख: पुरुष: कोऽपि पार्थिव॥

अर्थ~राजा हा असा एक अद्भुत पुरुष असतो ज्याचे बुद्धी हे शस्त्र असते, सात प्रकारच्या प्रकृती हे त्याचे शरीर असते(स्वामी, अमात्य, राजधानी, राष्ट्र, कोश, दंड म्हणजे सैन्य आणि सुहृत् ही राजाची सप्तांगे मानलेली आहेत), वित्त(संपत्ती) हेच त्याचे संरक्षक कवच असते, हेर हेच त्याचे डोळे असतात आणि दूत हेच त्याचे मुख असते.

या श्लोकांत संभाजी महाराजांनी राजाच्या बुद्धी, कोश, हेर आणि दूत यांची महती वर्णन केलेली आहे.

श्लोक क्र ४
वाग्मी प्रगल्भ:प्रतिमानुदग्रो बलवान्वशी।
नेता दण्डस्य निपुण: कृतशिल्प: सुविग्रह:॥

अर्थ~या श्लोकांत आदर्श राजा कसा असावा याचे वर्णन केले आहे.
आदर्श राजा हा उत्तम वक्ता, धैर्यशाली, विचारांनी प्रगल्भ, स्मरणशक्ती चांगली असणारा, बलवान म्हणजे सामर्थ्यवान, संयमी, स्वतःला व इतरांना नियंत्रणात ठेवणारा असतो.
तसेच नेता हा यशस्वी सेनापती, बुद्धिमान, शिल्पज्ञ, कलाप्रवीण आणि उत्तम(सुंदर) शरीर धारण करणारा असावा.

श्लोक क्र ५
पराभियोगप्रसहो दृष्टसर्वप्रतिक्रियः।
परच्छिद्रानुपेक्षी च संधिविग्रहतत्त्ववित्॥

अर्थ~शत्रूच्या हल्ल्याला समर्थपणे तोंड देण्यास समर्थ असणारा, शत्रूला सर्व तऱ्हेने प्रतिकार करण्याचे तंत्र ज्ञात असलेला, शत्रूच्या लहानातील लहान दोषाकडे सुद्धा दुर्लक्ष न करणारा आणि शत्रूशी केव्हा संधी(तह) करावी आणि केव्हा विग्रह(युद्ध) करावा याविषयीचे मूलभूत ज्ञान असणारा आदर्श राजा असतो.

शिवचरित्राचे बारकाईने अध्ययन केल्यास या सर्व लक्षणांची उदाहरणे आपल्याला त्यात आढळतात. शिवाजी महाराजांनी शत्रूचा प्रतिकार करताना विविध मार्गांचा अवलंब केलेला आहे. एकूण तेरा प्रकारे महाराजांनी युद्धादी प्रसंग केले. त्याचे वर्णन आज्ञापत्राच्या पहिल्याच प्रकरणात आलेले आहे.
तह केव्हा करावा आणि युद्ध केव्हा करावे याचा सर्वोत्तम विवेक महाराजांच्या ठायीं होता.

श्लोक क्र ६
गूढमंत्रप्रचारश्च देशकालविभागवित्
आदाता सम्यगर्थानां विनियोक्ता च पार्थिवः॥

अर्थ~एक आदर्श राजा आपल्या सर्व हालचाली आणि योजनांच्या बाबतीत कमालीची गुप्तता राखतो. त्याची नीति देश(जागा) आणि काल(वेळ) यानुसार बदलते. देशकालपरत्वे आपल्या कार्यपद्धतीमध्ये योग्य ते बदल करण्याचे त्यास उत्तम ज्ञान असते. योग्य(न्याय्य) मार्गाने धनसंचय करणारा आणि त्या धनाचा योग्य प्रकारे व्यय म्हणजे विनियोग करणारा राजा आदर्श समजला जातो.

श्लोक क्र ७
क्रोधलोभभयद्रोहस्तम्भचापलवर्जितः।
वृद्धोपदेशसंपन्नःशक्यो मधुरदर्शनः।
निर्वृतः पितरीवास्ते यत्र लोकः स पार्थिवः॥

अर्थ~क्रोध, लोभ, भय, द्रोह, निर्बुद्धपणा आणि चंचलता यापासून आदर्श राजा नेहमी दूर असतो.
वडीलधाऱ्या आणि अनुभवी लोकांच्या उपदेशाच्या रूपाने मोठेच धन या राजाजवळ असते. तो बलवान आणि प्रसन्नवदन म्हणजे उत्तम व्यक्तिमत्वाने युक्त असतो.
अशा राजाला प्रजा पित्याच्या ठिकाणी मानून सदैव त्याच्याशी आदरयुक्त भावनेने आणि आज्ञाधारक वृत्तीने व्यवहार करते. खरोखर ही लक्षणे धारण करणारा राजा आदर्श राजा होय.

श्लोक क्र ८
आत्मसंपद्गुणैः.सम्यक्संयुक्तं युक्तकारिणम्
पर्जन्यमिव राजानं प्राप्य लोकोभिवर्धते॥

अर्थ~स्वतःच्या आत्मिक गुणांच्या संपत्तीने जो राजा कोणतेही कार्य योग्य पद्धतीने करतो त्या राजामुळे लोकांची अभिवृद्धी म्हणजे भरभराट होते जशी पाऊस पडल्यामुळे सर्वांची भरभराट होते.
हे दोन्ही श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत. त्यात अगदी किरकोळ बदल करून ते या ग्रंथात संभाजी महाराजांनी समाविष्ट केला आहेत. संभाजी महाराजांनी वयाच्या पंधराव्या वर्षी कामंदकीय नीतिसार या अलौकिक ग्रंथाचे अध्ययन केले होते ही गोष्टच किती अलौकिक आणि विलक्षण आहे!
हे वर्णन वाचताना निःसंशयपणे शिवछत्रपतींचेच सर्वगुणसंपन्न रूप आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.
हा ग्रंथ संभाजी महाराजांनी वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षी लिहिला आहे. म्हणजे साधारणपणे इ स १६७३-७४ चा सुमार. हा काळ तर शिवाजी महाराजांच्या जीवनातील अत्यंत महत्वाचा काळ आहे. यानंतर अवघ्या वर्षभरात महाराजांनी स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. अर्थातच हा ग्रंथ लिहिताना संभाजी महाराजांच्या डोळ्यासमोर देखील एक आदर्श राजा म्हणून शिवाजी महाराजच होते असा तर्क केल्यास अवास्तव ठरू नये. म्हणूनच ही आदर्श राजाची लक्षणे अभ्यासताना प्रत्येक श्लोकागणिक शिवाजी महाराजांची आठवण स्वाभाविकपणे होते.

श्लोक क्र ११
कुलं सत्त्वं वय: शीघ्रं दाक्षिण्यं क्षिप्रकारिता।
अविसंवादिता सत्यं वृद्धसेवा कृतज्ञता॥

अर्थ~या श्लोकांत सुद्धा राजाच्या ठायी आवश्यक असणाऱ्या सद्गुणांबद्दल भाष्य केले आहे.
कुलीनता, सामर्थ्य, परिपक्वता, शील, चातुर्य, गतीने कार्य साधण्याची वृत्ती, सौजन्य, वागण्यात विरोधाभास नसणे, वादविवाद न करण्याची वृत्ती, खरेपणा, वडीलधाऱ्या(वयाने आणि ज्ञानाने) लोकांची सेवा करण्याची वृत्ती आणि कृतज्ञता हे गुण राजाच्या अंगी असले पाहिजेत.

श्लोक क्र १२
दैवसंपन्नताबुद्धिरक्षुद्रपरिवारता।
शक्यसामन्तता चैव तथा च दृढभक्तिता॥

अर्थ~बुद्धीला दैवाचे सहकार्य असणे, मोठ्या(चांगल्या) लोकांचा परिवार(सहवास) असणे, सामंतांना(म्हणजे अन्य राजांना) आज्ञेत ठेवणे, पदरी बाळगणे, अंतःकरणात दृढ(खोलवर) श्रद्धा असणे, सात्विक बुद्धी असणे हे गुण देखील राजाच्या अंगीं असणे आवश्यक आहे.

श्लोक क्र १३
दीर्घदर्शित्वमुत्साह: शुचिता स्थूललक्षिता।
विनीतता धार्मिकता गुणा: साध्याभिगामिन:॥

अर्थ~राजाच्या अंगी दीर्घदर्शित्व म्हणजे दूरदृष्टी, भविष्याचा वेध घेण्याची क्षमता, उत्साह, अंतःकरणाची शुद्धता असली पाहिजे. स्थूललक्षिता म्हणजे ध्येय स्पष्ट(निश्चित) असणे. हा गुण सुद्धा राजाच्या अंगी असला पाहिजे.

याच बरोबर विनयशीलता, सुसंस्कृतपणा, धार्मिक प्रवृत्ती(धर्माचरण करण्याची वृत्ती) आणि ध्येय गाठण्याची आवड हे सद्गुण राजाला त्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या कामी सहकार्य करतात.

यात धार्मिकता हा गुण स्पष्टपणे उल्लेखिलेला आहे. संभाजी महाराज स्वतः अत्यंतिक धार्मिक वृत्तीचे होते, त्यांच्या जीवनात ते धर्माच्या तत्वांचे काटेकोरपणे पालन करत होते हेच या श्लोकाद्वारे स्पष्ट होते.

श्लोक क्र १४
गुणैरेतैरूपेतः सन्सुव्यक्तमभिगम्यते।
तथा च कुर्वीत यथा गच्छेल्लोकाभिगम्यताम्॥

अर्थ~या(मागच्या काही श्लोकांत सांगितलेल्या) गुणांनी युक्त असा राजा लोकांकडून मनापासून जाणून घेतला जातो. राजाने स्वतःचे वर्तन असे ठेवावे की, ज्यायोगे तो लोकांच्या प्रेमाला, आदराला पात्र होईल, सर्वांना तो आपलासा आणि प्रिय वाटेल.
राजकीय, सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या प्रत्येकाला अत्यंत मोलाचे मार्गदर्शन या श्लोकाद्वारे संभाजी महाराजांनी केले आहे.

श्लोक क्र १५
सर्वलक्षणलक्षण्यो विनीतः प्रियदर्शन:।
अदीर्घसूत्रो धर्मात्मा जितक्रोधो जितेन्द्रियः॥

अर्थ~राजा हा सर्वच चांगल्या लक्षणांचा आधार असतो. तो नम्र आणि प्रियदर्शन म्हणजे प्रसन्नवदन असतो.
दिर्घसूत्रीपणा म्हणजे मंदपणा(लांबण लावण्याची सवय). राजा हा दिर्घसूत्री नसावा. तो धर्मात्मा म्हणजे धर्मशील असावा. राजाला क्रोध आणि इंद्रिये यांवर जय मिळवता यायला हवा.

श्लोक क्र १६
ब्रह्मणाश्चाविसंवादी दृढभक्ति: प्रियंवद:।
अलोलुप: संयतवाग्गम्भीरः प्रियदर्शन:॥

अर्थ~ब्रह्मज्ञ म्हणजे वेदांचा जाणकार. संभाजी महाराजांना अभिप्रेत असणारे राजे वेदांचे उत्तम ज्ञान असणारे, अविसंवादी म्हणजे बोलणे आणि कृती यात फरक न करणारे, अत्यंतिक निष्ठावान आणि मधुर बोलणारे असे असतात.
त्याच बरोबर राजा हा निर्लोभी(लोभ नसलेला), संयमी, बोलण्यावर नियंत्रण असलेला आणि प्रसन्न रूप असणारा असावा.

श्लोक क्र १७
नातिदण्डो न निर्दण्डश्चारचक्षुरजिह्मग:।
व्यवहारे सम: प्राप्ते पुत्रेण रिपुणा सह॥

अर्थ~राजाचे धोरण अतिकठोर शिक्षा देण्याचे नसावे अथवा अजिबात शिक्षा न देण्याचेही नसावे.
राजाचे हेर हेच त्यांचे जागृत हेर असतात. राजांचे वर्तन हे सरळ चालीचे असावे(सापासारखे वाकड्या चालीचे नसावे).
राजधर्माचे आचरण करताना आदर्श राजे पुत्र आणि शत्रू यांच्याशी एकसारखी वागणूक ठेवतात.

श्लोक क्र १८
रथे गजे च धनुषि व्यायामे च कृतश्रम:।
उपवासतपःशीलो यज्ञयाजी गुरूप्रिय:॥

अर्थ~या श्लोकांत राजाच्या ठायी वैयक्तिक स्तरावर अत्यंत आवश्यक असणाऱ्या गुणांविषयी भाष्य केले आहे.
राजे लोक हे रथविद्या(रथावर आरूढ होऊन त्याचे संचालन करणे), गजविद्या(हत्तीवर आरूढ होऊन त्याचे संचालन करणे), धनुर्विद्या(धनुष्याच्या आधारे विविध अस्त्रांचा नैपुण्याने वापर करणे) यांत पारंगत आणि व्यायामाद्वारे भरपूर परिश्रम करणारे(शारीरिक बल संपादन करणे)असतात.
असे आदर्श राजे हे परमेश्वराची मनोभावे उपासना करणारे, तपाचरण करणारे, धार्मिक व्रतांचे श्रद्धेने पालन करणारे, यज्ञ-याग करणारे आणि गुरूंना अतिशय प्रिय असणारे(अथवा गुरू ज्यांना अत्यंत प्रिय आहेत असे म्हणजे गुरुभक्त) असतात.

उपरोक्त श्लोक तर आजच्या राजकीय नेतेमंडळींना झणझणीत अंजनच आहे. राज्य करणाऱ्या लोकांनी शारीरिक परिश्रमपूर्वक व्यायाम केला पाहिजे असे संभाजी महाराज या श्लोकात म्हणतात. आदरणीय श्री भिडे गुरुजी आपल्याला प्रतिदिन व्यायाम करायचा आग्रह का धरतात हे हा श्लोक वाचल्यावर ध्यानात येते. केवळ राजनेच नव्हे तर प्रत्येकाने व्यायामपूर्वक स्वतःला समर्थ बनवणे, धार्मिक व्रतांचे काटेकोरपणे आचरण करणे, विविध युद्धकलांमध्ये प्राविण्य संपादन करणे आणि आपल्या गुरुजनांविषयी आदरभाव बाळगणे हे संभाजी महाराजांना अभिप्रेत आहे.

श्लोक क्र २०
षाड्गुण्यस्य प्रयोक्ता च शक्त्युपेस्तथैव च।
नाहंवादी न निर्द्वंद्वो न यत्किंचनकारक:॥

अर्थ~नृपती(राजे) हे त्यांचे ठायीं असणाऱ्या षड्गुणांचे योग्य समयी प्रयोजन करतात. संधी(शत्रूशी तह करणे), विग्रह(शत्रूशी युद्ध करणे), यान(शत्रुराजावर स्वारी/आक्रमण करणे), आसन(शत्रूवर चढाई न करता केवळ तळ ठोकून राहणे), द्वैधीभाव(सैन्याची योग्य प्रकारे विभागणी करणे) आणि संश्रय(प्रबळ राजाचा आश्रय करणे) हे ते सहा गुण होय.

मनुस्मृतीमध्ये राजाच्या ठायीं अत्यावश्यक असे जे सहा गुण सांगितले आहेत ते हेच आहेत. हा श्लोक मात्र विष्णुधर्मोत्तर पुराणातील आहे. यावरून संभाजी महाराजांनी विष्णुधर्मोत्तर पुराण आणि मनुस्मृतीचा सखोल अभ्यास निश्चितपणे केला असला पाहिजे असे वाटते. बुधभूषण ग्रंथांत देखील मनुस्मृतीतील अनेक(किमान २८) श्लोक जसेच्या तसे वापरले आहेत.

याबरोबरच ते तीन प्रकारच्या शक्तीने युक्त असतात. प्रभावशक्ती, मंत्रशक्ती आणि उत्साहशक्ती या त्या तीन शक्ती आहेत. या तीन शक्तींचे वर्णन रघुवंशात केलेले आहे. या व्यतिरिक्त नृपति(राजे) हे अहंकारापासून मुक्त असतात म्हणजेच ते कधीही आत्मप्रौढीची भाषा बोलत नाहीत, स्वतःचा मोठेपणाची वाच्यता करत नाहीत. ते निर्द्वंद्व असतात म्हणजेच त्यांचे वागणे, बोलणे कधीही परस्परविरोधी नसते आणि केवळ करायचे म्हणून ते कोणतीही कृती करत नाहीत(म्हणजेच त्यांची प्रत्येक कृती ही विचारांतीच केलेलीच असते).

दुर्दैवाने यातील एकही लक्षण सध्याच्या राजकीय नेत्यांमध्ये(सर्वपक्षीय) आढळत नाही. आजचे राज्यकर्ते मात्र आत्मप्रौढी, अहंकार ठासून भरलेले, सदैव परस्परविरोधी वागणारे आणि बोलणारे, केवळ करायचे म्हणून आणि अजिबात विचार न करता कार्य करणारे असेच असतात. त्यामुळे राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तीने आवर्जून अभ्यास करावा असा हा ग्रंथ आहे. दुर्दैवाने खुप कमी लोक याचे अध्ययन करतात.

श्लोक क्र २३
संधिश्च विग्रहश्चैव यानमासनमेव च।
द्वैधीभाव: संश्रयश्च षाड्गुण्यं परिकीर्तितम्॥

अर्थ~या श्लोकात राजाच्या ठायीं असणारी सहा लक्षणे सांगितली आहेत. मागील श्लोकातही राजनीतीतील या सहा गुणांबद्दल सांगितले आहेच. हा श्लोक जरी विष्णुधर्मोत्तर पुरणातून घेतलेला असला तरी हेच सहा गुण मनुस्मृतीने पण सांगितले आहेत.
हे सहा गुण म्हणजे-
१. संधी~तह करणे.
२. विग्रह~युद्ध करणे.
३. यान~शत्रूवर संकटात असताना हल्ला करणे अथवा दुर्बळ राजाने मित्र राजांच्या साहाय्याने प्रबळ शत्रुराज्यावर आक्रमण करणे.
४. आसन~तळ ठोकून स्वस्थ राहणे, वेढा देणे.
५. द्वैध~सैन्याची दोन ठिकाणी विभागणी करणे/तसेच शत्रूच्या सैन्यात फूट पाडणे असाही एक अर्थ आहे.
६. संश्रय~शत्रु राजाचा उपद्रव होत असेल तर आपल्याहून प्रबळ राजाच्या आश्रयाला जाणे.

शिवाजी महाराजांनी या सर्व गुणांचा प्रत्यय त्यांच्या राजकीय जीवनात दिलेला आहे. पुरंदर गडाच्या प्रसंगात त्यांनी मिर्झा राजा जयसिंह याच्याशी तह(संधी) केला. शाईस्ताखानावर त्यांनी स्वतःहून हल्ला(विग्रह) केला. दक्षिणीयांची पातशाही दक्षिणी राजांच्या हातीच राहिली पाहिजे या समान मुद्द्यावर सर्व दक्षिणी राजांची एकजूट करून दिल्लीच्या सत्तेला आव्हान देण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. यालाच यान म्हणतात. शत्रूच्या सैन्याला वेढा देऊन स्वस्थ बसणे या तंत्राचा वापर शिवाजी महाराजांच्या आयुष्यात अभावानेच आढळतो. तरीही मिरजेच्या किल्ल्याला घातलेल्या वेढ्यात आसन हा गुण दिसतो. बहादूरखानाच्या विरुद्ध बहादूरगड येथे झालेल्या युद्धात मराठ्यांनी शत्रुसैन्याची दोन गटांत विभागणी करून त्यांस पराभूत केले. यालाच द्वैधीभाव म्हणतात. शिवाजी महाराज केवळ सोळा वर्षांचे असताना त्यांनी आदिलशाही कैदेतून आपल्या वडिलांची(शहाजीराजांची) सुटका करून घेण्यासाठी शाहजहान बादशहाशी संगनमत करून आदिलशाहीचा यशस्वीपणे सामना केला आणि शहाजी महाराजांची सुटका करवून घेतली. याला संश्रय म्हणतात. वेळप्रसंगी आपल्याहून शक्तिशाली राजापासून स्वतःला संरक्षित करण्यासाठी दुसऱ्या एखाद्या बलाढ्य राजाच्या आश्रयाला जाणे म्हणजे संश्रय.

श्लोक क्र २६
समेन संधिरन्वेष्यो हीनेन च बलीयसा।
हीनेन विग्रह: कार्य: स्वयं राज्ञा बलीयसा॥

या श्लोकांत कोणत्या वेळी कोणत्या गुणाचा उपयोग करावा याविषयी मार्गदर्शन केले आहे.
अर्थ~बलवान राजांनी तुल्यबळ राजांशी संधी(तह) करावा अथवा आपल्यापेक्षा कमी शक्तिशाली राजांशी संधी(तह) करावा. पण राजा जर स्वतः बलवान असेल तर दुर्बल राजांसोबत त्याने आपणहून युद्ध(विग्रह) करावे.

श्लोक क्र २७
तत्रापि तस्य पार्ष्णिस्तु बलीयान्न समाश्रयेत्।
आसीन: कर्मविच्छेदी शक्य: कर्तुम् रिपुर्यदा।।

अर्थ~शुद्ध भावना नसलेला असा पार्ष्णि(पाठीमागील) राजा जर अधिक बलशाली असेल तर द्वैधीभाव या तंत्राचा वापर करावा. द्वैधीभाव म्हणजे शत्रूपक्षात विभागणी(फाटाफूट) करून त्यांची शक्ती क्षीण करणे. परंतु जर बलशाली राजांशी युद्ध करण्याचा प्रसंग उद्भवलाच तर संधियोग्य अशा राजांशी संश्रय करावा म्हणजे त्यांच्या आश्रयाला जावे.
हे श्लोक सुद्धा विष्णुधर्मोत्तर पुराणातील आहेत. यातील मार्गदर्शन आजच्या काळात सुद्धा नक्कीच उपयोगी आहे. इतक्या लहान वयात संभाजी महाराजांचा राजकारण विषयक प्राचीन ग्रंथाचा असलेला अभ्यास आश्चर्यचकित करणारा आहे.

श्लोक क्र ३२
स्वाम्यमात्यसुहृत्कोषदेशदुर्गबलानि च।
स्वाम्यमात्यो जनपदो दुर्गम् दण्डस्तथैव च।।
(विष्णुधर्मोत्तर पुराण)

अर्थ~स्वामी म्हणजे राजा, अमात्य म्हणजे मंत्री, सुहृत म्हणजे मित्र, कोष म्हणजे खजिना, देश(राज्य), दुर्ग(गड) आणि बल म्हणजे सैन्य ही राज्याची सप्तांगे(जणू शरीराचे सात अवयव) होत.
तसेच राजा, मंत्री, जनपद म्हणजे देश, दुर्ग(गड), दंड(शासन करण्याची शक्ती), खजिना, मित्र आणि धर्मज्ञ म्हणजे धर्म जाणणारा(पुरोहित) या अष्टांगांनी युक्त असे राज्य असते. राजाचे राज्य कसे असावे याचे वर्णन या श्लोकात केले आहे. आजही यातील बहुतांश विभाग(कोष, सैन्य, मित्रराष्ट्रे, मंत्रीगण, सल्लागार, इत्यादी) ही राज्याची महत्वाची अंगे म्हणून महत्वाची मानली जातात.

श्लोक क्र ३४
तन्मूलत्वात्तथानङगानां स तु रक्ष्य: समन्ततः।
अर्थ~राज्याच्या सर्व अंगांचे मूलस्थान हे राजा हाच असतो. म्हणूनच राजाचे सर्व बाजूंनी रक्षण केले जावे.

श्लोक क्र ३५
अभिषेकार्द्रशिरसा राज्ञा राज्यावलोकिना।
सहायावरणं कार्यं तत्र राज्यं प्रतिष्ठितम्।।

अर्थ~राज्याभिषेकाच्या पवित्र जलाने ज्याचे मस्तक ओले झाले आहे आणि जो आपल्या राज्याकडे(राज्याचे हित, संरक्षण आणि विकास) ध्यान देत आहे, अशा राजाने सहायक आणि मित्र जवळ बाळगावेत. कारण त्यांच्यावरच राज्याची भिस्त असते.
मित्रराज्यांशी/मित्रराष्ट्रांशी राजाचे संबंध सौहार्दपूर्ण असावेत कारण कठीण प्रसंगी ही मित्रराज्येच मदतीला धावून येत असतात.

श्लोक क्र ३६
यद्यप्यल्पतरं कर्म तदप्येकेन दुष्करम्।
पुरुषेणसहायेन किमु राज्यं महोदयम्।।

अर्थ~एखादे काम कितीही लहान असले तरीही ते एकट्याने करणे अवघडच असते, मग मोठ्या राज्यविषयी काय बोलावे?
ज्याला कोणीही सहकारी नाहीत अशा माणसाला एकट्याला मोठे कार्य करणे अवघड असते. मोठी कार्ये यशस्वी करण्यासाठी अनेक समविचारी लोकांचे सामायिक प्रयत्नच कारणीभूत असतात.
हा श्लोक मत्स्यपुराण या ग्रंथातून घेतलेला असून या श्लोकात सांघिक वृत्तीने काम करण्याचे महत्व सांगितले आहे. राजा कितीही बुद्धिमान, कर्तृत्वसंपन्न, पराक्रमी आणि उत्तम प्रशासक असला तरीही उत्तम सहकाऱ्यांच्या आधारेच त्याला राज्यकारभार करावा लागतो. यासाठीच अष्टप्रधान मंडळाची व्यवस्था आपल्या देशात होऊन गेलेल्या महान राजांनी घालून दिलेली आहे. शिवाजी महाराजांनी देखील याच व्यवस्थेचा अंगीकार केला होता.

श्लोक क्र ३९
हितोपदेशकान्राज्ञः स्वामिभक्तान्यशोर्थिनः।
एवंविधान्सहायांश्च शुभकर्मसु योजयेत्।।

अर्थ~राजाचे सहायक कसे असावेत याचे विवेचन या श्लोकांत केले आहे. हा मूळ श्लोक मत्स्यपुराणातील आहे.
जे राजांना हितकारक उपदेश करतात(हिताचे सल्ले देतात), जे स्वामिनिष्ठ म्हणजे आपल्या धन्यावर अनन्य भक्ती बाळगतात, ज्यांच्या मनांत आपल्या राजाची कीर्ती वाढावी हाच विचार असतो, अशाच सहायकांना राजाने चांगल्या कामासाठी नियुक्त करावे.

श्लोक क्र ४१
निवर्तेतास्य याबद्भिरितिकर्तव्यता नृभिः।
तावतोतन्द्रितान्दक्षान्प्रकुर्वीत विचक्षणान्।।

अर्थ~राजांची कार्ये, कर्तव्ये दक्षतापूर्वक आणि वेळेत पार पडावी यासाठी जितक्या लोकांची आवश्यकता असेल तितक्या बुद्धिमान, तत्पर, आळसरहित, कार्यात उत्साही, निर्लोभी(निस्वार्थी), स्वतःच्या कर्तव्यात निपुण आणि सावध अशा लोकांची(मंत्र्यांची) नेमणूक राजाने वेळीच करावी.

श्लोक क्र ४२
तेषां मध्ये नियुञ्जीत शूरान्दक्षान् कुलोद्भवान्।
शुचीनाकरकर्मान्ते भीरूनन्तर्निवेशने।।

अर्थ~त्या मंत्र्यांमध्ये जे शूर, सावध, कुलीन आणि विशुद्ध आचरण असणाऱ्यांना खाणीतून मौलिक द्रव्ये काढण्याच्या कामावर नेमावे. तसेच जे भित्रे असतील त्यांना अंतर्गत निवास, अंतःपुर इत्यादी ठिकाणी नेमावे.

श्लोक क्र ४३
धार्मिकान्धर्मकृत्येषु अर्थकार्येषु पण्डितान्।
क्लीबान्स्त्रीषु नियुञ्जीत नीचान्नीचेषु कर्मसु।।

अर्थ~धार्मिक वृत्तीच्या लोकांची नेमणूक धर्मकार्ये पार पाडण्याच्या कामी करावी.

तसेच विद्वानांची नेमणूक आर्थिक कामांवर आणि नपुंसक लोकांची नेमणूक स्त्रियांच्या स्थानी देखरेख करण्यासाठी आणि नीचांची हलक्या दर्जाच्या कामावर करावी.
वरील तीन श्लोकांत कोणत्या कामावर कोणाची नियुक्ती करावी याचे विवेचन केले आहे. हे तीनही श्लोक धर्मवीर संभाजी महाराजांनी मूळ मनुस्मृती या ग्रंथातून घेतलेले आहेत. मनुस्मृती हा ग्रंथ धर्मग्रंथ मुळीच नाही हे अवश्य ध्यानात घ्यावे.

श्लोक क्र ४४
अध्यक्षान् विविधान् कुर्यात्तत्र तत्र विपश्चितः।

अर्थ~हुशार/शहाण्या नृपतींनी विविध कार्यांसाठी वेगवेगळ्या अध्यक्षांची(प्रमुखांची) नेमणूक करावी.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
राज्याच्या सात अंगांपैकी एक महत्वाचे अंग म्हणजे अमात्य. आता त्यांची लक्षणे सांगत आहोत.
श्लोक क्र ४५
प्रेक्षकः पाठकश्चैव गणकः प्रतिबोधकः।
गूढमन्त्रश्चतत्त्वज्ञो कालज्ञो दृष्टवित्तथा।।

अर्थ~सतत नीट लक्ष ठेवणारा(प्रेक्षक), नित्य वाचन करणारा(पाठक), गणिताचे ज्ञान असणारा, सतत जागरूक असणारा, सल्लामसलतीतील गोष्टी गुप्त ठेवणारा, तत्वज्ञ म्हणजेच सत्य-असत्य, नैतिक-अनैतिक इत्यादी जाणणारा, काळाची पावले ओळखणारा(कालज्ञ) आणि दृष्टीस पडणाऱ्या गोष्टी/वस्तू/घटना यांचे ज्ञान केवळ दृष्टिक्षेपाने प्राप्त करून घेणारा असा व्यक्ती अमात्य या पदास योग्य मानावा.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ५१
इङ्गिताकारतत्त्वज्ञ ऊहापोहविशारदः।
शूरश्चकृतिविद्यश्च न च मानी विमत्सरः।।

अर्थ~राज्याचा अमात्य हा संशयास्पद व्यक्तीचे अंतरंग(इंगित) जाणणारा(इङ्गिताकारतत्त्वज्ञ), ऊहापोहविशारद म्हणजेच वाटाघाटी/वादविवाद करण्यात कुशल, शूर, विद्यासंपन्न असावा. अमात्यांच्या ठायी गर्व/अहंकार आणि मत्सर यांचा लवलेशही नसावा.

श्लोक क्र ५२
चारप्रचारकुशलः प्राणिभिः प्रणयात्मकः।
षाड्गुण्यविधितत्त्वज्ञश्चोपायकुशलस्तथा।।

अर्थ~राज्याचा अमात्य हा गुप्तहेरांची नियुक्ती करण्यात कुशल असतो. तो सर्व प्राणीमात्रांस अत्यंत प्रिय असतो. तसेच अमात्याच्या ठायीं राज्यांगाच्या सहा गुणांचे(यान, आसन, संधी, विग्रह, द्वैधीभाव आणि संश्रय हे सुरुवातीलाच उल्लेखिलेले सहा गुण) संपूर्ण ज्ञान असावे. अमात्य हा चार उपायांना(साम, दाम, दंड आणि भेद हे चार उपाय) अंमलात आणण्यात पारंगत असावा.

आज जरी लोकशाही राज्यपद्धती अस्तित्वात असली तरी आजच्या काळात देखील मंत्र्यांच्या या लक्षणांचे महत्त्व कायम आहे. दुर्दैवाने अशी लक्षणे असणारे मंत्री मात्र आजच्या काळात दुर्लभ आहेत. शिवाजी महाराज आणी संभाजी महाराज हे महापुरुष केवळ जयंत्या करण्यापुरते आणि राजकीय अथवा अन्य प्रकारचे स्वार्थ साधण्यासाठीच आपण स्वीकारले आहेत. एक समर्थ राष्ट्र म्हणून जगात आपले स्थान निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा खऱ्या अर्थाने स्विकार करण्याची आवश्यकता आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ५५
राज्ञः परोक्षे कार्याणि संपराये भृगूद्वह।
कृत्वा निवेदिता राज्ञि कर्मणां गुरुलाघवम्।।

अर्थ~अमात्य राजाच्या परोक्ष म्हणजे अनुपस्थितीत राजाच्या संबंधीची कामे गुप्ततेने आणि यशस्वीपणे पार पाडतो आणि (यथावकाश) राजाला त्या कामांच्या संबंधीचे निवेदन तारतम्याने देतो.

श्लोक क्र ५६
शत्रुमित्रविभागज्ञो विग्रहस्य च तत्त्ववित्।
स राज्ञ: सर्वकार्याणि कुर्याद् भृगुकुलोद्वह।।

अर्थ~अमात्याला शत्रु आणि मित्र यातील भेद नेमकेपणाने जाणता येतो. तसेच त्याला युद्धाचे मर्म समजलेले असते(युद्ध नेमके केव्हा करावेया आणि केव्हा करू नये याचा विवेक त्याच्याजवळ असतो). ही लक्षणे असणारा मंत्रीच राजाची सर्व कामे(अपेक्षा) पूर्ण करू शकतो.

हे दोन्ही श्लोक विष्णुधर्मोत्तर पुराणातील आहेत. यातील शत्रुमित्रविवेक अजूनही आपल्याला उमगलेला नाही. म्हणूनच आपल्यावर सतत आक्रमण करून आपल्या शेकडो जवानांची क्रुरपणे हत्या करणाऱ्यांचा बंदोबस्त अद्यापही आपण करू शकलेलो नाही. शिवाजी महाराज आणी संभाजी महाराज यांच्या जीवनातून हा बोध घेण्याची आजच्या हिन्दुस्थानला नितांत आवश्यकता आहे.

आहे कोण शत्रु आहे कोण मित्र।
कळे हे न त्यांना म्हणा अश्मपुत्र।।

~श्री संभाजीराव भिडे गुरुजी

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ५९ पर्यंत सांगितलेली अमात्यांची लक्षणे ही विष्णुधर्मोत्तर पुराण यातून घेतलेली आहेत. ही लक्षणे अंगी बाणणाऱ्या मंत्र्याची नियुक्ती तरच राज्याची कार्यसिद्धी होते. अन्यथा कार्यनाश होऊन अधर्म पदरी येतो असे नीतिशास्त्रकार कामन्दक सांगतात.
यापुढील श्लोकांत सांगितलेली अमात्यलक्षणे कामन्दकीय नीतिसार या प्राचीन ग्रंथातून घेतलेली आहेत.

श्लोक क्र ६०
राज्ञा नियोजितेमात्ये राज्ञ: सन्ति त्रयो गुणा:।
यश: स्वर्गनिवासश्च पुष्टश्चैव धनागम:।।

अर्थ~अशा प्रकारे उत्तम लक्षणांनी युक्त अशा अमात्याची नियुक्ती केली असतां राजाला तीन गुणांचा लाभ होतो. कीर्तिप्राप्ती, स्वर्गप्राप्ती आणि विपुल संपत्तीची प्राप्ती(पुष्टी) हे ते तीन गुण होय.

श्लोक क्र ६१
मूर्खे नियोजितेमात्ये त्रयो दोषा महीपते:।
अयश: कर्महानिश्च नरके पतनं ध्रुवम्।।

अर्थ~परंतु राजाने जर मूर्ख मंत्र्याची नियुक्ती केली तर राजाला तीन दोष प्राप्त होतात. अपकीर्ति अथवा अपयशाची प्राप्ती, कर्महानी म्हणजे कार्याचा नाश आणि नरकवास अर्थात अध:पतन/अधोगती हे ते तीन दोष होत.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ६२
तस्मान्महीपति: सम्यग् विचार्य च पुनः पुनः।
गुणवन्तं नियुञ्जीत गुणहीनं न योजयेत्।।

अर्थ~(म्हणूनच) योग्य तो विचार पुनःपुन्हा करूनच राजाने (अमात्य पदासाठी) गुणसंपन्न अशा व्यक्तीची नियुक्ती करावी. गुणहीन माणसाची नेमणूक कधीही करू नये.

श्लोक क्र ६३
अमात्यैर्व्यसनोपेतैर्ह्रियमाणो महीपति:।
अशक्त एवोत्पतितुं छिन्नपक्ष इवाण्डज:॥

अर्थ~राज्याचे अमात्य जर व्यसनाच्या आधीन झालेला असतील तर ते राजास राज्याचे हिताचे सल्ले न देता स्वतःच्या सोयीचे सल्ले देतात. संस्कृत मध्ये व्यसन हा शब्द संकट या अर्थाने देखील वापरतात. त्यामुळे इथे व्यसन म्हणजे वाईट सवय तसेच संकट हे दोन्ही अर्थ ध्यानात घ्यावेत.
अशा मंत्र्यांच्या (चुकीच्या) सल्ल्यांमुळे राजाची अवस्था पंख छाटून टाकलेल्या पक्षाप्रमाणे शक्तीहीन होते. अशा स्थितीला प्राप्त झालेला राजा दुर्मंत्र्यांमुळे अपमानित झालेला असतो.
याचाही प्रत्यय सध्याच्या राजकारणात आपल्याला नेहमी येतो. मंत्री जर राज्याच्या समस्या सोडवण्याऐवजी स्वतःच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने निर्णय घेऊ लागले तर राज्याची(आणि राजाची सुद्धा) अवस्था शक्तीहीन आणि अपमानित होते यात शंकाच नाही. यासाठी व्यसनाधीन मंत्री कदापीही नेमू नयेत. शिवाजी महाराजांच्या राज्यात तर व्यसन करणे हा मोठाच दंडनीय अपराध होता. दुर्दैवाने आजच्या राजकारणात निर्व्यसनी मनुष्य मिळणे कठीण झाले आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ६४
व्यसनस्य प्रतीकारो राज्ञि राज्याभिषेचनम्।
आयव्ययौ दण्डनीतिरमात्यप्रतिधेषनम्।
इत्यमात्यस्य कर्मेदं हन्ति स व्यसनान्वितः॥

अर्थ~या श्लोकात अमात्यांची महत्वाची कर्तव्ये संगीतली आहेत. व्यसनस्य प्रतीकारो म्हणजे (राज्यावर उद्भवणाऱ्या) संकटांचा प्रतिकार करणे हे अमात्यांचे कर्तव्यच आहे. इथे व्यसन या शब्दाचा अर्थ संकट असाच अभिप्रेत आहे. याशिवाय राजांस राज्याभिषेक करणे, आय-व्यय म्हणजे राज्याचा जमा-खर्च पाहणे, दंडनीति म्हणजे शासनव्यवस्था सांभाळणे, अन्य मंत्र्यांच्या (लोभ अथवा मोहाच्या पाशात अडकून) केल्या जाणाऱ्या दुष्कृत्यांना पायबंद घालणे ही अमात्यांची कर्तव्ये आहेत.
ही कर्तव्ये सोडून जर अमात्य व्यसनाच्या नादी लागलेला असेल तर तो राजाचा (आणि पर्यायाने राज्याचा सुद्धा) नाश करतो.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ६८
कुलीना: शुचय: शूरा: श्रुतवन्तो न रागिण:।
दण्डिने(दण्डनीते:) प्रयोक्तार: सचिवा: स्युर्महीपते:॥

अर्थ~राज्याच्या सचिव म्हणजेच अमात्य कसा असावा याचे वर्णन या श्लोकांत संभाजी महाराजांनी केले आहे. सचिव हा कुलीन म्हणजे उत्तम घराण्यातील असावा. तो निष्कलंक, शूर, शास्त्रांचे ज्ञान असणारा, आसक्ती(लोभ) नसणारा आणि दंडनीतीची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याचे ज्ञान असलेला असावा. दंडनीति म्हणजे विविध प्रकारच्या अपराधांसाठी कोणते शासन(दंड) करावा याविषयीचे राज्याचे धोरण.
हा श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७०
अश्रुण्वन्नपि बोद्धव्यो मन्त्रिणा पृथिवीपति:।
यथा स्वदोषनाशाय विदुरेणाम्बिकासुत:।।

अर्थ~जरी राजा सल्ला ऐकून घेत नसेल अथवा ऐकूनही त्यानुसार कार्यवाही करत नसेल तरीही मंत्र्याने राजास हितोपदेश अवश्य करावा. स्वतःचे दोष नष्ट करण्यासाठी धृतराष्ट्र(अंबिकासुत) ऐकत नसतानाही विदुराने त्याला हितकारक उपदेश करणे चालूच ठेवले होते.
राजा जरी चांगला सल्ला ऐकण्याच्या मनस्थितीत नसेल तरीही हुशार अमात्याने त्यास चांगला सल्ला देणे थांबवू नये.
हा श्लोक देखील शाङर्गधरपद्धती या ग्रंथातील आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७१
स्मृतिस्तत्परार्थेषु वितर्को ज्ञाननिश्चय:।
दृढता मंत्रगुप्तिश्च मन्त्रिसंपत्प्रकीर्तिते।।

अर्थ~स्मृति म्हणजे स्मरण ठेवणे, कार्यात तत्परता राखणे, संशय बाळगणे(मंत्र्याला योग्य त्या प्रसंगी संशयी असणे देखील आवश्यक असते), राज्यकारभाराविषयी ज्ञानाची निश्चिती, स्थिरता म्हणजेच ठामपणा(दृढता) आणि गुप्तता(सल्लामसलतीत गोपनीयता) राखणे या सर्वांना मंत्र्यांच्या गुणांचा सागर मानले आहे.
या श्लोकात मंत्र्यांच्या अंगी असणाऱ्या सद्गुणांविषयी भाष्य केले आहे. हा मूळ श्लोक स्मृतिसार या ग्रंथातील आहे.

श्लोक क्र ७२
प्रजार्थं श्रेयसे राजा कुर्वीतात्मजरक्षणम्।
लोलुभ्यमानास्तेर्थेषु हन्युरेनमतन्द्रिता:।।

अर्थ~प्रजेच्या कल्याणार्थ राजाने आपल्या पुत्रांचे(राजपुत्रांचे) चांगल्या तऱ्हेने रक्षण करावे(इथे रक्षण म्हणजे चांगल्या तऱ्हेने संगोपन करावे, संस्कार द्यावेत असा अर्थ अभिप्रेत आहे). राजपुत्रांस जर लौकिक संपत्तीची(ऐश्वर्याची) लालसा उत्पन्न झाली(हाव सुटली) तर त्यासाठी ते(संपत्तीच्या मोहाने अंध झालेले) राजपुत्र काहीही विचार न करता राजाला सुद्धा ठार मारू शकतात. म्हणूनच राजपुत्रांना योग्य तऱ्हेने घडवणे ही सुद्धा अमात्यांच्या कार्यक्षेत्रातील गोष्ट मानलेली आहे.
हा श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७३
आचार्यैश्चार्यकर्तव्यं नित्ययुक्तैश्च रक्षणम्।
धर्मार्थकामशास्त्राणि धनुर्वेदं च शिक्षयेत्।।

पुत्रस्य रक्षा च कर्तव्या पृथिवीक्षिता।
आचार्य श्चात्र कर्तव्यो नित्य युक्तश्च रक्षिभि:।।
धर्म-कामार्थ-शास्त्राणि धनुर्वेदं च शिक्षयेत्।।

अर्थ~वरील दोन्ही श्लोक अर्थाने जवळपास सारखेच आहेत. आधीचा श्लोक हा विष्णुधर्मोत्तर पुराणातील असून नंतरचा श्लोक मत्स्यपुराणातील आहे.
राजाने(पृथ्वीपती) आपल्या पुत्राचे उत्तम प्रकारे रक्षण करावे(रक्षण करावे म्हणजे संगोपन करावे, त्यांस शास्त्र आणि शस्त्र इत्यादी विद्यांमध्ये पारंगत बनवावे). राजपुत्राच्या या शिक्षणासाठी राजाने एक गुरू नियुक्त करावा. तो(गुरू) राजपुत्राच्या सेवकादी सहकाऱ्यांनी युक्त असावा. या गुरूकडून राजाने आपल्या पुत्राला धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांसह धनुर्विद्येचे प्रशिक्षण द्यावे.

आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये मानवी जीवनाचे चार पुरुषार्थ(धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) सांगितले आहेत. यापैकी इहलोकात साधावायचे धर्म, अर्थ आणि काम यांचा उल्लेख प्रस्तुत श्लोकांत आलेला आहे. या तीन पुरुषार्थांचे ज्ञान मनुष्य म्हणून प्रत्येकालाच असणे आवश्यक आहे. त्याच सोबत प्रत्येक क्षत्रियाला(आणि विशेषतः राजा आणि राजपुत्राला) धनुर्विद्येचे ज्ञान देखील आवश्यक आहे असे या श्लोकांत म्हटले आहे.

शिवाजी महाराज हे धनुर्विद्येत पारंगत होते याचे कित्येक दाखले शिवचरित्रात आहेत. उंबरखंडात(लोणावळ्याजवळ) शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघल सरदार कारतलबखानाचा पराभव केला. ते युद्ध आपल्या लोकांनी धनुष्यबाणांच्या साहाय्याने केले असे स्पष्ट उल्लेख समकालीन साधनांत आहेत. महाराजांच्या डाव्या खांद्यावर धनुष्य आणि पाठीवर बाणांचा भाता होता असे त्या प्रसंगाच्या वर्णनात म्हटले आहे.

मुघलांच्या चाकरीला कंटाळून शिवाजी महाराजांना येऊन मिळालेल्या छत्रसाल बुंदेल्याने "शिवाजी महाराजांकडून मी धनुर्विद्या शिकलो" असे लिहून ठेवले आहे.

अशा अनेक प्रसंगातून शिवाजी महाराज हे धनुर्विद्येचे उत्तम जाणकार होते हे स्पष्टच होते. संभाजी महाराज आणि राजाराम महाराज या दोघांनाही धनुर्विद्या शिकविण्याची व्यवस्था शिवछत्रपतींनी केली होती.

शिवकालीन राजनीतीमध्ये(अगदी पुराणकाळात सुद्धा) धनुर्विद्येचे महत्व अनन्यसाधारण होते असे सर्वच राजनैतिक ग्रंथातून प्रत्ययास येते. म्हणूनच धनुर्विद्येला वेदांचा दर्जा(धनुर्वेद) देण्यात आलेला आहे.

आपल्या देशाला निष्णात धनुर्धरांची मोठी परंपरा लाभली आहे. प्रभू श्रीराम, भगवान श्रीकृष्ण, अर्जुन, एकलव्य, कर्ण, भीष्म हे सर्वजण महान धनुर्धर होते. शिवछत्रपती आणि संभाजी महाराज हे देखील तोच वारसा पुढे चालविणारे निष्णात धनुर्धर होते. म्हणूनच या श्लोकांचा समावेश आपल्या "बुधभूषणम्" या राजनीतिविषयक ग्रंथात करणे संभाजी महाराजांना महत्वाचे वाटले.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७४
रथे च कुञ्जरे चैनं व्यायामं कारयेत्तदा।
शिल्पानि शिक्षतेदाप्तैर्नास्य मिथ्याप्रियं वदेत्॥

अर्थ~राजपुत्रांकडून नेहमी रथ आणि हत्ती यांचे संचालन करण्याचा शारीरिक व्यायाम करवून घ्यावा. योग्य लोकांच्याकडून त्यास शिल्पकला तसेच अन्य कला शिकवून घ्याव्यात. राजपुत्राशी बोलताना नेहमी सत्य आणि त्यास प्रिय वाटेल असेच बोलावे. खोटे आणि त्यास न रुचणारे बोलू नये.

राजपुत्रांनी व्यायाम करून शारीरिक सामर्थ्य आत्मसात केले पाहिजे हा अत्यंत मोलाचा विचार या श्लोकांत सांगीतलेला आहे. तसेच राजपुत्रांना रथ आणि हत्ती यांचे संचालन येणे आवश्यक आहे हे सुद्धा या श्लोकांतून स्पष्ट होते. महाभारत युद्धात स्वतः भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले होते आणि त्याचा अर्जुनाला किती मोठा लाभ झाला हे तर सर्वश्रुतच आहे.

श्लोक क्र ७५
न चास्य सङगो दातव्यं क्रुद्धलब्धावमानितैः।
तथापि विनयेदेनं यथा यौवनगोमुखे॥

अर्थ~(राजावर) रागावलेले, विषयलोभी, ज्यांनी (राजाकडून) काही प्राप्त करून घेतले आहे, जे (राजाकडून) अपमानीत झाले आहेत अशा लोकांचा राजपुत्राशी संग घडवून आणू नये. राजपुत्रांची युवावस्था(इंद्रियविषयक) प्रारंभ होताना त्या संबंधी योग्य ते शिक्षण द्यावे अर्थात त्यांस इंद्रियगोचर होण्यापासून परावृत्त करून त्यांस विनयसंपन्न आणि सुसंस्कृत बनवावे.

युवावस्थेत इंद्रियांवर नियंत्रण मिळवणे अत्यंत महत्वाचे असते. राजपुत्रांस इंद्रियनिग्रहाचे प्रशिक्षण देणे हा अत्यंत प्रगल्भ आणि प्रागतिक विचार या श्लोकात सांगितला आहे.

हे दोन्ही श्लोक विष्णुधर्मोत्तर आणि मत्स्य या दोन्ही पुराणातील आहेत.

इंद्रियशिक्षणाचा शालेय शिक्षणात समावेश करण्याविषयीची चर्चा हल्ली होत असते. परंतु आपल्या प्राचीन ग्रंथांनी यावर किती सखोल विचार केलेला आहे हे या श्लोकांतून प्रतीत होते. संभाजी महाराजांना देखील जाणीवपूर्वक हा श्लोक आपल्या ग्रंथात समाविष्ट केलेला आहे.

दुर्दैवाने नित्य व्यायाम करणारे, विनयसंपन्न, इंद्रियांवर नियंत्रण असणारे आणि चारित्र्यवान लोक सध्याच्या राजकारणात जवळपास नामशेष झालेले आहेत. त्या दृष्टीने आजच्या काळात देखील संभाजी महाराजांनी मांडलेला हा विचार नक्कीच महत्वाचा आहे.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७६
इन्द्रियैर्नाविकृष्येत सतां मार्गात्सुदुर्गमात्।
गुणाधानमशक्यं तु यस्य कर्तुं स्वभावतः॥

श्लोक क्र ७७
बंधनं तस्य कर्तव्यं गुप्ते देशे सुखान्वितम्।
अविनीतकुमारं हि कुलमाशु विनश्यति॥

अर्थ~राजकुमारांना तरुण वयात अतिदुर्लभ अशा साधुसंतांच्या मार्गापासून ढळू दिल्यास त्यांना भ्रष्टत्व येईल.म्हणूनच त्यांस सन्मार्गापासून ढळू न देण्याविषयीचे शिक्षण त्यांच्या गुरूंनी त्यांना द्यावे. असे केल्याने त्यांना तरुण वयात विशुद्ध चारित्र्य जतन करता येईल आणि भ्रष्ट मार्गापासून त्यांस स्वतःला दूर ठेवता येईल.

जर राजपुत्रांच्या स्वभावामुळे त्यांच्यापर्यंत हे शिक्षण पोहोचविण्यात गुरू असमर्थ ठरत असेल तर गुरूने त्याला अन्य विषयांत गुंतवून ठेवावे आणि त्यांस भ्रष्ट होण्यापासून वाचवावे कारण अशिक्षित आणि चारित्र्यहीन अशा राजकुमाराचा राजवंश थोड्या अवधीतच विनाशास प्राप्त होतो.

या दोन्ही श्लोकांत तरुण वयात राजकुमारांचे चारित्र्य सांभाळणे किती महत्वाचे आहे हे सांगितले आहे. आजच्या विषयलोलुप जगात तर याचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवते. तसेच साधुसंतांचे विचारच विषयविकाराच्या मार्गापासून आपल्याला परावृत्त करू शकतात असेही संभाजी महाराजांनी या श्लोकांद्वारे स्पष्ट केले आहे. त्यामुळेच आजच्या विज्ञानयुगात देखील चारित्र्य संवर्धनासाठी, उत्तम मनुष्य घडविण्यासाठी संतविचारांची नितांत आवश्यकता आहे हे प्रकर्षाने जाणवते. हे दोन्ही श्लोक विष्णुधर्मोत्तर आणि मत्स्य या पुराणांतून घेतलेले आहेत.

अमात्यलक्षणमाह
(अमात्यांची लक्षणे)
श्लोक क्र ७८
अधिकारेषु सर्वेषु विनीतं विनियोजयेत्।
आदौ स्वल्पे ततः पश्चात्क्रमेणापि बृहत्स्वपि॥

अर्थ~अशा विनयसंपन्न(इन्द्रियांवर नियंत्रण असलेल्या, शूर, सभ्य आणि बुद्धिमान) राजपुत्राची नियुक्ती राजाने आणि गुरूने सर्व प्रकारच्या अधिकारांवर करावी. सुरुवातीला स्वल्प म्हणजे कनिष्ठ अधिकारांवर राजपुत्राची नियुक्ती करावी आणि यथावकाश म्हणजेच पुरेसा अनुभव प्राप्त झाल्यावर त्याची(म्हणजेच राजपुत्राची) नियुक्ती श्रेष्ठ अधिकारांवर सुद्धा करावी.

शिवाजी महाराजांनी संभाजी महाराजांच्या बाबतीत नेमके हेच धोरण अवलंबले होते असे आपल्या ध्यानात येते.

बुधभूषण या ग्रंथाचे रचनाकार संभाजी महाराज हे स्वतः हिंदवी स्वराज्याचे पाहिले युवराज होते. संभाजी महाराजांची युवराज म्हणून नियुक्ती केल्यानंतर शिवाजी महाराजांनी सुरुवातीला त्यांना कनिष्ठ अधिकारांवर नियुक्त केले आणि यथावकाश संभाजी महाराजांची योग्यता जाणून त्यांना श्रेष्ठ अधिकारांवर नियुक्त केले असे इतिहासाचे बारकाईने अध्ययन करताना आपल्या ध्यानात येते. संभाजी महाराजांनी बुधभूषण या ग्रंथाची रचना राज्याभिषेकापूर्वी म्हणजेच युवराज होण्यापूर्वीच केलेली आहे हे इथे आवर्जून ध्यानात घ्यायला हवे.
हा श्लोक मत्स्यपुराणातून घेतलेला आहे.
इति राजपुत्रशिक्षा।

प्रसङ्गाद्राजपुत्रस्य कृत्यामाह।
(हे झाले राजपुत्राच्या शिक्षणाविषयी. आता राजपुत्रांची कर्तव्ये सांगत आहोत.)
श्लोक क्र ८२
पितृसेवापरस्तिष्ठेत्कायवाङ्मानसैः सदा।
तत्कर्म कुर्यान्नियतं येन तुष्टो भवेत्पिता॥

अर्थ~राजपुत्राच्या प्रशिक्षणाविषयी यथायोग्य विश्लेषण झाल्यानंतर आता संभाजी महाराज राजपुत्रांच्या कर्तव्यांविषयी विवेचन करत आहेत.

राजपुत्रांनी आपल्या पित्याची(म्हणजेच राजाची) सेवा काया(शरीर), वाचा(वाणी) आणि मनापासून सदैव करावी. आपल्या पित्याला आनंद(समाधान) वाटेल असेच कार्य राजपुत्रांनी नेहमी करावे.

हा श्लोक केवळ राजपुत्रांना नव्हे तर सामान्य प्रजाजनांना देखील लागू आहे. आपल्या हिन्दु संस्कृतीमध्ये तर आई आणि वडील यांना परमेश्वराचे स्थान दिले आहे. संभाजी महाराजांनी राजपुत्राची कर्तव्ये सांगताना पाहिल्याच श्लोकात हे अत्यंत महत्वाचे कर्तव्य सांगितले आहे.

प्रभू रामचंद्रांनी वडिलांच्या आज्ञेस प्रमाण मानून राज्यपदाचा त्याग करून वनवास पत्करला होता. हाच आपल्या भारतीय संस्कार आहे.

शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज या दोघांनीही आपल्या जीवनात पित्राज्ञेचे सदैव काटेकोरपणे पालन करून आपल्या वाडीलांस संतोष वाटेल असेच वर्तन केलेले आहे असे अनेक प्रसंगांतून आपल्या ध्यानात येते.

"राजेश्री आबासाहेबांस जे संकल्पित तेचि आम्हांस करणे आगत्य" या संभाजी महाराजांच्या पत्रातील वाक्यातून देखील प्रस्तुत श्लोकांत संगीतलेलाच भाव प्रतीत होतो.

संभाजी महाराजांच्या बुधभूषण या ग्रंथातून किमान एवढा बोध जरी घेतला तरी या उपक्रमाचा हेतू मोठ्या प्रमाणात साध्य झाला असे म्हणता येईल. आजचे युवक आपल्या मातापित्यांशी ज्या प्रकारे व्यवहार करतात ते पाहतां या श्लोकाची आजच्या काळात असणारी आवश्यकता आणि समर्पकता नक्कीच पटते.

इति राजपुत्रशिक्षा।
प्रसङ्गाद्राजपुत्रस्य कृत्यामाह।
(हे झाले राजपुत्राच्या शिक्षणाविषयी. आता राजपुत्रांची कर्तव्ये सांगत आहोत.)

श्लोक क्र ८३
तन्न कुर्याद्येन पिता मनागपि विषीदति।
यस्मिन्पितुर्भवेत्प्रीति: स्वयं तस्मिन्प्रियं चरेत्॥

अर्थ~ज्या कृत्यामुळे वडील दुःखी होतील असे कोणतेही कार्य राजपुत्रांनी कधीही करू नये. वडील ज्या लोकांविषयी प्रीती(स्नेहभाव) बाळगता असतील त्याच्याविषयी राजपुत्राने देखील आस्था बाळगावी.

श्लोक क्र ८४
यस्मिन्द्वेषं पिता कुर्यात्स्वस्यापि द्वेष्य एव स:।
असंमतं विरुद्धं च स्वयं नैव समाचरेत्।।

अर्थ~वडील(पिता) ज्यांच्याविषयी द्वेषभाव बाळगतो त्यांच्याविषयी पुत्राने सुद्धा द्वेषभाव बाळगावा. जी जी गोष्ट वडिलांना नापसंत असेल, मनाविरुद्ध असेल अथवा त्यांच्या विचारांच्या विरोधात असेल त्या प्रत्येक गोष्टीबद्दल पुत्रानेही अंतर राखावे. त्या गोष्टींबद्दल कधीही जवळीक करू नये. वडिलांना मान्य नसेल ती कोणतीच कृती पुत्राने कधीही करू नये.

नेमके याच आशयाचे विवेचन भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या तिसऱ्या अध्यायात केले आहे.

यद्यदाचारति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते।।
(श्रीमद्भग्वद्गीता अध्याय क्र ३ श्लोक क्र २१)

यावर विवेचन करताना ज्ञानेश्वर माउली ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायात म्हणतात,
एथ वडील जें जें करिती।
तया नाम धर्मु ठेविती।
तेंचि येर अनुष्ठिती।
सामान्य सकळ।।

इथे वडील म्हणजे केवळ जन्मदाते अथवा पिता असा अर्थ अभिप्रेत नसून वडील म्हणजे वडीलधारे लोक, ज्ञानाने अनुभवाने आणि सर्वार्थाने श्रेष्ठ लोक असा अर्थ अभिप्रेत आहे. राजपुत्राने वडीलधाऱ्या आणि अनुभवी लोकांना संमत नसणाऱ्या गोष्टींच्या नादी कधीही लागू नये हेच या दोन्ही श्लोकांद्वारे संभाजी महाराजांना सांगायचे आहे.
हे दोन्ही श्लोक शुक्रनीतिसार या ग्रंथातील आहेत.

प्रसङगाद्राजपुत्रस्य कृत्यामाह।
(आता राजपुत्रांची कर्तव्ये सांगत आहोत.)
श्लोक क्र ८७
प्राप्यापि महतीं वृद्धीं वर्तेत पितुराज्ञया।
पुत्रस्य पितुराज्ञा हि परमं भूषणं स्मृतम्।।

अर्थ~खुप मोठी अवस्था(पद) प्राप्त झाल्यावर अथवा सत्ता अथवा संपत्तीच्या दृष्टीने मोठी उन्नतीची अवस्था प्राप्त झाल्यावर देखील राजपुत्राने वडिलांच्या आज्ञेतच राहावे. पित्याच्या आज्ञांचे पालन करणे हेच पुत्रासाठी सर्वात मोठे भूषण आहे.

पुत्राने स्वतःच्या कर्तृत्वावर कितीही मोठी अवस्था प्राप्त केली तरी वडिलांच्या ठायीं विनम्र असणे अत्यंत महत्वाचे आहे हाच संदेश संभाजी महाराजांना प्रस्तुत श्लोकाद्वारे द्यायचा आहे.

श्लोक क्र ८८
सोदरेषु च सर्वेषु नाधिक्यं संप्रदर्शयेत्।
भ्रातृणामवमानेन बहवो हि विनाशिता:।।

अर्थ~सोदर म्हणजे सहोदर. सहोदर म्हणजेच सख्खा भाऊ अथवा बहीण. आपले सर्व सख्खे भाऊ एकत्र असताना देखील राजपुत्राने आपल्या स्वतःच्या मोठेपणाचे प्रदर्शन कधीही करू नये. सख्ख्या भावांसमोर आपल्या कर्तृत्वाविषयी बढाईने बोलू नये. कारण अशा कृतीतून अप्रत्यक्षपणे सख्ख्या भावंडांचा अहंकार

दुखावला जातो अथवा त्यांची अवहेलना होते आणि आपसांत शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. बंधूंची अवहेलना करून बरेच जण नाश पावलेले आहेत.

हे श्लोक देखील शुक्रनीतिसार या ग्रंथातील आहेत.

संभाजी महाराजांनी हे श्लोक किती विचारपूर्वक आपल्या बुधभूषण ग्रंथात घेतले आहेत याची प्रचिती प्रत्येक श्लोकांत येते. यात सांगितलेली तत्त्वे आजच्या काळात देखील तंतोतंत लागू होतात. संभाजी महाराजांचा द्रष्टेपणा या ग्रंथाच्या प्रत्येक पानांवर जाणवतो.

प्रसङ्गाद्राजपुत्रस्य कृत्यामाह।
(आता राजपुत्रांची कर्तव्ये सांगत आहोत.)
श्लोक क्र ८९
पितुराज्ञोल्लङ्घनेन प्राप्यापि पदमुत्तमम्।
तस्माद्भ्रष्टा भवन्तीह दासवद्राजपुत्रका:॥

अर्थ~वडिलांच्या आज्ञेचे उल्लंघन करून राजपुत्रास कितीही उच्चपद जरी मिळाले तरी त्या उच्चपदापासून तो राजपुत्र भ्रष्ट होऊन एखाद्या सेवकाच्या पात्रतेला प्राप्त होतो.
वडिलांच्या विचारांच्या विरोधात जाऊन मिळालेला मोठेपणा अत्यंत तुच्छ मानावा असेच संभाजी महाराजांना या श्लोकाद्वारे सांगायचे आहे.

श्लोक क्र ९०
एवं गृहविरोधेन राजपुत्रो वसन्गृहे।
त्यागी च सत्त्वसंपन्न: सर्वान्कुर्याद्वशे स्वके॥

अर्थ~राजाच्या परिवारातील अन्य लोकांशी कोणत्याही प्रकारचा विरोध न बाळगता, जो राजपुत्र त्यागशील, दानशील, विशुद्ध आणि सत्त्वसंपन्न अंतःकरणाने राजप्रासादात वास्तव्य करतो, तो सर्वांना आपल्या ठायीं वश करून ठेवतो.
राजपरिवारातील सदस्यांना विरोध न करता, सात्विक आणि विशुद्ध अंतःकरणाने वर्तन करणारा राजपुत्र निश्चितच राजप्रासादातील सर्वांना प्रिय असतो.
हे दोन्ही श्लोक वयाच्या पंधराव्या वर्षी आपल्या बुधभूषण या ग्रंथात संभाजी महाराजांनी लिहिलेले आहेत.

असा श्लोक लिहिणारे संभाजी महाराज भविष्यात(सुमारे १६७८-७९ मध्ये) वडिलांच्या(म्हणजेच हिंदवी स्वराज्याच्या) विरोधात जाऊन मोठ्या पदाच्या अभिलाषेपोटी मुघल सरदार दिलेरखानाला जाऊन मिळाले असतील हे कसे शक्य आहे?
अर्थातच संभाजी महाराजांचे दिलेरखानाला जाऊन मिळणे हा शिवाजी महाराज आणि शंभूराजे यांच्या कुटनीतीचा उत्तम नमुना होता या तर्काला या श्लोकाने बळ येते.
कदाचित संभाजी महाराजांचे मुघलांना जाऊन मिळणे हेच शिवाजी महाराजांच्या आज्ञेने केलेले कृत्य असणे अत्यंत स्वाभाविक आहे.
हे दोन्ही श्लोक शुक्रनीतिसार या ग्रंथातून बुधभूषण या ग्रंथामध्ये समाविष्ट केलेले आहेत.

प्रसङ्गाद्राजपुत्रस्य कृत्यामाह।
(आता राजपुत्रांची कर्तव्ये सांगत आहोत.)
श्लोक क्र ९४
व्यसने सज्जमानं हि क्लेशयेद्व्यसनाश्रयै:।

अर्थ~राजपुत्र हा व्यसनांच्या आहारी जात असेल अथवा गेला असेल तर राजाने त्याला व्यसनी लोकांकरवीच त्रास देऊन(सतावून) सोडावे. असे केल्याने राजपुत्राला व्यसनापासून परावृत्त करणे सोपे होते.

॥इति सप्रसङ्गममात्यनिरूपणम्॥
(हे प्रसंगानुरूप केलेले अमात्यांच्या कर्तव्यासंबंधीचे निरूपण समाप्त झाले.)

सुहृद:
(आता यापुढे मित्रांविषयी...)
श्लोक क्र ९५
नृपस्य ते हि सुहृदस्त एव गुरवो मता:।
य एनमुत्पथगतं वारयन्त्यनिवारिता:॥

अर्थ~चुकीच्या मार्गाने मार्गक्रमण करणाऱ्या राजांस त्यांचे जे मित्र तिथल्या तिथे जाणीव करून देतात आणि त्या कुमार्गावरून जाण्यापासून राजाला थांबवतात तेच त्या राजाचे खरे मित्र असतात. असे सन्मार्ग दाखवणारे मित्र हेच खरे गुरू असतात. ते राजाला न घाबरता त्याला नेहमी चांगला सल्ला देतात. प्रसंगी वाईटपणा घेऊनही ते राजाला सन्मार्ग दाखविण्यास कचरत नाहीत.

कोणत्याही मोठ्या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला सज्जन लोकांचा मित्र म्हणून लाभ होणे अत्यंत महत्वाचे असते हे विशद करण्यासाठीच "सुहृद:" हे प्रकरण संभाजी महाराजांनी या ठिकाणी योजले आहे.
सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

सुहृद:
श्लोक क्र ९६
सज्जमानमकार्येषु सुहृदो धारयन्ति ये।
सत्यं ते नैव सुहृदो गुरवो गुरवो हि ते॥

अर्थ~जे मित्र चुकीचे कार्य(अकार्य) करण्यास प्रवृत्त झालेल्या राजाला ते करण्यापासून थांबवतात ते राजाचे केवळ मित्र नसतात, तर ते राजाचे खऱ्या अर्थाने गुरू असतात, गुरुंचे गुरू असतात.

संभाजी महाराजांच्या जीवनात अशा खऱ्या मित्राची(सुहृदाची) भूमिका कवी कलश यांनी सदैव पार पडलेली आहे. अगदी बलिदानाची कसोटीच्या क्षणीं सुद्धा कवी कलश यांनी संभाजी महाराजांना साथ दिली.

अथ कोशनिरुपणम्
(आता कोश म्हणजेच राज्याच्या संपत्तीविषयी निरूपण...)

श्लोक क्र ९८
मुक्ताकनकरत्नाढ्य: पितृपैतामहोचितः।
यत्र राजा तत्र कोश: कोशाधीना हि राजता॥

अर्थ~जो(राजा) मोती, सोने आणि विविध प्रकारची रत्ने यांमुळे श्रीमंत झाला आहे, जो पिता आणि पितामह(वडीलधारे लोक) यांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसे वर्तन करतो असा राजा जिथे असेल तेथेच कोश(संपत्ती) वास्तव्य करते कारण राजाचे राजेपण हे त्याच्या कोशावर अवलंबून असते.

ज्या राज्याची संपत्ती अधिक ते राज्य श्रेष्ठ. ज्या राज्याचा कोश समृद्ध त्या राजाला अन्य राजांकडून मानसन्मान लाभतो. म्हणूनच राजाचे राजेपण(श्रेष्ठत्व) हे कोशावर अवलंबून असते असे म्हटले आहे.
हा श्लोक कामंदकीय नीतिसार या राजनीतीपर ग्रंथातील आहे.

अथ कोशनिरुपणम्
(आता कोश म्हणजेच राज्याच्या संपत्तीविषयी निरूपण...)
श्लोक क्र ९९
अर्थादयं परश्चोच्चैर्लोको लोकस्य निश्चित:।
पुमानर्थेन रहितो जीवन्नपि न जिवति।।

अर्थ~सर्व लोकांत श्रेष्ठ असा उच्च लोक अर्थसंपन्नतेमुळेच प्राप्त होतो. म्हणूनच जो पुरुष(राजा) अर्थहीन(दरिद्री, आर्थिक दुर्बळ) असतो, तो जीवंत असून सुद्धा जगत नसतो.
अशा आर्थिक दृष्ट्या दुबळ्या माणसाचे जीवन मानहानी, अपमान यांनी युक्त असते, कष्टमय आणि व्यर्थ असते.
श्लोक क्र १००
यस्यार्थास्तस्य सुहृदो यास्यार्थास्तस्य पौरुषम्।
यास्यार्थास्तस्य सर्वेपि सहाया: संभवन्ति हि।।

अर्थ~ज्याच्याजवळ पैसा असतो त्यालाच चांगले मित्र लाभतात. ज्याच्याजवळ आर्थिक सुबत्ता असते त्यालाच पुरुषार्थ साधता येतात. ज्याच्याजवळ आर्थिक संपन्नता असते त्यालाच सर्व लोक सहाय्यक बनतात, त्यालाच सर्वकाही प्राप्त होते.

ज्याच्याजवळ आर्थिक विपन्नता असते त्याचे या जगात कोणीच नसते, त्याला जगात कोणी विचारतही नाही, त्याला कोणी सहाय्यक म्हणून मिळत नाही. अशा अर्थविहीन मनुष्याला या जगात केवळ अपमान, धूत्कार वाट्याला येतात. म्हणूनच तो जगत असूनही मृतवत् असतो.

शिवाजी महाराजांना या सत्याची पूर्णतः जाणीव होती. म्हणूनच सुरुवातीच्या काळात जरी त्यांनी अर्थार्जनासाठी शत्रूच्या शहरांची/पेठांची लूट करून संपत्ती मिळवली असली तरी राज्यास श्रीमंत बनवण्यासाठीचा हा कायमस्वरूपी उपाय नव्हे ही गोष्ट ते जाणत होते. त्यासाठी लौकिक मार्गाने राज्यास आर्थिक दृष्ट्या संपन्न बनविण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केल्याचे त्यांच्या चरित्रातून आपल्या ध्यानात येते. राज्याभिषेकाच्या वेळी स्वराज्याचे नवीन चलन निर्माण करून शिवाजी महाराजांनी त्यांच्या आर्थिक जाणीवा किती प्रगल्भ होत्या हेच जगाला दाखवून दिले आहे.

अथ कोशनिरुपणम्
(आता कोश म्हणजेच राज्याच्या संपत्तीविषयी निरूपण...)
श्लोक क्र १०१
आपदर्थं च संरक्ष्य कोशः कोशवता सदा।
पुत्रादपि हि संरक्ष्यो भार्याया: सुहृदस्तथा।।

अर्थ~(राज्याच्या कोषाध्यक्षाने) नेहमी राज्याचा खजिना संकटकाळी उपयोगी पडेल ही दूरदृष्टी बाळगूनच जतन करून ठेवावा(संरक्षीत राखावा). राजकोष हा आपला मुलगा, पत्नी आणि मित्र या सर्वांपेक्षा महत्वाचा मानून तो उल्लेखिलेल्या सर्वांपासून देखील सुरक्षित ठेवावा.

श्लोक क्र १०२
नान्यायं च व्ययं कुर्यात्प्रत्यवेक्षेत तान्वहम्।
कृषिवाणिज्ययोर्दुर्गसेतु: कुञ्जरवन्दनम्।।

अर्थ~राज्याच्या धोरणाला अथवा नियमाला अमान्य असलेला (अवास्तव)खर्च राज्याच्या कोशातून कधीही केला जाऊ नये. राज्याच्या आय(उत्पन्न), व्यय(खर्च) आणि शेष(बाकी) या सर्व बाबींवर अत्यंत काटेकोरपणे लक्ष असू द्यावे. शेती, व्यापार, उद्योग, दुर्गबांधणी, पुलबांधणी आणि हत्तींची बंधने यांची नित्य पाहणी करावी(म्हणजेच यांवर होणाऱ्या खर्चाचा नित्य आढावा घ्यावा).

अथ कोशनिरुपणम्
(आता कोश म्हणजेच राज्याच्या संपत्तीविषयी निरूपण...)

श्लोक क्र १०४
एतत्सर्वं जहातीह कोशे व्यसनवान्नृप:।
क्षीणं बलं वर्धयति स्वतो गृह्णाति च प्रजा:।।

अर्थ~जो राजा व्यसनी आहे तो राजकोशातील सर्व धनास मुकतो(त्याच्या खजिन्यातील धन हळूहळू कमी होत जाते आणि शेवटी पूर्णतः संपून जाते). ज्या राजाचा कोश समृद्ध आहे तो कोशाच्या सहाय्याने शक्तीहीन झालेल्या आपल्या सैन्याची प्रगती साधतो आणि प्रजेचे अंतःकरण देखील जिंकतो.

संस्कृत भाषेत व्यसन शब्दाचे दोन अर्थ आहेत. व्यसन म्हणजे वाईट सवय तसेच व्यसन म्हणजे संकट. व्यसनाधीन राजाच काय कोणताही व्यसनाधीन सामान्य मनुष्य सुद्धा हळूहळू आर्थिकदृष्ट्या दुर्बल होत जाऊन अंततः धनविहीन अवस्थेला प्राप्त होतो हेच संभाजी महाराजांना या श्लोकाद्वारे सांगायचे आहे. आजच्या काळातील व्यसनाचे वाढते प्रमाण ध्यानात घेतां, या श्लोकांत संभाजी महाराजांनी मांडलेल्या विचारांची नितांत आवश्यकता सहज पटते.

दुर्दैवाने संभाजी महाराजांचा अभिमान बाळगणारे कथित शिवभक्त देखील व्यसन करताना आढळतात तेव्हा तर या विचारांची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते.

आपल्या बुधभूषण या ग्रंथात, संभाजी महाराजांनी वेळोवेळी सर्व तऱ्हेच्या व्यसनांचा धिक्कार केलेला आहे. असे असूनही महाराष्ट्रात "संभाजी बिडी" या नावाने व्यसनाच्या पदार्थांचे सर्रास उत्पादन आणि विक्री होते ही अत्यंत दुर्दैवी, क्रोधजनक आणि निषेधार्ह बाब आहे. संभाजी महाराज अजूनही आपल्याला समजलेच नाहीत याचेच ते निदर्शक आहे.

कोशवान्पृथिवीपाल: परैरप्युपजीव्यते।
अर्थ~ज्या राजाजवळ भरपूर धन आहे(ज्याचा कोश समृद्ध आहे), तो राजा (वेळप्रसंगी) शत्रूचा देखील आधार बनतो.

अथ कोशनिरुपणम्
(आता कोश म्हणजेच राज्याच्या संपत्तीविषयी निरूपण...)
श्लोक क्र १०५
लोहवस्त्राजिनादीनां रत्नानामभिधानवत्।।

श्लोक क्र १०६
विज्ञाता फल्गुसाराणां अनाहार्यं शुचिस्मित:।
निपुणश्चाप्रवृत्तश्च धनाध्यक्ष: प्रकीर्तितः।।

अर्थ~लोखंड(लोह), कापड, हरिणाचे कातडे(मृगाजिन) आणि रत्ने यांची किंमत जाणणारा, तुच्छ(निरुपयोगी) वस्तूंना ओळखणारा, (वागण्यात) कृत्रिमता न दाखवणारा(सहजपणे वर्तणारा), मुखावर नेहमी निष्पाप हास्य असणारा(प्रसन्नवदन), बुद्धिमान, कुठेही अनावश्यक(अनाठायी) प्रवृत्त न होणारा(अनावश्यक ठिकाणी प्रतिक्रिया न देणारा) असा मनुष्यच धनाध्यक्ष म्हणून कीर्ति प्राप्त करतो(प्रशंसेला प्राप्त होतो).

आजच्या परिभाषेत धनाध्यक्ष म्हणजे अर्थमंत्री. लोकशाही व्यवस्थेत देखील अर्थमंत्र्याच्या ठायी वर सांगितलेले गुण असणे अत्यंत महत्वाचे आहे.
संभाजी महाराजांनी किती दूरदृष्टीने या ग्रंथाची रचना केली आहे हे प्रत्येक प्रकरणांत जाणवते.

।। इति कोशनिरूपण: ।।
(हे कोशनिरूपण इथे समाप्त झाले.)

अथ देश:।
अर्थ~आता देशाविषयी/स्वराज्याविषयी  निरूपण...

इथून पुढील श्लोकांमध्ये देश म्हणजेच स्वराज्य या विषयावर भाष्य केलेले आहे. आपल्याकडे देश म्हणजेच राष्ट्र ही संकल्पना किती पूर्वीपासून घट्ट रुजलेली आहे हे या प्रकरणातून कळते.

श्लोक क्र १०७
यो राष्ट्रमनुगृह्णाति परिगृह्य स्वयं नृप:।
संजातमुपजीवन्स  लभते सुमहत्फलम्।।

अर्थ~जो राजा, राज्याचा अंगीकार करून त्या राज्यातील प्रजेवर नेहमी कृपा करतो(कृपाभाव बाळगतो), त्याला त्याच्या एकंदरीत जीवनात मोठे यश(फळ) अनुभवायला मिळते.

प्रजेवर नितांत प्रेम करणाऱ्या आणि प्रजेचे प्राणपणाने पालन, पोषण आणि रक्षण करणाऱ्या राजाला प्रजाजन ईश्वरी अवतारच मानतात. असा राजा प्रजेच्या मनावर अधिराज्य गाजवतो, त्याची कीर्ति चिरकाळ टिकते. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक श्रीशिवछत्रपती महाराज होय. आज शेकडो वर्षांनी देखील शिवाजी महाराजांची कीर्ति वर सांगितलेल्या तत्त्वामुळेच निरंतर टिकून आहे.

अथ देशः
अध्याय २
श्लोक क्र १०९
धर्माधर्मौ विजानन्ही सतां मार्गमनुस्मरन्।
प्रजा रक्षेन्नृपः साधु हन्याच्च परिपन्थिनः।।

अर्थ~राजाने धर्म आणि अधर्म यातील भेद ध्यानात घेवून संतांच्या उपदेशाप्रमाणे वर्तन करावे. संतांनी सांगितलेला मार्गच अनुसरावा. प्रजेचे आणि साधुसंतांचे रक्षण करावे आणि धर्माच्या आणि संतांच्या विचारांच्या विपरित वागणाऱ्यांना कठोर शासन करावे. त्यांचा समुळ नायनाट करावा.

संभाजी महाराज या ठिकाणी धर्माचारणाचे महत्व सांगत आहेत. शिवाजी महाराजांनी सुद्धा आज्ञापत्रात हेच सांगितले आहे. आज्ञापत्राच्या तिसऱ्या प्रकरणात (राजकर्तव्ये) याविषयी आलेला उल्लेख असा आहे..."धर्मास विरुद्ध अशी पाखण्ड मते राज्यात सर्वोपरि होऊ देऊ नयेत. कदाचित कोठे काही उद्भव जाहला तर त्याचा स्वतः परामृष करून पुन्हा कोणी त्या दुष्ट मार्गाने न प्रवर्ते, अशी यथोचित शिक्षा करून तो मार्ग मोडून टाकावा."

आजकाल नास्तिक, धर्मद्रोही, विद्रोही, भ्रांत निधर्मी आणि समाजवादी विचारसरणीचे अतिशहाणे स्वयंघोषित विद्वान शिवाजी महाराजांना निधर्मी आणि नास्तिक ठरवण्यासाठी उतावळ झालेले दिसतात. उपरोक्त श्लोक आणि त्याच्याशी अतिशय सुसंगत असा आज्ञापत्रातील संर्दभ शिवाजी महाराज आणि धर्मवीर शंभुराजे यांचे धर्माविषयीचे अंतरंग स्पष्ट करणारा आहे.

शिवाजी महाराजांचे "हिन्दवी स्वराज्य" हे पूर्णतः धर्माधिष्ठित राज्य होते हे सत्य देखिल या श्लोकातून अधोरेखित होते.

अथ देशः।
(आता देशाविषयी/स्वराज्याविषयी निरूपण...)
श्लोक क्र ११०
राष्ट्रोपघातं कुर्वीरन्ये पापा राजवल्लभाः।
एकैकशः संहतांस्तान्दूष्यान्वा परिचक्षते।
दूष्यानुपांशुदण्डेन हन्याद्राजाऽविलम्बितम्॥

अर्थ~राज्याचे जे पापी अधिकारी राज्याचा घात करतात, राष्ट्राचा नाश करतात, त्या पैकी एकेकाला स्वतंत्रपणे अथवा त्या सर्वांना मिळून एकत्रपणे 'दूषणीय' असे म्हणतात. अशा अपराधी(दूष्य), पापी अधिकाऱ्यांना तात्काळ कठोर दण्ड(शासन) करावा, गुप्तपणे त्यांना ठार मारावे.

हिन्दवी स्वराज्यात भ्रष्ट, पापी अधिकाऱ्यांना अत्यंत कठोर(बहुतेक प्रसंगी मृत्युदंडच) आणि तात्काळ शिक्षा केली जात असे. त्यामुळेच शिवछत्रपती आणि संभाजी महाराजांच्या काळात अधिकाऱ्यांनी राष्ट्रद्रोह केल्याची प्रकरणे अभावानेच आढळतात.

हा श्लोक मुळात कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहे.
॥ इति राष्ट्रम् ॥
(इथे राष्ट्रविषयीचे निरूपण संपले.)

॥अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्॥
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)
तत्र सामान्यतो दुर्गप्रशंसामाह मनुः।
(सर्वसाधारणपणे दुर्गांची/गडांची महती म्हणजे माहात्म्य पुढीलप्रमाणे आहे.)

श्लोक क्र १११
एकः शतं बोधयति प्राकारस्थो धनुर्धरः।
शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गं समाश्रयेत्॥

अर्थ~किल्ल्याच्या तटावर उभा असणारा एक धनुर्धर योद्धा शंभर लोकांविरुद्ध युद्ध करण्यास सक्षम असतो. तसेच असे शंभर धनुर्धारी योद्धे (दुर्गाच्या म्हणजेच गडाच्या) सहाय्याने दहा हजार शत्रुसैन्याशी यशस्वीपणे युद्ध करू शकतात. म्हणूनच नेहमी दुर्गांचा आश्रय करावा.
हा श्लोक मनुस्मृति या ग्रंथातील आहे. गडदुर्गांचे माहात्म्य अत्यंत समर्पकपणे या श्लोकांत सांगितले आहे.

आज्ञापत्रात गडदुर्गांविषयी खुप सुंदर वर्णन केले आहे...
"संपूर्ण राज्याचे सार तें दुर्ग" या एकाच वाक्यात गडकिल्ल्यांचे स्वराज्यातील महत्व ध्यानात येते. त्यात पुढे असे म्हटलेले आहे,"दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येताच निराश्रय होऊन उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? यांकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले. हें राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय, त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधले, तसेच जलदुर्ग बांधले. त्यावरून आक्रम करीत करीत सालेरी अहिवंतापासून कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिले....गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्याने परमुलखी टिकाव धरून राहवत नाही. इतक्याच कारणें गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. यांकरितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे प्राणसंरक्षण असे पूर्ण चित्तांत आणून, कोणाचे भरंवशावर न राहतां, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतःच करावा, कोणाचा विश्वास मानू नये." गडकोटांविषयीचे महत्व समजून घेण्यासाठी आज्ञापत्रातील वरील वचने खूपच मोलाची आहेत. तेच संभाजी महाराजांना या श्लोकाद्वारे सांगायचे आहे.

॥अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्॥
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)

तत्र सामान्यतो दुर्गप्रशंसामाह मनु:।
(सर्वसाधारणपणे दुर्गांची/गडांची महती म्हणजे माहात्म्य पुढीलप्रमाणे आहे.)
श्लोक क्र ११४
धन्विदुर्गम् महीदुर्गम् नरदुर्गम् तथैव च।
वार्क्षम् चैवाम्बुदुर्गम् च गिरीदुर्गं तथैव च।।

अर्थ~या श्लोकात दुर्गांचे(गडांचे) सहा प्रमुख प्रकार सांगितले आहेत.

दुर्गांचे सहा प्रकार पुढीलप्रमाणे आहेत...
१. धन्विदुर्ग(धनुदुर्ग)-धनुष्यातून सुटलेल्या बाणाच्या टप्प्यात असणारा वाळवंटी प्रदेशातील दुर्ग.
२. महीदुर्ग- जमिनीवरील दुर्ग(भुईकोट).
३. नरदुर्ग(नृदुर्ग)- ज्या दुर्गावर राजाचे(आणि प्रजेचे) वास्तव्य असते असा दुर्ग.
४. वार्क्षदुर्ग- वृक्षांच्या गर्दीत वसलेला दुर्ग.
५. अम्बुदुर्ग- अम्बु म्हणजे पाणी. ज्या दुर्गावर विपुल पाणीसाठा आहे असा दुर्ग म्हणजे अम्बुदुर्ग.
६. गिरिदुर्ग- गिरिदुर्ग म्हणजे पर्वतावर वसलेला दुर्ग.

शिवाजी महाराजांच्या गनिमीकावा या युद्धपद्धतीमध्ये वर उल्लेखिलेल्यांपैकी गिरिदुर्गांचे महत्व नक्कीच मोठे आहे.
हा श्लोक मूलतः विष्णुधर्मोत्तर पुराणातील आहे. परंतु मनुस्मृतीने देखील दुर्गांचे नेमके हेच सहा प्रकार सांगितले आहेत.

।।अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्।।
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)
तत्र सामान्यतो दुर्गप्रशंसामाह मनु:।
(सर्वसाधारणपणे दुर्गांची/गडांची महती म्हणजे माहात्म्य पुढीलप्रमाणे आहे.)

श्लोक क्र ११५
सर्वेषामेव दुर्गाणां गिरिदुर्गं प्रशस्यते।
दुर्गं च परिखोपेतं वप्राट्टालकसंयुतम्।।

अर्थ~दुर्गांच्या आधी सांगितलेल्या सहा प्रकारांमध्ये गिरिदुर्ग म्हणजे डोंगरी किल्ला हाच सर्वात उत्तम होय. या गिरिदुर्गांचे (संरक्षणशास्त्रीय)महत्व सर्वात जास्त असते. त्याच बरोबर आणखी एका प्रकारच्या दुर्गाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तो म्हणजे सर्व बाजूंनी बळकट तटबंदी असणारा आणि बहुमजली(मजल्यावर खोल्या असलेला) असा दुर्ग. देवगिरी दुर्ग हा अशा प्रकारच्या दुर्गाचे उत्तम उदाहरण आहे. शिवाजी महाराजांनी सुद्धा देवगिरीचे "चखोट दुर्ग" असे वर्णन केले आहे.

आज जरी गडदुर्गांचे सामरीक अथवा संरक्षणशास्त्रीय महत्व कमी झाले असले तरी शिवाजी महाराजांच्या काळात गडदुर्गांना त्या दृष्टीने खूपच महत्व होते. त्यादृष्टीने या श्लोकाचा समावेश संभाजी महाराजांनी आपल्या 'बुधभूषण' ग्रंथात केलेला आहे. मूलतः हा श्लोक मत्स्यपुराणातील आहे.

शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक उत्तम गिरिदुर्ग बांधले. या गडांच्या आधारेच महाराजांनी अनेक बलाढ्य शत्रूंना अत्यल्प संख्याबळ आणि साधनसमुग्रीच्या सहाय्याने पराभूत केले. म्हणूनच सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हे गिरिदुर्ग म्हणजे शिवछत्रपतींच्या पराक्रमाची जीवंत स्मारके आहेत, राष्ट्रभक्ती आणि धर्मभक्तीचे शिक्षण देणारी विद्यापीठे आहेत अशी आपल्या सर्वांची श्रद्धा आहे.
।।अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्।।
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)
तुरङ्गशालायां विशेषमाह।
(अश्वशालांचे विशेष...)

श्लोक क्र १३५
कुशीलवानां विप्राणां दुर्गे स्थानं विधीयते।
बहूनां च न वै दुर्गं विना कार्यं ततो भवत्॥

अर्थ~कुशीलवान म्हणजे संशोधक. विप्र म्हणजे बुद्धिमान. शोधक आणि बुद्धिमान लोकांना गडावर राहण्यासाठी अवश्य स्थान द्यावे. यांच्याव्यतिरिक्त इतर लोक, ज्यांचे काहीही काम नाही, त्यांना राजाने गडावर स्थान देऊ नये. कारणाशिवाय गडावर कोणासही वास्तव्य करू देऊ नये.

स्थलविभागमुक्त्वा दुर्गसंपत्तिमाह।
(स्थलमाहात्म्यानंतर आता दुर्गसंपत्तीविषयी सांगत आहोत.)

श्लोक क्र १३६
दुर्गे तु यन्त्रा: कर्तव्या नानाप्रहरणान्विता:।
सहस्रघातिनो राजंस्तैस्तु रक्षा विधीयते॥

अर्थ~हे राजा, अनेक प्रकारच्या अस्त्रे-शस्त्रे आणि आयुधांनी संपन्न आणि सहस्रावधी सैन्याचा नाश करणारे शूरवीर योद्धे यांना राजाने गडावर नेमून त्यांच्याकरवी राज्याचे संरक्षण करावे.

दुर्गसंपत्ती याविषयी भाष्य करताना संभाजी महाराजांनी गडावरील शस्त्रास्त्रे आणि शूरवीर योद्धे यांचा उल्लेख अग्रक्रमाने केला आहे. खरोखरच कोणत्याही राज्याची/देशाची खरी संपत्ती त्या राज्याच्या कोशातील सोने-नाणे नसून त्या राज्यातील पराक्रमी आणि शूरवीर योद्धे हीच असते. संभाजी महाराजांना या श्लोकांतून हेच सांगायचे आहे.

हे दोन्ही श्लोक मत्स्यपुराणातून घेतलेले आहेत.

॥अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्॥
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)

स्थलविभागमुक्त्वा दुर्गसंपत्तिमाह।
(स्थलमाहात्म्यानंतर आता दुर्गसंपत्तीविषयी सांगत आहोत.)

श्लोक क्र १४९
कर्तव्यानि महाभाग यत्नेन पृथिवीभुजा।
उक्तानि चाप्यनुक्तानि राजा द्रव्याण्यनेकशः॥

अर्थ~हे महाशय(महाभाग) राजन, येथे वरीलप्रमाणे सांगितलेले अथवा न सांगितलेले(म्हणचे सांगायचे राहून गेलेले) सर्व पदार्थ, सर्व द्रव्ये, वस्तु, प्राणी, पशू, पक्षी, औषधे, धान्ये, धातू इत्यादी सर्व गोष्टी राजाने प्रयत्नपूर्वक संग्रह करून सुरक्षितपणे ठेवाव्यात. त्या सर्व वस्तूंचा उल्लेख वरील(म्हणजेच या आधीच्या) श्लोकांत आलेला असो अथवा नसो.

श्लोक क्र १५०
सुगुप्तानि पुरे कुर्याज्जनानां हितकाम्यया।
उक्तानि चाप्यनुक्तानि राजद्रव्याण्यशेषतः॥

अर्थ~राजाने आपल्या नगरांत(पुरे) प्रजाजनांच्या हितासाठी, या पूर्वी सांगितलेली अथवा न सांगितलेली सर्व कार्ये(कर्तव्ये) आणि द्रव्ये उत्तम प्रकारे संरक्षित करून ठेवावी.

श्लोक क्र १५१
विषाणां वारकं कार्यं प्रयत्नेन महीभुजा।
विचित्रा: श्वापदा कार्या विषस्य शमनास्तथा॥

अर्थ~राजाने विशेष प्रयत्न करून, सर्व विषांचे निवारण(वारक) करणारे उपाय संग्रह करून ठेवावेत. तसेच विषाचे शमन करणारी विचित्र श्वापदे, रानटी जनावरे गडावर तयार ठेवावीत.

वरील सर्वच श्लोकांत प्रजेच्या कल्याणार्थ राजाने घ्यावयाची काळजी तसेच जतन करून ठेवावयाच्या महत्वाच्या गोष्टींविषयी भाष्य केले आहे.
हे सर्व श्लोक मूलतः मत्स्यपुराणातील आहेत.

॥अथ दुर्गस्वरूपनिरूपणम्॥
(आता दुर्गांच्या/गडांच्या स्वरूपाविषयी निरूपण...)

स्थलविभागमुक्त्वा दुर्गसंपत्तिमाह।
(स्थलमाहात्म्यानंतर आता दुर्गसंपत्तीविषयी सांगत आहोत.)

श्लोक क्र १५४
यन्त्रायुधाट्टालचयोपपन्नं समग्रधान्यौषधिसंप्रयुक्तम्।
वाणिग्जनैश्चावृतमावसेत दुर्गं सुगुप्तं नृपति: सदैव॥

अर्थ~राजाने कोणत्या गडावर वास्तव्य करावे याविषयीचे मार्गदर्शन वरील श्लोकात केले आहे.

जो गड अत्यंत सुरक्षित आहे, ज्या गडावर विविध प्रकारची यंत्रे आणि आयुधे(शस्त्रे) आहेत, गच्ची, तटबंदी, सर्व प्रकारच्या धान्याची कोठारे, औषधांचे संग्रह, वस्त्रांचे साठे भरपूर प्रमाणात आहेत, तसेच अनेक व्यापारी आणि सावकार ज्या गडावर उपलब्ध आहेत अशा सुरक्षित गडावर राजाने सदैव वास्तव्य करावे.

ज्या रायगडावर शिवाजी महाराजांचे वास्तव्य होते, त्या गडावर वरील श्लोकात सांगितलेल्या सर्वच गोष्टींची व्यवस्था महाराजांनी केलेली होती. व्यापारी आणि सावकार यांच्यासाठी रायगडावर केलेली व्यवस्था आजही पाहायला मिळते. " साहुकार हे तो राज्य आणि राज्यश्रीची शोभा" हे आज्ञापत्रातील वचन वरील श्लोकाशी सुसंगत असेच आहे.

हा श्लोक मूलतः मत्स्यपुराणातील आहे.

॥ इति दुर्गनिरुपणम् ॥
(अशा प्रकारे हे दुर्गांविषयीचे निरूपण इथे समाप्त झाले.)

अथ बलनिरूपणम्। तच्चबलं षड्विधम्।
(आता बल म्हणजेच सैन्याविषयी निरूपण करीत आहोत. बल(सैन्य) हे सहा प्रकारचे असते.)

श्लोक क्र १८५
षड्विधं तु बलं व्यूह्य द्विषतोभिमुखं व्रजेत्॥
राजाने आपल्या सैन्याची सहा प्रकारची व्यूहरचना करून शत्रुसैन्याला सामोरे जाण्यासाठी सिद्ध राहावे.

॥ इति षड्विधं बलं ॥
(आता सैन्याच्या सहा प्रकारांविषयी सांगत आहोत.)

श्लोक १८६
मौलं भूतं श्रेणि सुहृद् द्विषदाटविकं बलम्।
पूर्वं पूर्वं गरीयस्तु बलानां विषमं स्मृतम्॥

अर्थ~सैन्याचे सहा प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.
१. मौल बल - म्हणजेच मूळचे अर्थात परंपरेने प्राप्त झालेले अथवा अस्तित्वात असलेले सैन्य.
२. भूत बल - ऐश्वर्य असेपर्यंत राहणारे(नंतर भरती केलेले) सैन्य.
३. श्रेणि बल - युद्धासाठी मार्गस्थ होण्याच्या तयारीत असलेले(स्थानापन्न) सैन्य.
४. सुहृद् बल - मित्र(सहकारी) पक्षांचे सैन्य.
५. द्विषद बल - शत्रूच्या ताब्यात गेलेले आपले सैन्य.
६. आटविक बल - अरण्यात(वनांत) तैनात असलेले सैन्य.
यातील आधी वर्णन केलेली सैन्ये अधिक महत्वाची मानावी. सैन्याची ही क्रमवारी ही त्यांच्या श्रेष्ठतेनुसार लावलेली आहे. तसेच या क्रमवारीतील विषमस्थानी असणारी सैन्ये देखील अधिक महत्वाची मानली जातात.
सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत.

उक्तस्य च तस्य चतुरङ्गतामाह।
(आता त्याच्या(सैन्याच्या) चार अंगांविषयी निरूपण.)

श्लोक क्र १८७
हस्त्यश्वरथपादातं सेनाङ्गं स्याच्चतुर्विधम्॥

अर्थ~सैन्याची अंगे चार प्रकारची आहेत. ती पुढीलप्रमाणे...
१. गज दल(हस्ति दल)
२. अश्व दल(घोडदळ)
३. रथ दल
४. पायदळ
चतुरंग सेना म्हणजे वरील चारही दलांनी सज्ज अशी सेना.

॥इति बलम्॥
(सैन्याविषयीचे निरूपण समाप्त)

बलस्य सेनापत्यधीनत्वात् सेनापतिलक्षणमाह।
(सेनापतीच्या नियंत्रणात सेना असल्याने आता सेनापतींची लक्षणे सांगत आहोत.)
श्लोक क्र १८८
कुलीन: शीलसंपन्नो धनुर्वेदविशारद:।
हस्तिशिक्षादिकुशलो नित्यं हि श्लक्ष्णभाषित:॥

अर्थ~राजाने कुलीन(घरंदाज), चारित्र्यसंपन्न, शीलवान, धनुर्विद्येत पारंगत असणारा, हत्ती आणि घोडे यांच्या शिक्षणाविषयी उत्तम ज्ञान असणारा(हत्ती आणि घोडे यांचा कुशल प्रशिक्षक) आणि नेहमी सुंदर(आकर्षक) आणि मृदुपणे भाष्य करणारा असा सेनापती नियुक्त करावा.

हा श्लोक मत्स्यपुराण आणि विष्णुधर्मोत्तर पुराण या दोन्ही ग्रंथांतील श्लोकांशी साधर्म्य साधणारा आहे.

बलस्य सेनापत्यधीनत्वात् सेनापतिलक्षणमाह।
(सेनापतीच्या नियंत्रणात सेना असल्याने आता सेनापतींची लक्षणे सांगत आहोत.)

श्लोक क्र १९१
एवं ये कुशलं शूरं हिते स्थितमकल्मषम्।
सेनापतिं प्रकुर्वन्ति ते जयन्ति रणे रिपून्॥

अर्थ~अशा तऱ्हेने जे राजे निष्णात, शूर, (राज्याचे) हित जपणाऱ्या आणि निष्कपट अशा उत्तम व्यक्तिमत्त्व असलेल्या सेनानीस सेनापती म्हणून नेमतात ते युद्धांत नेहमी शत्रूंवर विजय मिळवतात.

श्लोक क्र १९२
बृहस्पतिसमं बुद्ध्याक्षमया पृथिवीसमम्।
समुद्रमिवगाम्भीर्ये हिमवन्तमिवाचलम्॥

श्लोक क्र १९३
प्रजापतिमिवौदार्ये तेजसा भास्करोपमम्।
महेन्द्रमिव शत्रूणां ध्वंसनं शरवृष्टिभि:॥

अर्थ~वरील दोन श्लोकांत सेनापतीच्या ठायीं आवश्यक अशा लक्षणांविषयी भाष्य केले आहे.

राज्याचा सेनापती हा बृहस्पतीप्रमाणे बुद्धिमान, पृथ्वीप्रमाणे क्षमाशील, समुद्राप्रमाणे गंभीर आणि हिमालय पर्वताप्रमाणे स्थिर, अविचल(विचलित न होणारा) असा असावा.(श्लोक क्र १९२)

तसेच सेनापती हा प्रजापती म्हणजेच ब्राह्मदेवाप्रमाणे उदार आणि सुर्याप्रमाणे तेजस्वी असावा. सेनापती हा बाणांचा वर्षाव करून शत्रूंचा सर्वनाश करणाऱ्या महेंद्राप्रमाणे(महेंद्र म्हणजे देवराज इंद्रदेव) शूर आणि सदैव विजय प्राप्त करणारा असावा.(श्लोक क्र १९३)

हे श्लोक मूलतः अनुपुराण या ग्रंथातील आहेत.

॥इति सेनापतिलक्षणम्॥
(या ठिकाणी हे सेनापतींच्या विषयीचे निरूपण समाप्त झाले.)

अथ राजकृत्यनिरूपणम्।
(आता राजाच्या कृतीविषयी निरूपण पुढीलप्रमाणे...)

श्लोक क्र २००
श्रुत्वा तिथीभग्रहवासरं च प्राप्नोति धर्मार्थयशांसि सौख्यम्।
आरोग्यमायुर्विजयं जयं च दु:स्वप्ननाशं च तथा विदध्यात्॥

अर्थ~राजाने सकाळी उठल्यानंतर करावयाची कृत्ये या प्रकरणात सांगितली आहेत.

सकाळी आपल्या राजज्योतिषांकडून दिवसाचे पंचांग श्रवण केल्यानंतर त्या दिवसाची तिथी, नक्षत्र, ग्रह, वार इत्यादीविषयी योग्य ती माहिती ऐकून घेतल्याने राजाला धर्म, अर्थ, कीर्ती आणि सुख इत्यादी प्राप्त होतात. आरोग्य, आयुष्य, जय, विजय आणि दुष्ट स्वप्नांचे निराकरण यामुळे साध्य होते.

श्लोक क्र २०१
प्रणम्य देवांश्च गुरुंश्च सर्वान्दत्त्वा च गां वत्सयुतां द्विजाय।
दृष्ट्वा सुखं सर्पिषि दर्पणे च सर्पिश्च दद्यात्सहिरण्यमेव।।

अर्थ~यानंतर राजाने देवदेवतांना, गुरूंना आणि सर्वांना प्रणाम करून, द्विजास(ब्राह्मणास) वासरासह गाय दान देऊन, (गायीच्या) तुपात आणि आरशात आपला चेहरा पाहून तूप, सोने आणि आरसा यांचे दान करावे.

अर्थातच या श्लोकांत ब्राह्मण हा शब्द 'जात' या अर्थाने नव्हे तर 'वर्ण' या अर्थाने योजलेला आहे. जन्माने ठरते ती जात आणि गुणाने, कर्माने ठरतो तो वर्ण. संभाजी महाराजांचे नाव घेऊन ब्राह्मणविरोधाचे(म्हणजेच जातीय द्वेषाचे) काम करणाऱ्यांना संभाजी महाराजांचे हे विचार मान्य होणे तर दूर समजणे देखील अवघड आहे.

अथ राजकृत्यनिरूपणम्।
(आता राजाच्या कृतीविषयी निरूपण पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र २०४
कथिता: सततं राजन् राजानश्चारचक्षुष:।
स्वके देशे परे देशे ज्ञानशीलान्विचक्षणान्।।

श्लोक क्र २०५
वणिजो मन्त्रकुशलान् सांवत्सरचिकित्सकान्।
तथा प्रव्रजिताकारान् (श्चारान्राजा नियोजयेत्।।

अर्थ~यासाठी म्हणूनच सर्व राजे नेहमी आपल्या हेरांच्या द्वारेच संपूर्ण राजकीय वृत्त जाणतात. म्हणूनच गुप्तहेरांना राजाचे डोळे मानले जाते. म्हणूनच आपल्या देशात असो अथवा परक्या देशात, राजाने अशाच गुप्तहेरांची नेमणूक करावी जे स्वभावत: ज्ञानसंपन्न आणि चतुर असतील.(श्लोक क्र २०४)

जे लोक(गुप्तहेर म्हणून काम करणारे) व्यापारी, मंत्रविद्येचे जाणकार, सल्लामसलत करण्यात पारंगत, वर्षभविष्य जाणणारे आणि आरोग्यविषयक चिकित्सा करण्याचे ज्ञान असणारे आहेत. तसेच जे संन्यस्त वृत्तीचे आणि विविध वेष धारण करून बातम्या देणाऱ्या लोकांना राजाने स्वराज्यात(स्वदेशात) तसेच परराज्यात गुप्तहेर म्हणून नेमावे.(श्लोक क्र २०५)
हे दोन्ही श्लोक मूलतः मत्स्यपुराणातील आहेत.

अथ राजकृत्यनिरूपणम्।
(आता राजाच्या कृतीविषयी निरूपण पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र २०६
न चास्य राजाश्रद्ध्यात् चारस्य प्रियभाषित:।
द्वयो: संबन्धमाज्ञाय श्रद्ध्यात् नृपति पतिस्ततः।।

अर्थ~परंतु राजाने कोण्या एकाच गुप्तहेराच्या गोड बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवू नये. तर त्यातील परस्परांना अज्ञात(न ओळखणाऱ्या) किमान दोन वेगवेगळ्या गुप्तहेरांची मते जाणून घेऊनच त्यावर विश्वास ठेवावा.
सदर श्लोक हा मुळात मत्स्यपुराणातील आहे.

अथ राजकृत्यनिरूपणम्।
(आता राजाच्या कृतीविषयी निरूपण पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र २०९
निर्गच्छेयुर्विशेयुश्च सर्ववार्ताविदो ह्यत:।
चारा: सकाशं नृपतेश्चक्षुर्दूरचरं हि तत्॥
अर्थ~सर्वांची वार्ता(खबर) ठेवणारे, सर्वत्र प्रवेश करू शकणारे आणि सर्वांची बातमी आणणारे गुप्तहेर कुठेही जातात आणि आपल्या राजाला अचूक माहिती देतात. म्हणूनच गुप्तहेर हे राजाच्या जवळ असलेले परंतु दूरवरचे पाहू शकणारे असे डोळेच असतात.

सदर श्लोक हा कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेला आहे.

शिवाजी महाराजांच्या यशात त्यांच्या गुप्तहेर खात्याचा सिंहाचा वाटा आहे. शिवाजी महाराज त्यांच्या हेरखात्यावर मोठ्या प्रमाणावर खर्च करत असत असे इंग्रजांनी देखील त्यांच्या पत्रांतून म्हटलेले आहे. अत्यंत अल्प साधनसामुग्री आणि अत्यल्प संख्याबळ असतानाही शिवाजी महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत मोठे यश संपादन केले ते या हेरांच्याच बळावर. आपल्या हेरांच्या द्वारे शत्रूविषयी अचूक माहिती प्राप्त करून आणि त्यावर पूर्ण अभ्यास करून शिवाजी महाराज युद्धाची आखणी करत असत आणि तेच त्यांच्या यशाचे रहस्य होते.

पुरोहितादीनां लक्षणान्याह।
(राजपुरोहित आणि काही इतरांची लक्षणे...)

श्लोक क्र २१५
वेदवेदाङ्गतत्त्वज्ञो जपहोमपरायण:।
आशीर्वादपरो नित्यं एष राजपुरोहित:॥

अर्थ~राजपुरोहित हा वेद-वेदांग-सिद्धान्त जाणणारा, जप-होम यांमध्ये रुची ठेवणारा आणि राज्याच्या कल्याणासाठी सदैव आशीर्वाद देण्यास तत्पर असा असावा.
मूळ श्लोक शारङ्गधर पद्धति या ग्रंथातील आहे.

अथ धर्माधिकारी:।
(आता धर्माधिकाऱ्याविषयी...)
श्लोक क्र २१६
सम: शत्रौ च मित्रे च धर्मशास्त्रविशारद:।
विप्रमुख्य: कुलीनश्च धर्माधिकरणी भवेत्॥

अर्थ~शत्रू आणि मित्र यांच्याबद्दल समान धोरण ठेवणारा, धर्मशास्त्राचे पूर्ण ज्ञान असणारा, विद्वान लोकांमध्ये अग्रगण्य आणि चांगल्या कुळात जन्मलेला असा धर्माधिकारी राजाने नेमावा. शिवाजी महाराजांना तसेच संभाजी महाराजांना उगाचच "निधर्मी" म्हणून लेबले लावणाऱ्यांनी संभाजी महाराजांचे वरील श्लोकांत दिलेले विचार अवश्य अभ्यासावे.
मूळ श्लोक मत्स्यपुराणातील आहे.

भिषक्:
(वैद्य)
श्लोक क्र २१९
पारम्पर्यागतो य: स्यादष्टाङ्गेषु चिकित्सिते।
अनाहार्य: स वैद्य: स्यात् धर्मात्मा च कुलोद्गत:॥

अर्थ~आयुर्वेदाच्या आठ अंगांचे(आठ प्रकारच्या चिकित्सा पद्धतींचे) ज्ञान ज्याला वंशपरंपरेने प्राप्त झाले आहे, जो सहजासहजी कोणालाही वश, अंकित, अनुकूल अथवा फितूर होत नाही, जो धर्मशील(धर्माच्या तत्वांचे पालन करणारा) आहे आणि जो उत्तम कुळात जन्मलेला आहे असाच वैद्य राजाने नेमावा.

आयुर्वेदाची आठ अंगे पुढीलप्रमाणे आहेत...
१. शल्य-शरीरातील वस्तू बाहेर काढण्याची शस्त्रक्रिया.
२. शालाक्य-सळईने औषधाचा वापर करून कान, नाक, डोळे इत्यादी अवयवांची चिकित्सा.
३. काय चिकित्सा-ताप(ज्वर), अतिसार इत्यादी आजारांची चिकित्सा.
४. भूतविद्या-सूक्ष्म अशा जीवाणूंच्या शरीरात प्रवेश होणाऱ्या व्याधींसंबंधी चिकित्सा.
५. कौमारभृत्यम्-कुमारांच्या म्हणजेच बालकांच्या आजारांविषयी चिकित्सा.
६. अगद तंत्रम्-विषांची चिकित्सा.
७. रसायन तंत्रम्-वृद्धत्वावर उपाय म्हणून बलवर्धक औषधांची चिकित्सा.
८. वाजीकरण तंत्रम्-प्रजा बलवान व्हावी म्हणून शुक्राचे सामर्थ्य निर्माण करण्याची चिकित्सा.

वरील आठ अंगे म्हणजेच चिकित्सेचे प्रकार आयुर्वेदाने सांगितले आहेत.
हा श्लोक मुळात मत्स्यपुराणातील असून संभाजी महाराजांनी अत्यंत विचारपूर्वक हा श्लोक आपल्या बुधभूषण या राजनीतिपर ग्रंथात समाविष्ट केलेला आहे.

खड्गधारिणो निकटवर्तित्वात्तल्लक्षणमाह।
(राजखड्गधारी हा राजाच्या संरक्षणार्थ शेजारीच असल्याने त्याचीही लक्षणे सांगत आहोत.)

श्लोक क्र २२३
सुरुपस्तरुण: प्रांशुर्दृढभक्त: कुलोद्भव:।
शूरश्चैव सहश्चैव खड्गधारी प्रकीर्तित:॥

अर्थ~रूपाने जो सुंदर, तरुण, उंचापुरा, राजविषयी दृढ भक्तिभाव बाळगणारा(पूर्ण विश्वास ठेवण्यास पात्र), उत्तम कुळात जन्मलेला(कुलोद्भव), शूर(पराक्रमी), क्लेश-कष्ट-सहिष्णू(ताणतणाव सहन करणारा) आणि धाडसी असा पुरुष राजाने खड्गधारी म्हणून नियुक्त करावा.

श्लोक क्र २२४
प्रांशवो व्यायता:शूरा दृढभक्ता निराकुला:।
राज्ञा तु रक्षिण: कार्या: सदा क्लेशसहा हिता:॥

अर्थ~या श्लोकांत देखील राजाच्या संरक्षणार्थ अंगरक्षक म्हणून काम करणाऱ्या खड्गधाऱ्यांविषयी विवेचन केलेले आहे.

उंचेपुरे, भव्य देहयष्टी असणारे(व्यायामाने शरीरसंपदा धारण करणारे), शूर, राजाविषयी मनांत दृढ भक्तिभाव बाळगणारे, विश्वासू, राजाची सेवा करण्याविषयी आसक्त, उत्तम घराण्यात जन्मलेले, तेजस्वी, अव्यग्र चित्तशील, अखंड कष्ट सहन करण्यास सक्षम, राजाच्या कल्याणार्थ सदैव काम करणारे आणि कधीही दुःखात अथवा संभ्रमात न पडणारे असे स्थिर बुद्धीचे पुरुष राजाने स्वतःच्या रक्षणासाठी नेमावेत.
दोन्ही श्लोक मूलतः मत्स्यपुराणातील आहेत.

अत्रैव प्रसङ्गात्सकलसाधारणं सेवकलक्षणमुच्यते।
(आता प्रसंगानुरूप साधारण सेवक लक्षणे वर्णन करीत आहोत.)
श्लोक क्र २२६
ताडितोपि दुरुक्तोपि दण्डितोपि महीभुजा।
न चिन्तयति य: पापं स भृत्योर्हो महीभुजाम्॥

अर्थ~राजाने मारले, कठोर शब्दांत कान उघाडणी केली अथवा दंड(शिक्षा) केला तरीही ज्या राजसेवकाच्या मनात राजाच्या विषयी पापभावना(चुकीची भावना) निर्माण होत नाही, तोच खरा राजसेवक होय.

श्लोक क्र २२७
भर्तुर्धासने र्धैर्मुहुर्नान्यत्र तिष्ठति।
ब्रूयान्न किंचिदन्योन्यं तिष्ठेच्चास्यं विलोकयन्॥

अर्थ~स्वामींच्या(राजाच्या) आसनस्थानाजवळ उभ्या असणाऱ्या सेवकाने इकडे-तिकडे वारंवार न पाहता, 'स्वामी(राजा) काय आज्ञा काढतात?' या उत्सुकतेने त्यांच्याकडेच आपली दृष्टी स्थिर ठेवून सावधपणे पाहत राहावे.

राजसेवकाचे ध्यान केवळ राजाच्या आज्ञेकडेच असावे. इतरत्र त्याने ध्यान देऊ नये असे संभाजी महाराजांनी या श्लोकाद्वारे सांगितले आहे. हा श्लोक मूलतः कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहे.

तेषां वृत्तमाह।
(त्यांच्या म्हणजेच सेवकांच्या वर्तनाविषयी...)

श्लोक क्र २२९
उच्चै: प्रहसनं कासंष्ठीवनं कुत्सनं तथा।
ज्रुम्भणं गात्रभङ्गं च परीस्फोटं च वर्जयेत्॥

अर्थ~राजसेवकाने राजाच्या समवेत असताना चारचौघात कसे वर्तन ठेवावे याचे विवेचन या श्लोकांत केलेला आहे. राजसभेमध्ये राजसेवकाने सर्व लोकांमध्ये मोठमोठ्याने(फिदीफिदी) अघळपघळ हसणे, बोलणे, खोकणे, खाकरणे, थुंकणे, शिंकरणे, जांभया देणे, निंदा नालस्ती करणे, आळोखे पिळोखे(अंग मोडणे) देणे, टिचक्या वाजवणे, बोटे मोडणे हे सर्व कटाक्षाने वर्ज्य करावे. राजसेवकाचे असे वर्तन व्यावहारिक शिष्टाचाराच्या विरोधात मानले गेले आहे. सेवकाच्या अशा वर्तनाने राजाचा मानभंग होतो.
या श्लोकात सांगितलेल्या सर्वच गोष्टी आजच्या व्यवसायीक/सार्वजनिक जीवनात देखील शिष्टाचाराच्या विरोधात मानल्या गेल्या आहेत.
सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेला आहे.
तेषां वृत्तमाह।
(त्यांच्या म्हणजेच सेवकांच्या वर्तनाविषयी...)

श्लोक क्र २३९
शाब्दलौल्यं च पैशून्यं नास्तिक्यं क्षुद्रता तथा।
चापल्यं च परित्याज्यं नित्यं राज्ञोनुजीविभि:॥

अर्थ~(त्याचप्रमाणे)राजसेवकाने शाब्दलौल्याचा म्हणजेच वाणीच्या चंचलपणाचा त्याग करावा. वाणीचा चंचलपणा म्हणजे विचार न करता एखाद्याविषयी वक्तव्य करणे, निराधार बोलणे. बोलण्यातील उथळपणा म्हणजे शाब्दलौल्य!

तसेच राजसेवकाने पाशवी वृत्ती(क्रुर वृत्ती अथवा रानटीपणा), कृपणता(मनाचा संकुचितपणा), नास्तिकता(परमेश्वरावरील श्रद्धेचा अभाव) आणि क्षुद्रता म्हणजेच कमी(हलक्या) दर्जाचे काम करण्याची वृत्ती, चापल्य म्हणजे घाई अथवा अस्थिरता या सर्व गोष्टींचा दक्षतापूर्वक त्याग करावा. वर उल्लेखिलेल्या बाबी राजसेवकाने आपल्या आचरणात कधीही येऊ देऊ नये.

राजसेवकाने "नास्तिकतेचा सदैव त्याग करावा" असे वरील श्लोकात सांगितले आहे. हे सत्य कथित फुरोगामी लोकांना हे फारसे रुचणारे नाही.

संभाजी महाराजांनी हा श्लोक मत्स्यपुराणातून आपल्या बुधभूषण या ग्रंथात समाविष्ट केला आहे.

इति सर्वसाधारणसेवकवृत्ति:। अथ सभासदा:।
(इथेच राजसेवकांच्या वर्तनाविषयी निरूपण संपले. आता राजसभेच्या सभासदांच्या विषयी...)

श्लोक क्र २४०
धर्मशास्त्रार्थकुशला: कुलीना: सत्यवादिन:।
समा: शत्रौ च मित्रे च नृपते: स्यु: सभासदा:।।

अर्थ~राजसभेचे सभासद हे धर्मशास्त्राचा अर्थ पूर्णपणे समजून घेण्यास समर्थ आणि कुशल असावेत. त्याचबरोबर ते चित्तवृत्तीने विशुद्ध, चांगल्या कुळात जन्मलेले, नेहमी सत्य बोलणारे आणि मित्र आणि शत्रू यांच्याविषयी समत्व बुद्धी राखणारे असे असावेत.
राजसभेचे सभासद हे धर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक, जाणकार असावेत असे या श्लोकांत स्पष्ट म्हटले आहे.
कथित फुरोगाम्यांना हा देखील एक प्रकारे धक्काच आहे. विशेषतः संभाजी महाराजांची प्रतिमा निधर्मी म्हणून रंगविणाऱ्या लोकांचा प्रचार खोटा ठरवणारा हा श्लोक आहे.

श्लोक क्र २४१
तस्मात्सभ्य: सभां गत्वा रागद्वेषविवर्जित:।
वचस्तथाविधं ब्रूयादन्यथा नरकं व्रजेत्।।

अर्थ~म्हणून, राजसभेच्या सभासदाने राजसभेत उपस्थित राहून राग, लोभ आणि द्वेष या भावना बाजूला ठेवून वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणे(समत्व बुद्धीने) बोलावे. तसे न केल्यास तो(सभासद) नक्कीच नरकात जातो.

दोन्ही श्लोक मूलतः शार्ङ्गधर पद्धति या ग्रंथातील आहेत.

अथ सभासदा:।
(आता राजसभेच्या सभासदांच्या विषयी...)
नीतिशास्त्रस्य स्पष्टार्थत्वात्तत्क्रमेभिनिवेश: कार्य:।
(नीतिशास्त्राच्या सुस्पष्ट अर्थाच्या योगाने क्रमांकित अभिनिवेशकार्य...)
श्लोक क्र २४२
मेधावी वाक्पटुर्धीमांल्लघुहस्तो जितेन्द्रिय:।
शस्त्रशास्त्रपरिज्ञाता एष लेखक उच्यते।।

अर्थ~लेखक कोणाला म्हणावे याविषयीचे विवेचन या श्लोकांत संभाजी महाराजांनी केलेले आहे.

मेधा म्हणजे अत्युच्च प्रतीची बुद्धिमत्ता. मेधावी म्हणजे अत्यंत बुद्धिमान असा विचारवंत. जो अत्यंत बुद्धिमान, धारणायुक्त, चिंतनशील, विचारशील, बोलण्यात चतुर, हलक्या हाताचा(हाताने भराभर लिहू शकणारा), इंद्रियांना वश(नियंत्रित) करून ताब्यात ठेवणारा, शस्त्र आणि शास्त्र या दोन्हींचा उत्तम जाणकार असा लेखक हा उत्तम मानण्यात येतो.

संभाजी महाराजांच्या मते लेखकाला केवळ शास्त्रांचे नव्हे तर शस्त्रांचे(आयुधांचे) देखील ज्ञान असले पाहिजे. लेखकांच्या ठायीं पुरेशी क्षात्रवृत्ती असणे संभाजी महाराजांना अभिप्रेत आहे.

राज्यातील लेखकांनी राष्ट्राला उपकारक असेच लिखाण करावे, तसेच वेळप्रसंगी लेखणीच्या ऐवजी हाती शस्त्र घेऊन राष्ट्राच्या रक्षणार्थ उभे राहण्याची सिद्धता(तयारी) त्यांनी ठेवावी असे संभाजी महाराजांना या श्लोकांत सांगायचे आहे.
हा श्लोक मूलतः शार्ङ्गधर पद्धति या ग्रंथातील आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)

श्लोक क्र २४९
चत्वारि राज्ञा तु महाबलेन वर्ज्यान्याहु:
पण्डितस्तान्निबन्ध्यात्।
अल्पप्रज्ञै: सह मन्त्रं न कुर्यान्न
दीर्घसूत्रैरलसैश्चारणैश्च॥

अर्थ~राजाने पुढील चार बाबींचा मोठ्या ताकतीने त्याग करावा. त्यातूनही जर राजा या चार गोष्टींच्या नादी लागलाच तर विद्वान लोकांनी त्याच्यावर निर्बंध घालावेत.

त्या चार बाबी पुढीलप्रमाणे...
१. अल्पमतीच्या(संकुचित बुद्धीच्या) लोकांशी सल्लामसलत न करणे.
२. दिर्घसूत्री(चेंगट) वृत्तीच्या माणसांसोबत सल्लामसलत न करणे.
३. आळशी लोकांशी सल्लामसलत न करणे.
४. भाट(स्तुतीपाठक) लोकांशी सल्लामसलत न करणे.

इति भारतेपि:।
(महाभारतात सुद्धा हेच सांगितले आहे.)

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)
इति भारतेपि:।
(महाभारतात सुद्धा हेच सांगितले आहे.)

श्लोक क्र २५०
धर्म: प्रागेव चिन्त्य: सचिवगतिमति सर्वदा चिन्तनीये
ज्ञेयं लोकानुवृत्तं चरनयनैर्मण्डलं वीक्षणीयम्।
प्रच्छाद्यौ रागरोषौ मृदुकठीणरसौ योजनीयौ स्वकाले
आत्मा यत्नेन रक्ष्यो रणभुवि च परं सोपि नापेक्षणीय:॥

अर्थ~राजाने कोणत्या कर्तव्यांचे पालन करावे याचे विवेचन या श्लोकांत संभाजी महाराजांनी केले आहे.

राजाने सर्वप्रथम धर्माचा विचार करावा. सचिवांच्या मताचा देखील विचार करावा. लोकांची प्रवृत्ती गुप्तहेररुपी डोळ्यांच्या द्वारे जाणून घ्यावी. तसेच राज्याची पाहणी देखील गुप्तहेरांच्या रूपाने असणाऱ्या डोळ्यांनी करावी. राज्यकारभार करताना राग, प्रेम(लोभ), द्वेष इत्यादी भावना बाजूला ठेवून काम करावे. राज्याच्या

हितासाठी योग्य वेळी कठोर आणि कोमल रसाचा(भावनांचा) उपयोग करावा. प्रत्येकाचे संगोपन, पोषण एक आत्मा(ईश्वरी अंश) म्हणून अवश्य केले जावे परंतु युद्धभूमीवर(रणांगणात) तसा विचार कधीही करू नये.

आत्म्याच्या रूपाने प्रत्येक जीवाच्या ठायीं ईश्वरी अस्तित्व वास करते हा आपल्या धर्माने शिकविलेला विचार आहे. हा विचार आध्यात्मिकदृष्ट्या योग्यच आहे. परंतु युद्धभूमीवर शत्रूच्या बद्दल असा विचार कधीही करू नये, हा अत्यंत व्यावहारिक विचार या श्लोकांत सांगितलेला आहे.

दुर्दैवाने अलीकडच्या काळात सहिष्णुतेच्या गोंडस नावाखाली आपल्या देशाच्या शत्रूचे नको ते लाड पुरवले गेल्याचे आपण पाहिलेले आहे. अगदी कालपरवा रमजानच्या काळात सीमेवर केलेली शस्त्रसंधी(बंदी) हे त्याचेच उत्तम उदाहरण होय. हा राष्ट्रघातकी विचार संभाजी महाराजांनी या श्लोकाद्वारे वर्ज्य मानलेला आहे. संभाजी महाराजांच्या राजनीतीपर विचारांचा अभ्यास करणे त्यासाठीच आवश्यक आहे.

हा श्लोक शारङ्गधर पद्धति या राजनीतीपर ग्रंथातील श्लोकावर आधारीत आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)

उक्तं च।
(म्हटलेच आहे की...)

श्लोक क्र २५३
प्रियं ब्रूयादकृपण: शूर: स्यादविकत्थन:।
दाता नापात्रवर्षी स्यात्प्रगल्भ: स्यादनिष्ठुर:॥

अर्थ~राजाने लोकांना प्रिय वाटेल असेच बोलावे. त्याने मनाचा संकुचितपणा(क्षुद्रता) दाखवू नये. त्याने अकृपण(कृपण नसावे) म्हणजेच दानशूर असावे. राजाने शूर असावा परंतु बढाई मारणारा नसावा. राजा दानशूर असावा परंतु त्याने अयोग्य माणसांवर दानकृपा करू नये. दान स्वीकारणाऱ्या माणसाची पात्रता पाहूनच त्यास दान करावे. राजाने धीट(धाडसी) अवश्य असावे परंतु निर्दय असू नये.

श्लोक क्र २५४
संदधीत न नाचार्यं विगृह्णीयान्न बन्धुभि:।
नाभक्तं जनयेच्चारं कुर्यात्कार्यमपीडनम्॥

अर्थ~राजाने आचार्यांशी संधान बांधू नये, आपल्या आप्तांशी/नातेवाईकांशी भांडू नये. स्वकीयांशी शक्यतो वितुष्ट बाळगू नये. भक्तिहीन(अश्रद्ध/नास्तिक) व्यक्तीला गुप्तहेर बनवू नये आणि कोणालाही त्रास न देतां आपले काम करावे.

राजा म्हणजे आजच्या अर्थाने राजकीय, औद्योगिक अथवा अन्य क्षेत्रांत नेतृत्व करणारी मंडळी. या सर्वांना अत्यंत मार्गदर्शक असे विचार संभाजी महाराजांनी वरील श्लोकांत सांगितले आहेत.

स्वकीयांशी/आप्तांशी शक्यतो शत्रुत्वाची भावना बाळगू नये असे देखील म्हटले आहे. शिवाजी महाराजांनी नेहमीच शत्रूच्या पक्षात काम करणारे, आपले सावत्र बंधू व्यंकोजीराजे आणि मेव्हणे बजाजीराजे निंबाळकर यांच्याशी स्नेहपूर्ण संबंध ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामागे देखील या श्लोकांत सांगितलेला विचार आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)

उक्तं च।
(म्हटलेच आहे की...)
श्लोक क्र २५५
अर्थं न वा सत्सु वदेद्गुणान्ब्रूयान्न चात्मन:।
आदद्यान्न च साधुभ्यो नासत्पुरुषमाश्रयेत्।।

अर्थ~राजाने सज्जन लोकांसमोर आपल्या संपत्तीचा(श्रीमंतीचा) उल्लेख कधीही करू नये, तसेच आपल्या सद्गुणांची प्रौढी मिरवू नये, सज्जन लोकांकडून काहीही घेऊ नये आणि दुर्जनांना आश्रय देऊ नये.

श्लोक क्र २५६
नापरीक्ष्य नयेद्दण्डं न च मन्त्रं प्रकाशयेत्।
विसृजेन्न स लुब्धेभ्यो विश्वसेन्नापकारिषु।।

अर्थ~राजाने योग्य ती परीक्षा(चौकशी) न करतां कोणालाही शिक्षा ठोठावू नये, सल्लामसलत गुप्त राखावी(बाहेर वाच्यता करू नये), लोभी लोकांना दान करू नये आणि अपकार करणाऱ्यांवर(कृतघ्न लोकांवर) कधीही विश्वास ठेवू नये.

हे दोन्ही श्लोक संभाजी महाराजांनी स्वतः रचलेले असून राज्यकारभार आणि राजकर्तव्ये यांविषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन त्यांनी या श्लोकांत केलेले आहे. म्हणूनच 'बुधभूषण' हा ग्रंथ आजच्या राज्यकर्त्यांना देखील मार्गदर्शक आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)
उक्तं च।
(म्हटलेच आहे की...)

श्लोक क्र २५९
सेवेदप्रणयं हित्वा दक्ष: स्यात्तत्त्वकालवित्।
सान्त्वयेन्न च मोघाय अनुगृह्णन्न च क्षपेत्।।

अर्थ~राजाने प्रीतिहीनता सोडून देऊन सेवा करावी, काल-योजना जाणून घेऊन सावध राहावे, फुकट्या लोकांचे सांत्वन करण्याच्या फंदात पडू नये आणि कोणावरही कृपा करताना गर्विष्ठ बनू नये.

श्लोक क्र २६०
प्रहरेन्नच विद्वत्सु न दहेन्न च शोषयेत्।।

अर्थ~राजाने आपल्या देशातील विद्वानांवर कधीही प्रहार करू नये, त्यांना कधीही क्रोधीत करू नये आणि त्यांचे शोषण देखील करू नये.
विद्वान लोकांना अत्यंत सन्मानाने वागवावे असेच संभाजी महाराजांना या श्लोकाद्वारे म्हणायचे आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)
तथा च कामन्दक:।
(कामंदकाचे पण तसेच मत आहे.)

श्लोक क्र २६२
नावर्तयेन्नहुर्मन्त्रं संरक्षेत्परितस्तु सन्।
अरक्ष्यमाणं मन्त्रं हि भिनत्त्यात्मपरंपरा॥

राजाने मंत्रीगणांशी केलेल्या गुप्त विचारविनिमयाची(मंत्रणेची) वाच्यता(वारंवार) कधीही करू नये. राजाने सर्वतोपरी त्या विचारविनिमयाच्या गुप्ततेचे रक्षण करावे. जेव्हा या मंत्रणेचे रक्षण केले जात नाही तेव्हा तो राजा स्वतःच्या राज्याच्या परंपराच मोडतो आणि परिणामी राज्यच्युत(राज्यपासून दूर) होतो.

श्लोक क्र २६३
मद: प्रमाद: कामस्तु सुप्ति: प्रलपितानि च।
हन्ति मन्त्रं प्रविच्छिन्ना: कामिन्योवनितास्तथा॥

अर्थ~मस्ती, चुकीचे वर्तन(गफलत), कामवासना, झोप, अति बोलण्याची(बडबड) सवय इत्यादी वाईट सवयींमुळे गुप्त मंत्रणा(सल्लामसलत) फुटते. तसेच या सवयींमुळे राजस्त्रियांशी केलेली सल्लामसलत(चर्चा) देखील फुटते आणि सर्वत्र पसरते.
राज्यव्यवहाराविषयी राजाने मंत्रीगण आणि राजस्त्रिया यांच्याशी केलेल्या चर्चेची गुप्तता राखणे आवश्यक असते हेच वरील दोन्ही श्लोकांतून संभाजी महाराजांना सांगायचे आहे.

हे दोन्ही श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)
तथा च कामन्दक:।
(कामंदकाचे पण तसेच मत आहे.)
श्लोक क्र २६४
द्वादशेति मनु: प्राह षोडशेति बृहस्पति:।
उशना विंशतिरिति मन्त्रिणां मन्त्रमण्डलम्॥

अर्थ~राजाचे मंत्रिमंडळ किती लोकांचे असावे याविषयी विविध मान्यवरांचे मत या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे.

राजाचे मंत्रिमंडळ हे बारा जणांचे असावे असे मनुचे विधान आहे. मंत्रिमंडळ सोळा जणांचे असावे असे बृहस्पति म्हणतो तर मंत्रिमंडळात वीस जणांचा समावेश असावा असे उशना म्हणतो.

श्लोक क्र २६५
यथा समूह(संभव)मित्यन्ये तत्प्रविश्य यथाविधी।
मन्त्रयेताहितमना: कार्यसिद्धिविवृद्धये॥

अर्थ~याविषयी अन्य काही लोकांचे मत असे आहे की, मंत्रिमंडळासाठी जितके मंत्री उपलब्ध होतील तितके त्यात समाविष्ट करावेत. त्यांचा यथाविधी मंत्रिमंडळात प्रवेश केल्यानंतर जास्तीतजास्त कार्यसिद्धीसाठी आणि कार्यवृद्धीसाठी त्यांचा उपयोग करण्याच्या दृष्टीने सावधपणे राजाने विचारविनिमय करावा.

शिवछत्रपतींनी मात्र राज्याभिषेकसमयीं आठ मंत्र्यांचे मंत्रिमंडळ निर्माण केले हे सर्वश्रुत आहे. पुढे संभाजी महाराजांच्या काळात देखील मंत्रिमंडळात आठच मंत्री होते. शिवछत्रपतींचे मंत्रिमंडळ 'अष्टप्रधान मंडळ' या नावाने ओळखले जाते.
हे दोन्ही श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)

तथा च कामन्दक:।
(कामंदकाचे पण तसेच मत आहे.)

श्लोक क्र २६९
न कार्यकालं मतिमानतिक्रामेत् कर्हिचित्।
कथंचिदेव भवति कार्ये योग: सुदुर्लभ:॥

अर्थ~बुद्धिमान राजाने कर्तव्यपूर्तीची/कार्यपूर्तीची वेळ निष्क्रिय न राहतां व्यर्थ जाऊ देऊ नये. एकदा कार्यपूर्तीची वेळ टळली की पुन्हा तो योग जुळवून आणणे अत्यंत कठीण असते. किंबहुना तसे क्वचितच घडते.

श्लोक क्र २७०
सतां मार्गेण मतिमान् काले कर्म समाचरेत्।
काले समाचरन् साधु रसवत्कृत्फलमश्नुते॥

अर्थ~बुद्धिमान राजाने संतसज्जनांनी दाखविलेल्या मार्गास अनुसरूनच आपला राज्यव्यवहार करावा. चांगल्या राजाने योग्य त्या वेळी जनतेची कामे केली तर वारंवार त्या सत्कृत्यांचे फळ त्याला अनुभवता येते.

शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजकीय जीवनात नेहमीच साधुसंतांनी दाखविलेल्या मार्गाचाच अवलंब केलेला आपल्याला दिसून येते. जगद्गुरू श्री तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी, मोरया गोसावी देव महाराज, पाटगावचे मौनी महाराज इत्यादी तात्कालीन साधुजनांचा शिवछत्रपतींनी सदैव अगत्याने परामर्श घेतलेला आहे.

मन्त्रयेत्सहमन्त्रिभिरियुक्तं तदेवाह।
(राजाची सहकारी मंत्र्यांसोबत अभिमंत्रणा...)
तथा च कामन्दक:।
(कामंदकाचे पण तसेच मत आहे.)

श्लोक क्र २७३
प्रगल्भ: स्मृतिमान् वाग्मी शस्त्रे शास्त्रे च निष्ठित:।
अभ्यस्तकर्मा नृपतेर्दूतो भवितुमर्हति॥

अर्थ~राजाचा दूत कसा असावा याचे विवेचन या श्लोकांत संभाजी महाराजांनी केलेले आहे.

धीट, प्रगल्भ बुद्धीचा, उत्तम स्मरणशक्ती असणारा, बोलण्यात पटाईत, शस्त्रास्त्रे आणि शास्त्रविद्या यांत पारंगत, अपार मेहनत करण्याची सवय असणाराच राजाचा दूत होण्यास योग्य आहे.

श्लोक क्र २७४
स दूत: शासनाद्गच्छैद्गन्तव्यमुत्तरोत्तरम्।
स्वराष्ट्रपरराष्ट्राणामिति चेति च चिन्तयन्॥

अर्थ~राजाच्या हुकुमावरून, 'हे आपले राज्य आहे' अथवा 'हे शत्रूचे राज्य आहे' असा नीट विचार करून, जेथे जायचे आहे तेथे जाण्यासाठी दूताने सदैव प्रयत्नशील राहावे.
दोन्ही श्लोक मूलतः कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत.

दूतकारणमाह कामन्दकः।
(कामंदकाने दूत प्रेषणाची(पाठविण्याची) कारणे सांगितली आहेत, ती पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र २८१
दुर्गकोशबलज्ञानं हृद्यपक्षोपसंग्रहः।
राज्यान्तरगतानां च आत्मसंस्कारणं तथा॥

अर्थ~राज्यातील गडदुर्ग, राज्याची संपत्ती(खजिना), सैन्यबल यांच्याविषयीची माहिती, हृद्य म्हणजे काळजातील लोक. अशा अत्यंत जवळच्या लोकांची सूची, युद्धासाठी आवश्यक आणि योग्य अशा शक्ती आणि स्थळ(प्रदेश) यांच्याविषयीची माहिती- हे सर्वांविषयी राजाला निवेदन करणे यालाच दूतकर्म असे म्हणतात.

श्लोक क्र २८२
युद्धाय सारभूज्ञानं दूतकर्मेति कथ्यते।
दूतेनैव नरेन्द्रस्तु कुर्वीतारिविकर्षणम्।
सपक्षे च विजानीयात्परदूतविचेष्टितम्॥

अर्थ~सारभूज्ञान म्हणजे युद्धासाठी अनुकूल प्रदेश अथवा स्थान शोधण्याचे ज्ञान. राजाने दूताने पुरविलेल्या माहितीच्या आधारेच शत्रूला युद्धात खेचावे(युद्धास प्रवृत्त करावे). दूताने पुरविलेल्या माहितीच्या आधारेच राजाने युद्धाचे स्थान निश्चित करावे. शत्रूने आपल्या राज्यात पाठविलेल्या दूतांच्या हालचालींविषयी तसेच स्वतःच्या बाजूच्या(स्वपक्षातील) दूतांच्या हालचालींविषयी राजाने माहिती करून घ्यावी.
शिवाजी महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवनात दूतांनी पुरविलेल्या माहितीचा अत्यंत खुबीने उपयोग करून अनेक युद्धांत विजय संपादन केले आहेत. सारभूज्ञान म्हणजे युद्धासाठी आपल्याला अनुकूल अशी जागा शोधणे आणि शत्रूला त्याच जागेवर युद्ध करण्यासाठी प्रवृत्त करणे. या तंत्राचा वापर देखील शिवछत्रपतींनी अनेकदा केल्याचे आपल्या ध्यानात येते. प्रतापगडचे युद्ध हे त्याचे आदर्श उदाहरण आहे.

सदर श्लोक मूलतः कामंदकीय नीतिसार या ग्रंथातील आहेत.

इति दूतकर्म।
(हे झाले दूतांच्या कामाविषयी...)

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)

श्लोक क्र २८३
विश्रम्भी नित्ययुक्तोपि निगूढाकारचेष्टितः।
प्रियाण्येवाभिभाषेत यत्कार्यम् कार्यमेव तत्॥

अर्थ~दूताने शत्रूपक्षाचा विश्वास प्राप्त करावा. दूत म्हणून कार्यरत असताना दूताने स्वतःची भूमिका आणि हालचाली गुप्त ठेवून सदैव सर्वांशी(शत्रूंशी देखील) गोड बोलावे, परंतु अंततः ज्या कामासाठी आपल्याला नियुक्त केले आहे तेच करावे.

श्लोक क्र २८४
यदा मन्येत मतिमान् हृष्टं पुष्टं स्वकं बलम्।
परस्य विपरीतं च तदा विग्रहमाचरेत्॥

अर्थ~जेव्हा बुद्धिमान राजाला असे वाटेल की, आपले सैन्यदल धष्टपुष्ट, आत्मविश्वासपूर्ण आणि योग्य ते पोषण मिळालेले आहे आणि शत्रूच्या सैन्याची अवस्था याच्या अगदी विरुद्ध आहे, त्यावेळी राजाने शत्रूंसह युद्धाला प्रारंभ करावा.

शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रभावीपणे ज्या युद्धतंत्राचा अवलंब केला त्या गनिमीकावा या युद्धप्रकारात तर शत्रूची स्थिती अडचणीची असताना त्याला युद्धाला प्रवृत्त करणे या गोष्टीला मोठे महत्त्व आहे.

शिवाजी महाराजांनी अशा प्रकारे अनेकदा शत्रूला कमजोर स्थितीत गाठून पराभूत केलेले आहे. उंबरखंडात कारतलबखानाचा केलेला पराभव असो अथवा बहलोलखानाचे पाणी अडवून त्याला अडचणीत आणून केलेला पराभव असो, शिवछत्रपतींनी वरील श्लोकांत सांगितलेल्या नीतीचा वापर केलेला आहे.

सदर श्लोक मनुस्मृति आणि कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)

श्लोक क्र २८५
भूमिर्मित्रं हिरण्यं च विग्रहस्य फलत्रयम्।
यदैतन्नियतं भावि तदा विग्रहमाचरेत्॥

अर्थ~भूमीप्राप्ती(भूप्रदेश जिंकणे), मित्रप्राप्ती(मित्रपक्षीय राजांचा लाभ) आणि हिरण्यप्राप्ती(म्हणजे सोने, चांदी, हिरे, द्रव्य इत्यादींची प्राप्ती) ही तीन युद्धाची फळे(प्राप्ती/परिणाम) आहेत. ज्यावेळी ही तीन फळे मिळण्याचा आत्मविश्वास असेल तेव्हा राजाने शत्रूशी युद्ध सुरू करावे.

श्लोक क्र २८६
आगतं विग्रहं विद्वानुपायै: प्रशमं नयेत्।
विजयस्य ह्यनित्यत्वाद्रभसेन न संपतेत्॥

अर्थ~युद्ध सुरू झाल्यानंतर जर विजयाची खात्री नसेल तर विद्वान आणि चतुर राजाने ते युद्ध वेगवेगळ्या उपायांनी थांबवावे. साम, दाम, दंड आणि भेद हे ते चार उपाय होत. याचे कारण असे की विजय हा काही चिरकाल टिकणारा नसतो. तेव्हा राजाने घाईघाईत अथवा अचानकपणे(विचार न करतां) कोणावरही हल्ला/प्रहार करू नये. संपूर्ण विचारांतीच जे काही करायचे ते करावे.

सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)

श्लोक क्र २८८
क्रमाद्वैतसवृत्तिश्च प्राप्नोति विपुलां श्रियम्।
भुजङ्गवृत्तिराप्नोति वधमेव तु केवलम्॥

अर्थ~प्रसंगानुरूप वैतसवृत्ती धारण करणारा(बिकट प्रसंगी नमते घेणारा) राजा टप्प्याटप्प्याने ऐश्वर्य, संपत्ती प्राप्त करू शकतो. परंतु सर्पवृत्तीचा(वेळप्रसंग न पाहतां सतत आक्रमक धोरण बाळगणारा) अवलंब करणाऱ्या राजाला मात्र स्वतःचा वध म्हणजे आत्मनाश पत्करावा लागतो.

श्लोक क्र २८९
काले प्राप्ते तु मतिमानुत्तिष्ठेत्क्रूरसर्पवत्॥

अर्थ~बुद्धिमान राजाने जरी कठीण प्रसंगांत वैतसवृत्ती धारण करून शत्रूपुढे पडते घेण्याचे धोरण अवलंबिले तरी योग्य वेळ येताच म्हणजेच स्वतःचे बल वाढवून अनुकूल परिस्थिती प्राप्त होताच भयंकर क्रूर सर्पाप्रमाणे त्याने फणा काढून(म्हणजे आक्रमकतेने) शत्रूंचा नाश करण्यास सज्ज व्हावे.

बुद्धिमान राजाने कठीण काळांत पर्वताप्रमाणे सहिष्णु बनावे तर योग्य वेळ येतांच अग्निसारखे दाहक बनावे हेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे. सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)

श्लोक क्र २९०
प्रसादवृत्त्या हितलोकवृत्तया।
प्रविश्य शत्रोर्हृदयं निरन्तरम्।
नयाग्रहस्तेन हि काललुच्छिते।
प्रसह्य कुर्वीत कचग्रहां श्रियम्।।

अर्थ~प्रसन्न मनाने आणि लोकांचे हित साधण्याच्या प्रवृत्तीने, राजाने शत्रूंच्या हृदयात स्थान मिळवावे. आपल्या स्नेहपूर्ण वर्तनाने राजाने आपल्या शत्रूचे देखील प्रेम संपादन करावे. परंतु योग्य वेळ आल्यानंतर आपल्या कुटनीतीच्या हातांनी आणि सैन्याबळाच्या आधारे शत्रूला पराभूत करून शत्रूराज्याच्या राजलक्ष्मीस वश करून घ्यावे.

श्लोक क्र २९१
कुलोद्गतं सत्यमुदारविक्रमं।
स्थिरं कृतज्ञं धृतिमन्तमूर्जितम्।
अतीव दातारमुपेतवत्सलं।
सुदु:प्रसादं प्रवदन्ति विद्विषम्।।

अर्थ~विशुद्ध, कुलीन(चांगल्या घराण्यातील), सत्य बोलणारा, श्रेष्ठ, पराक्रमी, स्थिर बुद्धीचा, इतरांनी केलेल्या उपकारांची जाणीव ठेवणारा(कृतज्ञ), धैर्यवान, सामर्थ्यवान, दानशील, शरणागतांवर कृपा करणारा इत्यादी गुणांनी युक्त असणाऱ्या शत्रूला वश करणे(खोटेखोटे खुश करून) फार कठीण आहे असे मानतात.

वैतसवृत्तीचा अवलंब करताना या गोष्टी ध्यानात घेणे अत्यंत आवश्यक आहे हेच या श्लोकातून संभाजी महाराजांना अधोरेखित करावे.

वैतसवृत्ती ही एक प्रकारची कुटनीति आहे आणि कुटनीतीचा उपयोग कुटील शत्रूच्या विरोधातच करावा, सत्शील शत्रूच्या विरोधात करू नये असेच या श्लोकांत सांगितलेले आहे.

म्हणूनच शिवछत्रपतींनी दगाबाज, जुलमी आणि क्रूर अशा इस्लामी विरोधकांवर या नीतीने(वैतसवृत्तीने) व्यवहार केलेला आहे. परंतु शत्रू असूनही जे वृत्तीने सत्शील आहेत त्यांच्याविरुद्ध या नीतीचा अवलंब महाराजांनी कधीही केलेला नाही, असे शिवचरित्राचा अभ्यास करताना आपल्या ध्यानात येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दक्षिण दिग्विजय मोहिमेत कर्नाटकातील बेलवडी संस्थानाच्या विरुद्ध विजय मिळविल्यानंतर देखील महाराजांनी त्या राज्याची संस्थानिक सावित्रीबाई देसाई हिला अत्यंत सन्मानाने वागविले. एवढेच काय, पण तिच्या लहान बाळाला मांडीवर घेऊन स्वतःच्या हाताने त्यास दूध पाजले. तसे शिल्पच या सावित्रीबाई देसाई या माउलीने यादवाड येथील शनिमंदिरात(मारुती मंदिरात) बसविलेले आहे. शिवछत्रपतींच्या नीतीमत्तेचे, सद्वृत्तीचे प्रतीक असणारे हे शिल्प आजही त्या स्थानीं पाहायला मिळते.
सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)
श्लोक क्र २९२
असत्यता निष्ठुरताकृतज्ञता
भयं प्रमादोलसता विषादिता।
वृथाभिमानो ह्यतिदीर्घसूत्रता
तथाङ्गनाक्षादि विनाशनं श्रिय:।।

अर्थ~खोटारडेपणाने वागणे, निर्दयता, कृतज्ञता, भय, प्रमाद(बेसावधपणा), आळस, विषाद(खेद), फुकटचा म्हणजेच खोटा आणि निरर्थक अभिमान, जडपणा म्हणजे दिरंगाई करण्याची वृत्ती, निरंतर स्त्री-संग, द्यूत म्हणजे जुगार खेळणे या गोष्टी राजलक्ष्मीच्या विनाशास कारणीभूत होतात.

**।।राष्ट्रात निर्मू अवघ्या श्री शिवसूर्यजाळ।।**

श्लोक क्र २९३
इति स्म दोषान्वितमाशु विद्विषं
त्रिशक्तियुक्तो विजिगीषया व्रजेत्।
अतोन्यथा असाधुजनस्य
संमत: करोति विद्वानुपघातमात्मन:।।

अर्थ~वरील श्लोकात सांगितलेले दोष ज्या शत्रुराजांमध्ये आहेत, अशा शत्रूंवर मंत्र(मसलत), प्रभाव(प्रभुत्व) आणि उत्साह या तीन शक्तींनी युक्त होऊन, विजयाची इच्छा बाळगून राजाने हल्ला करावा. परंतु जो राजा साधुजनांना मान्य(साधुजनसंमत) असलेल्या राजावर हल्ला करतो, तो स्वतःच स्वतःचा घात करतो.

सदर श्लोक कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.
दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)
श्लोक क्र २९८
वीतव्यसनमग्रस्तं महोत्साहं महामतिम्।
प्रविशन्ति सदा लक्ष्म्य: सरित्पतिमिवापगा:।।

अर्थ~ज्याप्रमाणे सर्व नद्या शेवटी समुद्राला(सरित्पति म्हणजे सरितेचा(नदीचा) पति) जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे राज्यलक्ष्मी(राज्याचे वैभव) सदैव व्यसनहीन(कोणतेही व्यसन न करणाऱ्या), न थकणाऱ्या, उदंड उत्साही असणाऱ्या आणि प्रचंड बुद्धिमत्ता असणाऱ्या राजाकडेच जाते(वास्तव्य करते).

श्लोक क्र २९९
सत्त्वबुद्ध्युपपन्नोपि व्यसनग्रस्तमानस:।
स्त्रीभि: षण्ढ इव श्रीभिरलस: परिभूयते।।

अर्थ~सात्त्विक बुद्धीच्या राजाचे मन जर व्यसनांत अडकलेले असेल, तर ज्याप्रमाणे स्त्रिया नपुंसक माणसाचा तिरस्कार(धिक्कार) करून त्याचा त्याग करतात त्याप्रमाणे राज्यलक्ष्मी व्यसनाधीन राजांचा तिरस्कार करून त्यांना सोडून निघून जाते.

व्यसन करणाऱ्यांकडे लक्ष्मी कधीही राहत नाही हेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे. शिवछत्रपती आणि संभाजी महाराजांचे नाव घेऊन व्यसने करणाऱ्यांनी यातून बोध घेण्याची आवश्यकता आहे. दुर्दैव असे की आजकाल व्यसनाच्या दुकानांची नावे देखील शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या नावाने ठेवलेली असतात.

सदर श्लोक मूलतः कामंदकीय नीतिसार या ग्रंथातून घेतलेले आहेत.

दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)
श्लोक क्र ३०२
प्रयत्नप्रेर्यमाणेन महता चित्तहस्तिना।
रूढवैरिद्रुमोत्खातमकृत्वेह कुत: सुखम्।।

अर्थ~विशाल, महाकाय, धष्टपुष्ट अशा हत्तीला मोठ्या प्रयत्नाने आणि प्रेरणा द्यावी आणि मगच त्याने आपल्या सामर्थ्याच्या बळावर विशाल वृक्ष मुळापासून उपटून टाकावे, अगदी तसेच शत्रूंना मुळापासून उखडून टाकावे. जर शत्रूंना असे समूळ नष्ट केले नाही तर राज्याला सुख कुठून मिळणार?

जोवर शत्रूला मुळासकट नष्ट करत नाही तोवर कोणतेही राष्ट्र सुखाचा श्वास घेऊ शकत नाही हेच संभाजी महाराजांना इथे सांगायचे आहे. दुर्दैवाने आजच्या हिंदुस्थानला अजूनही हे उमगलेले नाही.

श्लोक क्र ३०३
हेलाकृष्णतडित्कान्तिखड्गांशुपरिपिञ्जरै:।
श्रीमत्करिकराकारैराऽहियन्ते भुजै: श्रिय:।।

अर्थ~जे निसर्गतःच कृष्णवर्णीय आहेत आणि ज्यांच्या हातातील तलवारीचा लखलखाट हा जणू आकाशातील विजेसारखा आहे. त्या लखलखाटातून निघणाऱ्या प्रकाशकिरणांमुळे पिंगटवर्ण धारण करणारे आणि बलाढ्य अशा हत्तीच्या सोंडेप्रमाणे ज्यांचे बाहू आहेत ते बाहूच राज्यलक्ष्मी खेचून आणू शकतात.

ज्याच्या हातात सामर्थ्य तोच या पृथ्वीवर सत्ता गाजवतो. राज्याची लक्ष्मी ही पराक्रमी पुरुषालाच वश होते असे या श्लोकांत सांगितलेले आहे.

दोन्ही श्लोक मूलतः कामन्दकीय नीतिसारातील आहेत.
दूतान्संप्रेष्य किं कुर्यादित्याह।
(दूतांना शत्रूपक्षात पाठवून काय साध्य करावयाचे याविषयी निवेदन...)

श्लोक क्र ३०४
उच्चैरुचैस्तरामिच्छन्पदान्यायच्छते महान्।
नीचा नीचैस्तरां यान्ति निपातभयशङ्कया।।

अर्थ~जो राजा अधिकाधिक उच्च स्थानावर जाण्याची इच्छा बाळगतो तोच मोठमोठी उच्चस्तरीय पदे प्राप्त करून घेतो. परंतु पडण्याची अथवा खालच्या पातळीवर राहण्याची भीती बाळगणारा अजून खालच्या स्थानावर जात राहतो.

श्लोक क्र ३०५
प्रमाणाभ्यधिकस्यापि मह: समधितिष्ठत:।
पदं तु धत्ते शिरसि केसरी मत्तदन्तिन:।
गतभीर्भीतिजननं वपुर्भोगीव दर्शयेत्।।

अर्थ~अत्यंत बलाढ्य असलेल्या, उत्तेजीत झाल्याने ज्याची ऊर्जा वाढलेली आहे अशा मदोन्मत्त, बेभान झालेल्या हत्तीच्या गंडस्थळातून रसरूपी मद पाझरतो आहे. त्याच हत्तीच्या मस्तकावर अजिबात न घाबरतां, सिंह झेप घेतो आणि आपले पाय रोवतो. अगदी त्याचप्रमाणे राजाने कितीही बलाढ्य शत्रू अथवा संकट पुढे ठाकला तरीही आपले भयंकर रूप प्रकट करावे.

दोन्ही श्लोक मूलतः कामन्दकीय नीतिसारातील आहेत.

अमात्यकर्माण्याह।
(अमात्याने करावयाची कर्तव्ये सांगत आहोत.)

श्लोक क्र ३०९
हिरण्यं धान्यवस्त्राणि वाहनानि तथैव च।
तथान्ये द्रव्यनिचया: प्रजात: संभवन्ति हि।।

अर्थ~सोने, धान्य, कपडे, वाहने आणि तसेच अन्य मौल्यवान द्रव्यांचा संग्रह हे सर्व काही प्रजेमुळेच शक्य होत असते.

श्लोक क्र ३१०
स्थैर्यम् परोपजापश्च दुर्गसंस्कार एव च।
सेतुबन्धो वणिक्कर्म प्रजामित्रपरिग्रह:।
धर्मकामार्थसिद्धिश्च कोशादेतत्प्रवर्तते।।

अर्थ~या श्लोकांत अमात्याने करावयाच्या कामांची यादीच संभाजी महाराजांनी सांगितली आहे.

राज्याचे स्थैर्य राखणे, शत्रूंमध्ये फूट पाडणे आणि गड-दुर्गांची डागडुजी करणे ही अमात्यांची कर्मे आहेत.

तसेच बांध-बंधारे, धरणे, पूल, इत्यादी गोष्टी बांधणे, व्यापाराचे व्यवहार सांभाळणे, प्रजाजन आणि मित्रराज्ये यांची मर्जी संपादन करणे आणि सांभाळणे आणि धर्म, अर्थ आणि काम हे तीन पुरुषार्थ प्राप्त करणे ही अमात्यांची कर्तव्ये आहेत. राजकोश समृद्ध असेल तरच हे सर्व साध्य होऊ शकते.

हे दोन्ही श्लोक मूलतः कामन्दकीय नीतिसारातील आहेत.

अमात्यकर्माण्याह।
(अमात्याने करावयाची कर्तव्ये सांगत आहोत.)

श्लोक क्र ३१७
अदण्ड्यतामदण्ड्यानां दण्ड्यानां चापि दण्डनम्।
उपकार्योपकारित्वमिति वृत्तं महीपतेः॥

अर्थ~जे शिक्षेस पात्र नाहीत त्यांस शिक्षा(दंड) न करणे आणि जे शिक्षेस पात्र आहेत त्यांस शिक्षा देणे आणि जे उपकार करण्यास योग्य आहेत त्यांच्यावर उपकार करणे हे सर्व कार्यभाग राजांच्या आचरणात समाविष्ट होतात.

श्लोक क्र ३१८
एतत्सर्वममात्यादि राजामात्यपुरःसरः।
नयनत्युन्नतिमुद्युक्तो व्यसनी क्षयमेव च॥

अर्थ~हे सर्व अमात्यसही लागू होते. उद्योगशील राजा हा अमात्यांच्या साहाय्याने त्या सर्वांना(राज्यातील नागरिकांना) प्रगतीपथावर नेतो. पण तोच राजा जर व्यसनी असेल तर तो सर्वांच्या नाशाला कारणीभूत ठरतो.

हे दोन्ही श्लोक मूलतः कामन्दकीय नीतिसारातील आहेत.

अवश्ययातव्ये रिपौ पश्चात्पप्रकोपशङ्कायां किं कुर्यादित्याहः।
(अवश्य त्या निश्चितीने प्रस्थानासाठी सज्ज असणाऱ्या राजाने पाठीमागे घडणाऱ्या बंडाची चिंता करू नये.)

श्लोक क्र ३७९
अभ्यन्तराद्बाह्यकृताच्च दोषादभ्यन्तरस्त्वेव तयोर्गरीयान्।
आदाय गच्छेत बहिःप्रचारांस्तान्मन्त्रिभिः सम्यगुपाददीत॥

अर्थ~दोष दोन प्रकारचे असतात. एक आंतर दोष आणि दुसरे बाह्य दोष.
आंतर दोष म्हणजे स्वतःच्या बाजूकडे असणारे दोष अथवा कमीपणा. आंतर दोष हाच अधिक प्रभावी असतो. तो दूर करून आणि काही क्रोधकारी लोकांना आपल्या सोबत घेऊनच राजाने चढाईसाठी बाहेर पडावे. तसेच, राजाने बाह्यदोष(बाहेरच्या/शत्रूच्या बाजूने असलेले दोष) देखील प्रयत्न आणि विचारपूर्वक त्वरेने शोधून काढावेत आणि त्यासाठी आवश्यक ते उपाय मंत्र्याने योजावेत.

श्लोक क्र ३८०
सामादिभि: संशमयेत्प्रकोपं परस्परावग्रहभेदनैश्च।
तथापि धीर: शमयेत्प्रकोपं यथा भजेरन्न परान्प्रतप्ता:॥

अर्थ~परस्पर क्लेश, त्रास, उपद्रव देणे, परस्परांत फूट पाडणे, द्वेष, संशय निर्माण होणे, सूडाची भावना उत्पन्न होणें यांमुळे जे त्रास(क्लेश) निर्माण झालेले असतील ते राजाने साम-दाम-दण्ड-भेद इत्यादी उपायांनी शांत करावेत. परंतु जे क्लेश/त्रास बुद्धिवंतांच्या मनांत उद्भवलेले असतील ते देखील सामोपचाराने अशा प्रकारे शांत करावे की ते क्रोधावलेले बुद्धिमान लोक दुःखी होऊन शत्रूला जाऊन मिळणार नाहीत.

आपल्याकडील एखादा बुद्धिमान मनुष्य रागाच्या भरात शत्रूला जाऊन मिळणे म्हणजे राज्याचे नुकसानच. त्यामुळे आपल्या राज्यातील एखादा विद्वान काही कारणाने क्रोधीष्ट झाला तरी त्यास योग्य त्या उपायाने शांत करावे आणि तो शत्रूला जाऊन मिळणार नाही हे राजाने पहावे असे संभाजी महाराज या श्लोकांत सांगत आहेत.

मूळ श्लोक - कामंदकीय नीतिसार.
राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ३९५
नात: परतरो धर्मो नृपाणां यद्रणेर्जितम्।
विप्रेभ्यो दीयते द्रव्यं प्रजाभ्यश्चाभयं सदा॥

अर्थ~युद्ध करून प्राप्त केलेले धन विप्रांना(वेद जाणणाऱ्या विद्वानांना) दान म्हणून देणे आणि प्रजेला अभय देणे यांसारखा राजांचा दुसरा कोणताही अत्युत्तम धर्म नाही.

धर्म हा शब्द संस्कृत भाषेत आणि विशेषतः हिन्दु परंपरेत उदात्त कर्तव्य या अर्थाने वापरला जातो. युद्धात मिळविलेले धन विद्वानांना दान करणे आणि प्रजेला शत्रूपीडेपासून भयमुक्त करणे हेच राजाचे परमोच्च कर्तव्य आहे संभाजी महाराजांनी या श्लोकांत सांगितले आहे.

प्रजेला अभय देणे म्हणजे प्रजेच्या मनांतून शत्रूचे भय नाहीसे करणे. राजा पराक्रमी असेल तेव्हाच तो प्रजेला शत्रूच्या भीतीपासून मुक्त करू शकतो.

शिवाजी महाराजांच्या जन्माच्या आधी या देशातील सामान्य प्रजा सदैव परकीय, जुलमी इस्लामी सत्ताधीशांच्या दहशतीखालीच जगत असे. महाराजांनी आपल्या अद्वितीय क्षात्रतेजाने हिन्दु समाजाला त्या भयातून मुक्त करून परमोच्च राजधर्माचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले आहे. स्वराज्याच्या सीमेवरील गवताचे पातेदेखील शत्रूच्या भयापासून मुक्त राहून निर्भयपणे डोलले पाहिजे असे शिवाजी महाराजांना नेहमी वाटत असे.

श्लोक क्र ३९६
तवाहं वादिनं क्लिबं निर्हेतिं परसङ्गतम्।
न हन्याद्विनिवृत्तं च युद्धप्रेक्षणकं तथा॥

अर्थ~युद्धाच्या वेळी कोणाकोणाला मारू नये हे श्लोकांत सांगितले आहे. "मी तुमचाच आहे" असे म्हणणारा, नपुंसक, शस्त्रहीन, दुसऱ्याशी लढणारा, युद्धातून माघार घेतलेला आणि युद्ध पाहणारा या लोकांना युद्धप्रसंगात मारू नये.

मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ३९७
ब्राह्मणेषु क्षमी स्निग्धेष्वजिह्म: क्षोभनोरिषु।
स्याद्राजा भृत्यवर्गेषु प्रजासु च यथा पिता॥

अर्थ~राजाने ब्राह्मणांसोबत नेहमी क्षमाशील वर्तावे. आपल्याबद्दल स्नेहभाव बाळगणारे लोक तसेच आपले मित्र यांच्याशी नेहमी अवक्र म्हणजे सरळपणे(कोणतेही कपट मनांत न ठेवतां) वागावे. सेवकवर्ग आणि प्रजाजन यांच्या दुःखाचे निवारण करावे आणि सतत त्यांच्या हिताचे कार्य करावे आणि त्यांवर पित्याप्रमाणे प्रेम करावे.

श्लोक क्र ३९८
पुण्यात्षड्भागमादत्ते न्यायेन परिपालयेत्।
सर्वदानाधिकं यस्मात्प्रजानां परिपालनम्॥

अर्थ~राजाने न्यायपूर्वक प्रजेचा प्रतिपाळ(पालन, पोषण आणि रक्षण) केल्यास त्यास प्रजेने धन इत्यादी उत्पन्नाने प्राप्त केलेल्या पुण्याच्या एक षष्ठांश भाग प्राप्त होतो. इतर मौल्यवान वस्तूंच्या दानाने(भूमी, सोने, धान्य, धन आणि गाय वगैरे) प्राप्त होणाऱ्या पुण्यापेक्षा प्रजेचे उत्तम प्रकारे प्रतिपालन कल्याने उत्पन्न होणारे पुण्य हे राजाला अधिक फलदायक असते. प्रजेचे उत्तम प्रतिपालन करणे हाच सर्वोत्तम असा राजधर्म आहे. म्हणूनच राजाने प्रजेला आपल्या अपत्यासमान मानून पित्याप्रमाणे तिचा प्रतिपाळ करावा हेच उत्तम.

राज्याभिषेक प्रसंगी महाराजांनी 'मी प्रजेला अपत्य मानून पित्याप्रमाणे पालन, पोषण आणि रक्षण करेन' अशी शपथ घेतली होती आणि त्याचे त्यांनी नेहमीच पालन केलेले आहे. महाराजांनी घेतलेली शपथ ही याज्ञवल्क्य स्मृतीतील वरील श्लोकांना अनुसरूनच आहे. संभाजी महाराजांनी देखील अगदी याच न्यायाने प्रजेचे प्रतिपालन केलेले आहे.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ३९९
शत्रुतस्करदुर्वृत्तमहासाहसिकादिभि:।
पीड्यमाना: प्रजा रक्षेत्कायस्थैश्च विशेषतः॥

अर्थ~विश्वासघाताने दुसऱ्याचे धन हरण करणारे, चोर, लुटारू, गारुडी, धूर्त, ठग, दुस्साहसी, बलात्कारी, दरोडेखोर व इतर कपटी लोक यांच्यापासून पीडित असलेल्या प्रजेचे राजाने रक्षण करावे आणि त्यांच्या पीडा दूर कराव्यात. विशेषतः जे लोक कायस्थ(लेखनकर्मी) लोकांमुळे पीडाग्रस्त आहेत अशांच्या पीडा देखील राजाने दूर कराव्यात. असे लोक राजाचे अत्यंत निकटवर्ती, राजास प्रिय आणि राजरक्षित असल्याने दुर्निवार असतात.

श्लोक क्र ४००
अरक्ष्यमाणा: कुर्वन्ति यत्किंचित्किल्बिषं प्रजा:।
तस्मात्तु नृपतेरर्धं यस्माद्गृह्णात्यसौ करान्॥

अर्थ~राजाच्याकडून ज्या प्रजेचे(काही कारणाने) रक्षण केले जात नाही, ती प्रजा पापकृत्यांकडे(चोरी, मारामारी, दरोडेखोरी, अपहरण, बलात्कार, फसवणूक, इत्यादी) वळते. अशा वेळी त्या प्रजेच्या हातून घडणाऱ्या पापकृत्यांच्या अर्धा भाग राजाच्या वाट्याला जातो. कारण प्रजेचे रक्षण करणे हे तर राजाचे मूलभूत कर्तव्यच असते. प्रजेच्या रक्षणाच्या कार्यासाठीच तर राजा प्रजेकडून कर आकारत असतो.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ४०१
ये राष्ट्रेधिकृतास्तेषां चारैर्ज्ञात्वा विचेष्टितम्।
साधून्संमानयेद्राजा विपरीतांश्च घातयेत्॥

अर्थ~राजाने राज्यकार्यासाठी अधिकारयुक्त पदांवर राजसेवकांची नियुक्ती करताना, त्यांची नियुक्ती होण्यापूर्वी आणि नियुक्ती झाल्यानंतरही त्यांचे पूर्व आचरण, वर्तन, पूर्वेतिहास यांविषयी गुप्तचरांच्या द्वारे सर्व प्रकारे माहिती गुप्तपणे मिळवावी आणि त्या अधिकाऱ्यांचे उत्तम चरित्र, चारित्र्य, वर्तन, गुण, स्वभाव आणि आचरणाविषयी माहिती घ्यावी. जे सज्जन लोक असतील त्यांचा दान, मान आणि पुरस्कारांनी सन्मान करावा आणि त्याविपरीत म्हणजेच दुष्ट आचरण करणाऱ्यांना अपराधानुसार शासन(शिक्षा) करावे.

श्लोक क्र ४०२
उत्कोचजीविनो द्रव्यहीनान्कृत्वा विवासयेत्।
स दानमानसत्कारैः श्रोत्रियान्वासयेत्सदा॥

अर्थ~जे अधिकारी लाच खाऊन(गैरव्यवहार करून, फसवून अथवा अनैतिक मार्गाचा अवलंब करून) मौजमजा करताना तसेच उपजीविका करताना आढळतील त्यांचे सर्व द्रव्य काढून घ्यावे आणि त्यांना देशातून हद्दपार करावे.

त्याचप्रकारे राजाने श्रोत्रिय(वेद जाणणाऱ्या) व्यक्तीला दान, मान, सत्कार, पुरस्कार, सन्मान, पारितोषिक, मानधन इत्यादींच्या योगे प्रसन्न करावे आणि आपल्या राज्यात सदैव ठेऊन घ्यावे.

शिवछत्रपतींनी त्यांच्या जीवनांत ज्ञानी, विद्वान, वेदज्ञ अशा अनेक व्यक्तींचा विपुल प्रमाणांत दानधर्म आणि आदरसत्कार करून गौरव केलेला आहे. कवि भूषण, संकर्षण सकळकळे, बाळकृष्ण आणि रामकृष्ण संगमेश्वरकर बंधू या सर्वांना शिवाजी महाराजांनी सर्व प्रकारे संतुष्ट ठेवून त्यांस आश्रय दिलेला होता. आज्ञापत्रात सुद्धा ब्राह्मण, वेदज्ञ, शास्त्रज्ञ, कवि इत्यादी लोकांना सर्व प्रकारे संतुष्ट ठेवून त्यांचे कृपाशिर्वाद संपादन करावे असेच म्हटलेले आहे. या श्लोकांत संभाजी महाराजांना तेच सांगायचे आहे.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ४०३
अन्यायेन नृपो राष्ट्रात् स्वकोशं योभिवर्धयेत्।
सोचिराद्विगतश्रीको नाशमेति सबान्धव:॥

अर्थ~जो राजा आपल्या राष्ट्रात(राज्यात), आपल्याच प्रजेकडून अन्यायकारक मार्गाने(जबरदस्तीने, छळ करून, त्रास देऊन) आपले द्रव्यकोश(धन) वाढवत राहतो, त्या राजापासून अल्पावधीतच श्री, लक्ष्मी, धनदौलत, संपत्ती हे सर्व दूर जाते आणि तो राजा आपल्या कुळ, आप्त आणि बांधवांसह नाश पावतो.

श्लोक क्र ४०४
प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशन:।
राज्ञ: श्रियं बलं प्राणानदग्ध्वा न निवर्तते॥

अर्थ~प्रजेला त्रास झाल्यामुळे अथवा उपद्रव झाल्यामुळे प्रजेच्या मनांत जो क्रोध, संताप, चीड उत्पन्न होते त्या पापरूपी क्रोधाग्नीमध्ये राजाचे कुळ, परिवार, संपत्ती, लक्ष्मी, धनसंपत्ती, कीर्ती, प्राण हे सर्व जळून नष्ट झाल्याशिवाय शांत होत नाही.

शिवछत्रपती आणि शंभूराजांनी नेहमीच रयतेला कोणत्याही प्रकारचा त्रास,उपद्रव होणार नाही याची सतत दक्षता घेतली होती. "रयतेच्या भाजीच्या देठाला देखील हात लावू नका" असे शिवछत्रपतींनी म्हटले होते ते त्यामुळेच!
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ४०५
य एव नृपतेर्धर्म: स्वराष्ट्रपरिपालने।
तमेव कृत्स्नमाप्नोति परराष्ट्रं वशं नयन्॥

अर्थ~आपल्या राष्ट्राचे(स्वराज्याचे) न्यायनीतीने परिपालन करणे हाच राजाचा राजधर्म होय. तसेच आपल्या पराक्रमाच्या बळावर, परराष्ट्राला आपल्या राज्यात वश(आधीन) करून घेणे हा देखील राजाचा राजधर्मच आहे.

श्लोक क्र ४०६
किंतु यस्मिन्य आचारो व्यवहार: कुलस्थिती:।
तथैव परिपाल्योसौ यथावशमुपागत:॥

अर्थ~जेव्हा दुसरा देश आपल्याला वश होईल म्हणजेच आपल्या ताब्यात येतो, तेव्हा आपल्या देशाचे आचार, कार्यपद्धती इत्यादी तिथे लगेच लागू करण्याचा हट्ट धरू नये. किंबहुना त्या देशातील आचार, कुलव्यवहार आणि मर्यादा असतील त्या जर आपल्या शास्त्राच्या विरोधी नसतील तर त्या लोकांस त्याचे आचरण करू द्यावे.

असे केल्याने शत्रूराज्यातील लोकांचा विश्वास आणि स्नेह प्राप्त करणे सहजपणे शक्य होते.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ४०८
दैवे पुरुषकारे च कर्मसिद्धिर्व्यवस्थिता।
तत्र दैवमभिव्यक्तं पौरुषं पौर्वदेहिकम्॥

अर्थ~चांगल्या अथवा वाईट कर्माचे फळ हे केवळ दैवाच्या(नशिबाच्या) आधीन नसते तर ते प्रयत्नावर देखील अवलंबून असते. केवळ दैवावर(नशिबावर) विश्वास ठेवून 'प्रयत्न व्यर्थ आहे' असे समजणे निरर्थक आहे तसेच 'पूर्वजन्मातील कर्माचे फळ म्हणजे दैव(नशीब)' असे मानून प्रयत्नवादावर श्रद्धा ठेवून कर्म करणे हेच श्रेयस्कर होय.

श्लोक क्र ४०९
केचिद्दैवात्स्वभावाच्च कालात्पुरुषकारत:।
संयोगे केचिदिच्छन्ति फलं कुशलबुद्धय:॥

अर्थ~कोणी चांगले अथवा वाईट फळ हे दैवाच्या प्रभावानेच मिळते असे मानतात, कोणी स्वभावतःच फलप्राप्ती होते असे मानतात, कोणी कालसामर्थ्याच्या प्रभावाने फल सिद्धी होते असे मानतात, तर कोणी प्रयत्नाच्या योगानेच फल प्राप्त होते असे मानतात. मनूसारखे कुशलबुद्धीचे लोक मात्र दैव, स्वभाव, काल आणि प्रयत्न यांच्या एकत्रित प्रभावाने यश प्राप्त होते असे म्हणतात. या चारही बाबी अनुकूल असल्यास अनुकूल फल प्राप्त होते तर या सर्व बाबी प्रतिकूल असल्यास प्रतिकूल फल प्राप्त होते असे 'मनू' मानतो आणि आम्हांस देखील तेच मान्य आहे.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

राज्ञोचित कर्तव्यविधा:।
(आता राजाने पार पाडावयाच्या योग्य त्या विविध कर्तव्यांविषयी...)
श्लोक क्र ४१०
यथा ह्येकेन चक्रेण न रथस्य गतिर्भवेत्।
एवं पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति॥

अर्थ~ज्याप्रमाणे केवळ एकाच चाकाच्या आधारावर रथ गतीने चालू शकत नाही, अगदी त्याचप्रमाणे दैव(नशीब) आणि पुरुषार्थ(प्रयत्न) या फलप्राप्तीच्या दोन चाकांच्या आधारानेच फलसिद्धी होते. पुरुषार्थावाचून(प्रयत्नांशिवाय) केवळ दैवावर(नशिबावर) विसंबून राहून फलसिद्धी होऊ शकत नाही.

श्लोक क्र ४१२
क्रोधं कुर्यान्न चाकस्मान्मृदुवागुपकारिषु।
एवं च राजा राज्यस्थो यदि श्रेय इहेच्छति॥

अर्थ~जर राजाला आणि प्रजाजनांना आपल्या आणि राज्याच्या हितकल्याणाची इच्छा असेल तर त्यांनी आपला क्रोध अचानकपणे प्रकट करू नये. अकस्मात कोणावर रागावू नये. तसेच आपल्यावर उपकार करणाऱ्या व्यक्तीशी अत्यंत मृदुतेने वार्तावे, त्यांच्याशी स्नेहाने, सौम्यतेने बोलावे.

आपले हित(कल्याण) व्हावे असे ज्यांना वाटते त्यांनी नेहमी सर्वांशी स्नेहपूर्ण वर्तन ठेवावे. म्हणूनच 'नम्र झाला भूतां। तेणें कोंडिले अनंता॥' असे तुकोबारायांनी म्हटले आहे. शिवाजी महाराजांनी देखील अनेकदा आपल्या स्नेहपूर्ण वर्तनाने आपल्या शत्रूंवर देखील आपली छाप पाडलेली आहे. मिर्झा राजांच्या भेटीच्या प्रसंगीं याचा प्रत्यय येतो.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

उक्तं च भारते।
(महाभारतात म्हटलेच आहे की...)
श्लोक क्र ४१४
कामं क्रोधं मदं मानं लोभं हर्षम् तथैव च।
एते वर्ज्या: प्रयत्नेन सुतरां पृथिवीक्षिता॥

अर्थ~राजाने काम, क्रोध, मद(गर्व, माज), मान, लोभ आणि हर्ष या सहा दुर्गुणांचा(षड्रिपूंचा) प्रयत्नपूर्वक आणि आदरपूर्वक त्याग करावा. या सहा दुर्गुणरूपी शत्रूंपासून स्वतःला प्रयत्नपूर्वक दूर ठेवावे.

श्लोक क्र ४१५
एतेषां विजयं कृत्वा कार्यो भृत्यजयस्तत:।
कृत्वा भृत्यजयं राजा पौरजानपदान्व्रजेत्॥

अर्थ~कामक्रोधादि अशा सहा दुर्गुणरूपी शत्रूंवर विजय प्राप्त केल्यानंतर राजाने अत्यंत संयमाने आपल्या सेवकवर्गावर देखील आपला प्रभाव प्रस्थापित करावा. आपल्या सेवकांस अशा प्रकारे वश केल्यानंतर राजाने आपल्या राज्यातील आणि विशेषत्वाने राजधानीतील सर्व लोकांना वश करावे(आपल्या बाजूने करावे, अनुकूल करावे).

कोणत्याही राजासाठी आपले सेवक आणि प्रजाजन संतुष्ट असणे आणि आपल्याला अनुकूल असणे हे राज्याच्या प्रगतीच्या आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाचे असते. कारण राज्याची प्रगती राज्यातील प्रजाजनांच्या सहकार्याशिवाय साध्य होत नसते.

भृत्यजय - राजाचा सेवक वर्गावर असलेला प्रभाव.
मूळ श्लोक - मत्स्यपुराण

तदुक्तम्‌
(म्हटलेच आहे की...)
श्लोक क्र ४१६
आत्मानं प्रथमं राजा विनयेनोपपातयेत्‌
ततो भृत्यांस्ततोमात्यांस्तत: पुत्रांस्तत: प्रजा:।।
कृत्वा तु विजयं तेषां शत्रून्बाह्यांस्ततो जयेत्‌

अर्थ~राजाने सर्वप्रथम स्वतः विनयशील वृत्ती अंगीकारावी. राजाचे स्वतःचे वर्तन विनयशील आणि नम्र असावे. त्यानंतर राजाने आपले सेवक, अमात्यादि मंत्रीगण, अगदी स्वतःचे पुत्र आणि सर्वात शेवटी प्रजाजन या क्रमाने त्यांना विनयशील वृत्ती आणि नम्रता या अत्यंत महत्वाच्या आणि आवश्यक गुणांचा स्वीकार करण्यास सांगावे.

आजच्या सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी यातून खूप बोध घेणे आवश्यक आहे. विनयशीलता आणि नम्रता या गुणांचा मागमूसही सध्याच्या राजकीय नेत्यांमध्ये दिसत नाही. ना त्यांचे वर्तन विनयशील असते, ना त्यांचे मंत्री अथवा पुत्रांचे वर्तन तसे असते, ना ते आपल्या प्रजाजनांना तसे वर्तन करण्याविषयी आग्रही असतात. त्यादृष्टीने संभाजी महाराजांनी केलेले हे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे आहे.
मूळ श्लोक - शार्ङ्गधरपद्धति

तेषां क्रोधादीनाम्‌
(त्यांपैकी म्हणजे शत्रूंपैकी क्रोधादि शत्रूंबद्दल...)

श्लोक क्र ४१८
अङ्गेभ्यो यत्स्वथैकोपि द्रोहमाचरतेल्पधी:।
वधस्तस्य तु कर्तव्य: शीघ्रमेव महीक्षिता।।

अर्थ~जो कोणी एखादा व्यक्ती अल्पमतीने त्या सहा राज्यांगांचा द्रोह करतो(राज्यांगांवर बळाने आक्रमण करतो), त्याचा राजाने तात्काळ वध करावा.

श्लोक क्र ४१९
न राज्ञा मृदुना भाव्यं मृदुर्हि परिभूयते।
न भाव्यं दारूणेनापि तीक्ष्णादुद्विजते जन:।।

अर्थ~त्याचप्रमाणे राजाने सर्वकाळ आणि सर्वत्र मृदुवृत्तीने वागू नये. कारण सतत कोमल भावाने वागल्यास राजा पराभूत होतो.
परंतु राजाने अति उग्र स्वभावही सतत दाखवू नये. राजा जर रागीट आणि उग्रप्रकृती असेल तर त्याचे प्रजाजन भयभीत होतात.
म्हणूनच राजाने स्थळ आणि काळ पाहून आणि सारासार विवेकाची कास धरून कोमल अथवा उग्र वृत्ती धारण करावी.

वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी इतके प्रगल्भ विचार मांडणाऱ्या संभाजी महाराजांना केवळ चुकीच्या ऐतिहासिक साधनांचा आधार घेऊन सिनेमा-नाटकवाल्या मंडळींनी उग्रप्रकृती ठरवले हे किती मोठे दुर्दैव!
मूळ श्लोक - मत्स्यपुराण

तेषां क्रोधादीनाम्।
(त्यांपैकी म्हणजे शत्रूंपैकी क्रोधादि शत्रूंबद्दल...)

श्लोक क्र ४२२
व्यसनानि च सर्वाणि भूपति: परिवर्जयेत्।
सप्तदोषा सदा राज्ञा हातव्या व्यसनोदया:॥

अर्थ~राजाने सर्व प्रकारच्या व्यसनांचा सदैव त्याग करावा, कोणत्याही प्रकारच्या व्यसनाचे सेवन करणे राजाने सर्वथैव वर्ज्य मानावे. संकटांना आमंत्रित करणाऱ्या सप्तदोषांपासून राजाने नेहमी दूर राहावे.

राजाच्या विनाशाला कारणीभूत ठरणारी ती सात व्यसने(संकटे) पुढीलप्रमाणे आहेत. स्त्रीसंग, अक्ष(द्यूत), मृगया(शिकारीचे वेड), मदिरापान(दारू पिणे), कठोरता(कठोर शासन करणे), धनाचा अपव्यय करणे आणि कठोर भाषण करणे हे राजाचे सप्तदोष मानले आहेत.

शिवाजी महाराजांच्या प्रमाणेच संभाजी महाराजांनी देखील सर्व प्रकारच्या व्यसनांचा धिक्कार केलेला आहे. "उन्मत्त द्रव्य सर्वथैव भक्षूं नयें" असे आज्ञापत्रात म्हटले आहे. व्यसनाचा टोकाचा विरोध करणाऱ्या संभाजी महाराजांना चित्रपट/नाटक यांतून व्यसनी दाखविले गेले यापेक्षा दुसरे दुर्दैव कोणते?

राजकीय आणि अन्य लाभासाठी उठसूट शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचे नाव घेणारे सर्वपक्षीय राज्यकर्ते संभाजी महाराजांनी व्यसनांविषयी केलेल्या वरील उपदेशाचे पालन करतील काय?

श्लोक क्र ४२३
प्रायशोर्थे विनश्यन्ति धृतमूला अपीश्वरा:॥

अर्थ~अत्यंत दृढतापूर्वक, स्थैयाने(भक्कमपणे) आणि आत्मविश्वासाने सत्ता उपभोगणारा राजा देखील या सप्तदोषांमुळे(सात प्रकारच्या व्यसनांमुळे) आणि धनसंपत्तीमुळे विनाश पावतो.

याच कारणाने, आज्ञापत्राच्या तिसऱ्या प्रकरणांत, "राज्यमदारुढ न होतां, अप्रमत्त वृत्तीने राज्य करावे...हे राज्य ईश्वरदत्त असून राजाच्या दुर्वर्तनाने ईश्वराचा क्षोभ होईल हे भय चित्तांत ठेवून राज्य करावे..." असे शिवाजी महाराजांनी सांगितले आहे.
मूळ श्लोक - मत्स्यपुराण

तानि च व्यसनानि।
(ती सात व्यसने/दोष पुढीलप्रमाणे आहेत।)
श्लोक क्र ४२४
स्त्रियोक्षा मृगया पानं वाक्पारुष्यं च पञ्चमम्।
तथैव दण्डपारूष्यमर्थदूषणमेव च॥

अर्थ~राजाचे सात प्रकारचे दोष/व्यसने या श्लोकांत सांगितली आहेत. स्त्रियांशी अनैतिक संबंध, अक्ष म्हणजे द्यूत अथवा जुगार, मृगया म्हणजे शिकारीचा नाद, मदिरापान म्हणजे दारू पिण्याचे व्यसन आणि वाक्पारूष्य म्हणजे कठोर वचने बोलून इतरांना दुखावणे ही पाच व्यसने/दोष आहेत त्याचबरोबर अर्थदूषण म्हणजे संपत्तीचा अपव्यय(चुकीच्या कारणासाठी खर्च) करणे आणि दण्डपारुष्य म्हणजे कठोर शिक्षा करणे ही देखील राजाची व्यसने आहेत. राजाची अशी एकूण सात व्यसने(दोष) सांगितली असून राजाने त्यांपासून दूर राहावे. ही सात व्यसने राजाने वर्ज्य मानावी.

व्यसन या शब्दाचा संकट असाही अर्थ संस्कृत भाषेत केला जातो. त्याही अर्थाने वरील श्लोक योग्यच आहे, कारण व्यसने(वाईट सवयी) ही अंततः नुकसानच करीत असल्याने संकट म्हणून मानली गेली आहेत.

मूळ श्लोक - विष्णुधर्मोत्तर पुराण

कामं क्रोधं च वर्जयेदित्युक्तं तत्र मूलमाह।
(राजाने काम आणि क्रोध यांना वर्ज्य मानावे हे सांगून झाल्यावर आता त्यांचे मूळ कारण जाणून घेऊ...)
कामज दशकगण:।
(कामवासनेमुळे उत्पन्न होणारे दहा दोष/व्यसने...)
श्लोक क्र ४२५
मृगयाक्षा दिवास्वाप: परिवाद: स्त्रियो मद:।
तौर्यत्रिकं वृथात्याग: कामजो दशको गण:॥

अर्थ~कामवासनेमुळे उत्पन्न होणारी दहा व्यसने(संकटे) पुढीलप्रमाणे आहेत. जी व्यसने राजाला संकटांत टाकतात आणि राजाच्या विनाशाला कारणीभूत ठरतात ती अशी आहेत. मृगया(शिकार करणे), अक्ष(द्यूतक्रीडा म्हणजेच जुगार खेळणे), दिवास्वाप म्हणजे दिवसा झोपणे, परिवाद म्हणजे वाद घालणे, स्त्रियांचा मोह, मद म्हणजे व्यसनाच्या सेवनाने निर्माण होणारा उन्माद, तौर्य म्हणजे संगीताच्या तीन प्रकारांच्या आहारी जाणे(अतिगायन, अतिवादन आणि अतिनर्तन हे तीन तौर्यत्रिक होत) आणि अतिरिक्त भटकंती ही दहा प्रकारची संकटे संभाजी महाराजांनी सांगितलेली आहेत. केवळ राजानेच नव्हे तर प्रत्येकाने यांपासून स्वतःला दूर ठेवावे.
मूळ श्लोक - मनुस्मृती

व्यसनानि वर्जयेदस्यापवादमाह।
(राजाने व्यसने नेहमी वर्ज्यच मानावीत, तथापि काही अपवादात्मक परिस्थिती पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र ४३०
जनो विरागमायाति सदा दुःसेव्यभाषत:।
तस्मात्पूर्वाभिभाषी स्यात्सर्वस्यापि महीपति:॥

अर्थ~राजा जर गर्विष्ठ आणि लहरी असेल तर त्याच्या स्वभावाचा(तसेच वागण्याचा) ठाव घेणे त्याच्या प्रजाजनांना खुप कठीण(किंबहुना अशक्य) असते. म्हणूनच राजाने सर्वांशी स्नेहपूर्ण वर्तन ठेवावे, सर्वांशी मधुर भाषण करावे आणि सुहास्य वदनाने सर्वांसमोर सादर व्हावे.

श्लोक क्र ४३१
अदीर्घसूत्रश्च भवेत्सर्वकर्मसु पार्थिव:।
दीर्घसूत्रस्य नृपते: कर्महानिर्भवेद्ध्रुवा॥

अर्थ~दिर्घसूत्रीपणा म्हणजे कामात दिरंगाई करण्याची वृत्ती, कामे उशिराने(आळसाने) करण्याची वृत्ती. राजाने सर्व कार्यात दिर्घसूत्री वृत्तीने वागू नये कारण दिर्घसूत्रीपणामुळे कार्यनाश निश्चितपणे होतो.

याच दिर्घसूत्री वृत्तीमुळे शिवाजी महाराजांनी "समयास कैसा पावला नाहीस" असे म्हणून स्वराज्याचे सरनौबत आणि 'प्रतिशिवाजी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेतोजी पालकर यांना पदावरून दूर केले होते. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांनी सदैव सर्व कार्यात गतिमानतेला महत्व दिलेले आहे.
मूळ श्लोक - विष्णुधर्मोत्तर/मत्स्य पुराण

अथ दानम्।
(आता दानासंबंधी सांगत आहोत...)
श्लोक क्र ४४३
सर्वेषामप्युपायानां दानं श्रेष्ठतमं महत्।
सुदत्तेन समायाति दानेनोभयलोकजित्।।

अर्थ~मनुस्मृतीने राजनीतीचे चार उपाय/साधने सांगितली आहेत. साम, दाम(दान), दण्ड आणि भेद हे ते चार उपाय होत. या चार उपायांपैकी दान हे सर्वश्रेष्ठ मानावे. दान जर योग्य रीतीने दिले गेले तर दाता(दान करणारा) इहलोक आणि परलोक या दोन्ही लोकांना जिंकतो. सत्पात्री म्हणजेच योग्य ठिकाणी केलेले दान हे मनुष्यास इहलोकांत आणि परलोकांत देखील श्रेष्ठत्व प्राप्त करून देते, असेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे.

श्लोक क्र ४४४
न केवलं दानपरा जयन्ति भूर्लोकमेकं पुरुषप्रवीरा।
जयन्ति ते राजसुरेन्द्रलोकं सुदुर्जनं यद्धनुषा तथैव।।

अर्थ~योग्य तऱ्हेने(योग्य याचकाला) दान देणारे श्रेष्ठ, दानशूर पुरुष हे केवळ भूलोकालाच जिंकतात असे नाही तर ते देवांचे वसतीस्थान असलेल्या आणि अत्यंत दुर्लभ असलेल्या अशा इंद्रलोकाला प्राप्त होतात(इंद्रलोकास गमन करतात).

मूळ श्लोक - मत्स्यपुराण

इति दानस्वरूपनिरूपणम्।
(हे 'दान'स्वरूप कथन संपूर्ण झाले.)
दण्डस्वरूपं निरुप्यते।
(आता दण्ड म्हणजेच शिक्षेच्या स्वरूपाविषयी निरूपण करीत आहोत...)
श्लोक क्र ४४७
एवं सांसिद्धिकं लोके सर्वं दण्डे प्रतिष्ठितम्।
अन्धे तमसि मज्जेत यदि दण्डं न पातयेत्।।

अर्थ~याप्रमाणे सर्व प्रकारच्या स्वभावाच्या लोकांची स्थिती केवळ दण्डामुळे(दंडाच्या धाकाने) सुस्थिर असते. असा दंड नसेल तर जगातील सर्वच लोकांना या जगात सुखाने जगणे दुष्प्राप्य होईल आणि हे जग सोडून गेल्यानंतरही ते लोक अंधःकारमय नरकात बुडून नष्ट होतील.

श्लोक क्र ४४८
यस्माद्दण्ड्यं दण्डयति दुर्मदान्दमयत्यपि।
दमनाद्दण्डनाच्चैव तस्माद्दण्डं विदुर्बुधा:।।

अर्थ~तसेच दंड(शासन/शिक्षा) हा दमन(दुष्प्रवृत्तींवर नियंत्रण) करतो आणि दुर्मद(माजखोर) लोकांना शिक्षा देतो आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवतो. म्हणूनच दुष्प्रवृत्तींवर दमन(नियंत्रण) करणे आणि त्यांस शासन करणे या दोन्ही कारणांमुळे बुद्धिमान लोक त्यास दंड म्हणतात.

म्हणूनच कोणत्याही राज्याचा कारभार सुरळीतपणे चालण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी दंडविधान आणि त्याच्या काटेकोर अंमलबजावणीची आवश्यकता असते.
मूळ श्लोक - मत्स्यपुराण

दण्डस्वरूपं निरुप्यते।
(आता दंडनीतीविषयीं निरूपण करीत आहोत...)
दण्डभेदानाह।
(दंडाचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र ४६१
धिग्दण्डस्त्वथ वाग्दण्डो धनदण्डो वधस्तथा।
योज्या: समस्ता व्यस्तास्तु ह्यपराधवशादिमे॥

अर्थ~दंडाचे(म्हणजेच शिक्षेचे) चार प्रकार सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत-
१. धिग्दण्ड - म्हणजे धिक्कार करणे अथवा धिक्कार करणारे वचन बोलणे.
२. वाग्दण्ड - कठोर वचने बोलून अथवा शिव्याशाप देऊन शिक्षा देणे.
३. धनदण्ड - दंडीत व्यक्तीकडून धन घेणे आणि त्याद्वारे शिक्षा देणे.
४. वधदण्ड - म्हणजे अपराधी(दंडीत) व्यक्तीला देहान्त शासन(फाशी/हत्तीच्या पायी देणे इत्यादी) करणे.

दोषी व्यक्तीने केलेल्या अपराधानुसार वरील पैकी एक, दोन, तीन अथवा सर्व चार दण्ड अपराध्यास द्यावे. परंतु वर सांगितलेल्या पहिल्या क्रमांकाच्या दंडाने जर उद्दिष्ट साध्य झाल्यास पुढील दंडमार्गाचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही. जर पहिल्या दंडाने कार्य साधले नाही तरच पुढील दंडांची योजना करावी.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

दण्डस्वरूपं निरुप्यते।
(आता दंडनीतीविषयीं निरूपण करीत आहोत...)
दण्डभेदानाह।
(दंडाचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे...)
श्लोक क्र ४६२
वाग्धिग्वध: स्वकं चैव चतुर्धा वर्तितो दम:।
पुरुषे दोषविभवं ज्ञात्वा संपरिकल्पयेत्॥

अर्थ~वाक्(वाणीने शासन करणे), धिक्(धिक्कार करून शिक्षा करणे), स्वकं(स्वतःच्या इच्छेने शिक्षा स्वीकारणे) आणि दम(दमन करणे) हे दंडाचे चार प्रकार आहेत. अपराधी पुरुषाच्या(व्यक्तीच्या) अपराधाची पूर्ण माहिती घेऊनच त्यानुसार दंडाची(शिक्षेची) योजना करावी.

अर्थात दोषी व्यक्तीने कोणत्या देश आणि काल परिस्थितीत अपराध केलेला आहे याची चिकित्सा करूनच राजाने दण्ड(शासन) करावे असे संभाजी महाराजांना या श्लोकाद्वारे सांगायचे आहे.

श्लोक क्र ४६३
गुरून्पुरोहितान्विप्रान्वाग्दण्डेनैव दण्डयेत्।
विवादिनो नरांश्चान्यान् दोषिणोऽर्थेन दण्डयेत्।
महापराधयुक्तांश्च वधदण्डेन दण्डयेत्॥

अर्थ~कोणाला कोणत्या प्रकारचा दंड(शासन) करावा हे या श्लोकांत सांगितले आहे.
गुरू, पुरोहित आणि विप्र(विद्वान) यांना केवळ वाग्दंडाने म्हणजेच कठोर वचने बोलून शासन करावे. अर्थातच या सर्वांना शारीरिक शिक्षा करू नये असेच या श्लोकांत म्हटलेले आहे.

वादविवाद करणाऱ्यांना तसेच अन्य तत्सम दोषांच्या अपराध्यांना अर्थदंडाने दंडीत करावे. अत्यंत गंभीर अपराध करणाऱ्यांना वध-दंड म्हणजेच देहान्त शासन करावे.
मूळ श्लोक - याज्ञवल्क्य स्मृति

दण्डस्वरूपं निरुप्यते।
(आता दंडनीतीविषयीं निरूपण करीत आहोत...)
दण्डभेदानाह।
(दंडाचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे...)

श्लोक क्र ४६४
मित्रादिषु प्रयुञ्जति वाग्दण्डं धिक् तपस्विषु।
यथोक्तं तस्य तत्कुर्युरनुक्तं साधुकल्पितम्।।

अर्थ~मित्र इत्यादींच्या बाबतीत वाग्दंडाचा(कठोर बोलून शासन करणे) वापर करावा. तपस्वी लोकांना मात्र धिग्दंडाने(धिक्कार करून शिक्षा देणे) दंडीत करावे. अशा प्रकारे ज्याच्या बाबतीत जसे सांगितले आहे त्यानुसार त्याला त्याला दंडीत करण्याविषयी राजाने आचरण करावे.
मूळ श्लोक - अनुपुराण

श्लोक क्र ४६५
अधार्मिकं त्रिभिर्न्यायैर्निगृह्णीयात्प्रयत्नत:।
निरोधनेन बन्धेन विविधेन वधेन च।।

अर्थ~अधार्मिक अथवा नास्तिक लोकांच्या बाबतीत राजाने कशा प्रकारे दंडनीतीचा अवलंब करावा याविषयी संभाजी महाराजांनी या श्लोकांत सांगितले आहे. अधार्मिक/नास्तिक लोकांच्या अपराधाचा प्रकार आणि त्यामुळे उद्भवणारी हानी ध्यानांत घेऊन राजाने अत्यंत दक्षतापूर्वक आणि कठोर प्रयत्नपूर्वक खाली दिलेल्या तीन प्रकारच्या दंडमार्गाचा अवलंब करून उपाययोजना करावी.
१. विरोध करणे - शिक्षा म्हणून कारागृहात टाकणे, बंदिवासात ठेवणे.
२. बंधनात अडकविणे - साखळदंडाच्या अथवा बेडयांच्या साहाय्याने जखडून ठेवणे.
३. वध करणे - विविध प्रकारे शारीरिक ताडन करणे, शरीराचे अवयव तोडणे अथवा प्रसंगीं देहान्त शासन करणे.

संभाजी महाराजांना निधर्मी अथवा पुरोगामी असली बिरुदे लावणाऱ्यांनी वरील श्लोक पुन:पुन्हा वाचावा. अधार्मिक अथवा नास्तिक लोक संभाजी महाराजांच्या राज्यात शिक्षेस पात्र होते हेच या श्लोकांतून स्पष्ट होते. सदर श्लोक स्वतः संभाजी महाराजांनी अत्यंत विचारपूर्वक आपल्या "बुधभूषण" या राजनीतीपर ग्रंथात समाविष्ट केलेला आहे.
मूळ श्लोक - मनुस्मृति

तानि दशस्थानान्याह।
(ती दहा स्थाने पुढीलप्रमाणे आहेत...)
श्लोक क्र ४७०
एवं धर्मप्रवृत्तस्य राज्ञो दण्डधरस्य च।
यशोस्मिन्प्रथेते लोके स्वर्गे वासस्तथाक्षय:।।

अर्थ~अशा प्रकारे धर्मप्रवृत्त(धर्मानुसार आचरण करणाऱ्या) आणि राजदंड धारण करणाऱ्या राजाचे यश जगात प्रसिद्ध होते. तसेच अशा धर्माने दंडनीतीचे आचरण करणाऱ्या राजाला स्वर्गलोकांत अक्षय वास्तव्य लाभते.

मूळ श्लोक - मनुस्मृति

अथ ब्राह्मणप्रशांसामाह।
(आता ब्राह्मणांविषयी प्रशंसा...)
श्लोक क्र ४७१
इयं वसुंधरा देवी धर्मेण खलु धार्यते।
ध्रुवं स धार्यते वेदैस्ते धार्यन्ते द्विजातिभि:॥

अर्थ~ही वसुंधरादेवी(म्हणजेच भूमाता अर्थात पृथ्वी) धर्माच्या आधारावरच धारण केलेली आहे. तिचे पालन/रक्षण देखील धर्माच्या तत्वांचा अनुसारच केले जाते. या धर्माचे धारणा वेदांनीच केलेलीच आहे. म्हणजेच हा धर्म वेदांच्या तत्वांनुसार कार्य करतो आणि द्विज(ब्राह्मण) हे वेदांना आपल्या ठायीं धारण करतात(अर्थात द्विज लोक वेदांना जाणतात).
संस्कृत भाषेत द्विज हा शब्द ब्राह्मण या अर्थानेही वापरला जातो. अर्थातच जातीच्या संदर्भाने नव्हे तर वर्ण या संदर्भाने!
संभाजी महाराजांनी या श्लोकांत वेदप्रणित धर्माचा पुरस्कार केलेला आहे. किंबहुना धर्माच्या अस्तित्वामुळेच ही पृथ्वी शोभायमान झालेली आहे. वेद हेच आपल्या हिन्दु धर्माचे मूलाधार आहेत हेच शंभुराजांनी अधोरेखित केले आहे. त्यामुळेच हिन्दु धर्माला 'वैदिक धर्म" असेही म्हटले जाते.
संभाजी महाराजांप्रमाणे संत ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महर्षी दयानंद इत्यादी सर्वच महात्म्यांनी वेदांना धर्माचे मूळ आधार मानलेले आहे.

अथ ब्राह्मणप्रशांसामाह।
(आता ब्राह्मणांविषयी प्रशंसा...)
श्लोक क्र ४७२
अत: सर्वस्य लोकस्य मूलमेते 'द्विजातय:'।
पालनीया: प्रयत्नेन पूजनीयाश्च सर्वदा॥

अर्थ~म्हणूनच सर्व लोकांचे मूलस्थान हे ज्ञानवंत असे वेदज्ञ द्विज(ब्राह्मण) आहेत. अशा या ज्ञानवंत द्विजगणांचे राजाने प्रयत्नपूर्वक पालन करावे, त्यांचा सांभाळ करावा. हे द्विज लोक सर्वांना नेहमीच पूजनीय असतात.

श्लोक क्र ४७३
सुराणां भूसुराणां च सुरभीणां च पालनम्।
युगे युगे च ये धर्मास्तेषु धर्मेषु ये द्विजा:॥

अर्थ~सूर म्हणजे देव, भूसुर म्हणजे पृथ्वीवर मनुष्यरूपात असणारे देव(म्हणजेच राजा आणि ब्राह्मण) आणि सुरभि म्हणजे गाय. राजाने देवदेवता, ब्राह्मण आणि गाय यांचे प्रयत्नपूर्वक पालन, पोषण आणि रक्षण करावे. किंबहुना या सर्वांचे पालन, पोषण आणि रक्षण करणे हे राजाचे कर्तव्यच असते. अशा प्रकारच्या कर्तव्यांचे आचरण(व्रत म्हणून) करणे हा राजाचा धर्मच(राजधर्म) आहे असे प्रत्येक युगांत विद्वज्जनांनी सांगितलेले आहे. आपल्याकडे सत्, त्रेता, द्वापार आणि कली अशी चार युगे मंलेलीय आहेत.

सदरचे श्लोक स्वतः शंभूराजांनी रचलेले आहेत.
क्षत्रिय राजा: देवाचा अंश
श्लोक क्र ४९६
ज्ञात्वापराधं पुरुषं च लोके
विचार्य सभ्यैर्विदुषै: समग्रम्।
दण्ड्येषु दण्डं परिकल्पयेत्
पापस्य यद्यच्छमनं प्रकुर्यात्॥

अर्थ~तसेच राजाने पुरुषाचा(लोकांचा) अपराध जाणून घेऊन, आणि दंडास पात्र व्यक्तीसाठी जो दण्ड योग्य असेल, तो शास्त्रांचे अवलोकन करून आणि विद्वज्जनांसह विचार विनिमय करून, मगच त्याप्रमाणे दंडाची योजना करावी.
मूळ श्लोक - मत्स्यपुराण

श्लोक क्र ४९७
दूष्यानुपांशुदण्डेन हन्याद्राजाविलम्बितम्।
अदृष्टघातं कुर्वीरन्ये पापा राजवल्लभा:॥
अर्थ~ज्याचा अपराध सिद्ध झाला आहे अशा अपराधी व्यक्तीचा वध(अथवा अन्य शिक्षा) राजाने विनाविलंब/तात्काळ आणि गुप्तपणे करावा. कारण असे पापी लोक कुणालाही समजू न देतां, कधीही राजाचा घात करतात.

गुन्हेगारांना तात्काळ शासन करणे संभाजी महाराजांना अभिप्रेत आहे. आजच्या न्यायव्यवस्थेने यांतून खूप काही शिकण्यासारखे आहे.
सदर श्लोक संभाजी महाराजांनी स्वतः रचलेला आहे.

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
महाभारत(विदुरनीती/उद्योगपर्व)

श्लोक क्र ५०६
अपक्व: पक्वसंकाशो न च सीदेत कस्यचित्।
सुपुष्पित: स्यादफल: फलित: स्योद्युरारुह:॥

अर्थ~जो पिकलेला नाही परंतु पिकण्याच्या अवस्थेच्या अगदी जवळ आलेला आहे, असा वृक्ष कधीही नाश पावत नाही. फुलांनी बहरलेला वृक्ष कदाचित फळे देणार नाही, तर फळांनी युक्त असलेला वृक्ष चढण्यास(आरोहण करण्यास) कठीण असेल.
हा श्लोक महाभारतातील उद्योगपर्वातील असून रूपकात्मक आहे. येथे राजावर वृक्षाचे रूपक केलेले आहे. राजाने वृक्षाप्रमाणे सुंदर फुलांनी बहरलेले परंतु फलरहित असावे. अथवा फळयुक्त असावे परंतु ते फळ प्राप्त करण्यास कठीण असावे.

स्पष्टीकरण - राजाने आपल्या मधुर वाणीने आणि शांत वर्तणुकीने केवळ आपल्या वागण्या-बोलण्याने जनांस संतुष्ट ठेवावे. त्यांवर आपली कृपा असल्याचे सतत दर्शवित राहावे परंतु प्रत्यक्ष त्यांस धन-संपत्ती देऊन मोठे करू नये. त्यांना धन-संपत्ती सहज साध्य वाटता कामा नये याची दक्षता घ्यावी, असेच या श्लोकांत सांगावयाचे आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

श्लोक क्र ५०७
चक्षुषा मनसा वाचा कर्मणा च चतुर्विधम्।
प्रसादयति यो लोकं तं लोकोऽनुप्रसीदति॥
अर्थ~जो राजा आपल्या दृष्टीक्षेपाने, मनाने, बोलण्याने आणि वागण्याने अशा चार प्रकारे आपल्या प्रजेला प्रसन्न(संतुष्ट) करतो त्यावर त्याची प्रजा देखील सदैव खुश(प्रसन्न) असते.

सदर श्लोक संभाजी महाराजांनी स्वतः रचलेला आहे.

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५१०
धर्म्माचरतो राज्ञ: षड्भिश्चरितमानस:।
वसुधा वसुसंपूर्णो वर्धते भूतिवर्धिनी॥
अर्थ~सज्जन लोक ज्या धर्माचे अत्यंतिक निष्ठेने पालन करतात, त्या धर्माचे आचरण करणाऱ्या राजाची पृथ्वी(भूमी) धन-धान्याने संपन्न होते आणि उत्तरोत्तर वृद्धिंगत(अधिक कल्याणकारक) होते.

श्लोक ५११
अथ संत्यजतो धर्ममधर्ममनुतिष्ठत:।
प्रतिसंवेष्टते भूमिरग्नौ चर्ममिवाहितम्।।
अर्थ~धर्माच्या उदात्त तत्त्वांचा त्याग करून(धर्माला झुगारून देऊन) अधर्माने वागणाऱ्या राजांची भूमी(राज्य) आगीत टाकलेल्या चामड्याप्रमाणे आकुंचन पावते(कमी होत जाते).
राजाने सदैव धर्मानुसार आचरण ठेवावे असेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे. केवळ राजानेच नव्हे तर सर्वांनीच आपल्या धर्माचा सन्मान राखून त्यानुसार वागावे हेच सर्व ऋषी-महर्षी, साधु-संत आजवर सांगत आलेले आहेत. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांना "निधर्मी" असे लेबल लावणाऱ्यांनी संभाजी महाराजांचे "बुधभूषण" या ग्रंथांतील विचार आवर्जून अभ्यासावेत.
धर्माचें पालन।
करणें पाखांड खंडन।।
हेंचि आम्हां करणें काम।
बीज वाढवावें नाम।।
तीक्ष्ण उत्तरें।
हातीं घेऊनि बाण फिरे।।
नाहीं भीड भार।
तुका म्हणे साना थोर।।
~जगदूरू तुकोबाराय

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५१२
अकार्यकरणाद्भीत: कार्याणां च विवर्जनात्।
अकाले मन्त्रभेदाच्च येन माद्येन्न तत्पिबेत्।।

अर्थ~अकार्य म्हणजे अनुचित कार्य. ज्याच्यायोगे अनुचित कार्य करण्याची वृत्ती बळावते, योग्य ते कार्य करण्याची वृत्ती मंदावते आणि अकाली(अयोग्य वेळीं) चर्चा/मसलत करण्याची प्रवृत्ती वाढते, तसेच गुप्त चर्चा/निर्णय/धोरणे फुटण्याची शक्यता असते, ज्याच्या सेवनाने मद(माज) चढतो, अशा द्रव्याचे(दारू/नशेचे पदार्थ) सेवन कधीही करू नये.

संभाजी महाराजांचा सर्व प्रकारच्या व्यसनांना असलेला विरोध या श्लोकांतून स्पष्टपणे दिसतो. तरीही संभाजी महाराजांच्या नावाने व्यसनाचे पदार्थ बाजारात विकले जातात हे किती मोठे दुर्दैव!

श्लोक क्र ५१३
धर्मार्थौ य: परित्यज्य स्यादिन्द्रियवशानुग:।
श्रीप्राणधनदारेभ्य: क्षिप्रं स परिहीयते।।

अर्थ~धर्म म्हणजे राजधर्म अर्थात राजकर्तव्ये. अर्थ म्हणजे राजकोश अर्थात राज्याची संपत्ती. जो राजा आपला राजधर्म आणि कोश त्यांच्याकडे दुर्लक्ष करून इंद्रियांच्या आधीन होतो, तो लवकरच आपली सर्व संपत्ती, धन, प्राण आणि पत्नी यांना मुकतो. आपली कर्तव्ये विसरून केवळ इंद्रियांच्या आहारी जाऊन दुर्वर्तन करणाऱ्या राजाला त्याचे धन, संपत्ती, प्राण आणि पत्नी हे सर्व सोडून जातात.

सदर श्लोक संभाजी महाराजांनी स्वतः रचलेले आहेत.

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५१४
वाक्सायका वदनान्नि:पतन्ति यैराहत: शोचति रात्र्यहानि।
परस्परो मर्मसु ते पतन्ति तान्पण्डितो नावसृजेषु परेभ्य:॥

अर्थ~वाक्बाण म्हणजे कठोर वाणीद्वारे दुसऱ्यावर प्रहार करणे. जेव्हा (राजाच्या) तोंडातून कठोर वचने बाहेर पडतात, तेव्हा त्या वाक्बाणांनी घायाळ झालेला मनुष्य रात्रंदिवस तळमळत राहतो. कठोर वाणीने केलेला प्रहार हा नेहमीच मर्मस्थानांवर आघात करतो म्हणूनच शहाण्या माणसाने कोणाशीही कठोर वचने कधीही बोलू नये.

श्लोक क्र ५१५
यथा यथा हि पुरुष: कल्याणे कुरुते मति:।
तथा तथास्य सर्वार्था: शिष्यन्ते नात्र संशय:॥

अर्थ~जसा जसा मनुष्य चांगल्या कार्यामध्ये(सत्कार्यामध्ये) आपले मन गुंतवतो, तसे तसे सर्व गोष्टी त्याला अनुकूल होतात(त्याच्या शिष्य म्हणजे आज्ञा पाळणाऱ्या) बनतात यांत संशय नाही.

चांगले काम करणाऱ्या मनुष्याला सदैव चांगलेच अनुभव वाट्याला येतात म्हणून माणसाने नेहमी आपली बुद्धी चांगली ठेवावी, असेच या श्लोकांत संभाजी महाराजांना सांगायचे आहे.

मूळ श्लोक -महाभारत(उद्योगपर्व)

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५२१
द्यूतमेतत्पुराकल्पे दृष्टं वैरकरं नृणाम्।
तस्माद्द्यूतं न सेवेत हास्यार्थमपि बुद्धिमान॥

अर्थ~यापूर्वी(पूर्वीच्या काळीं) द्यूत म्हणजे जुगार खेळणे हा माणसांत वैर उत्पन्न करणारा क्रीडाप्रकार म्हणून अनुभवास आले आहे. म्हणूनच बुद्धिमान माणसाने गमतीसाठी म्हणूनही कधीही द्यूत अर्थात जुगार खेळू नये.

कौरव आणि पांडवांमधील वैरास द्यूतक्रीडाच कारणीभूत होती. आजच्या काळातही पत्ते, लॉटरी, लकी ड्रॉ इत्यादी माध्यमांतून जुगार चालू आहे. या सर्वांवर तात्काळ बंदी घालणे हेच संभाजी महाराजांच्या विचारांचा सन्मान करणे ठरेल.

श्लोक क्र ५२२
वाक्यं तु यो नाद्रियतेनुशिष्ट:
प्रत्याह यश्चाविनियुज्यमान:।
प्रज्ञाभिमानी प्रतिकूलवादी
त्याज्य: सदा दुर्धर एष भृत्य:॥

अर्थ~भृत्य म्हणजे सेवक. सेवक कसा असावा याचे विवेचन या श्लोकांत संभाजी महाराजांनी केलेले आहे. जो स्वामींच्या(धन्याच्या) आज्ञेला मान देत नाही, काम सांगितले असतां जो उलट/उद्धट बोलतो, अशा स्वतःच्या बुद्धीची घमेंड बाळगणाऱ्या आणि उद्धट सेवकाला तात्काळ कामावरून काढून टाकावे.
मूळ श्लोक -महाभारत(उद्योगपर्व)

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५३९
मद: स्वप्नमविज्ञानमाकारं चात्यसंशयम्।
दुष्टामात्येषु विश्रम्भं दूताच्चाकुशलादपि॥

अर्थ~ज्या सहा मार्गांनी गुप्त चर्चा फुटू शकते ते मार्ग या श्लोकांत सांगितले आहेत.

मद, निद्रा, अज्ञान(अविज्ञान), चेहऱ्यावरील आकार-विकार, दुष्ट मंत्र्यांवरील विश्वास आणि अडाणी(अकुशल) दूत हे गुप्त चर्चा फुटण्याचे सहा मार्ग आहेत.

श्लोक क्र ५४०
द्वाराण्येतानि यो ज्ञात्वा संवृणोति सदा नृप:।
त्रिवर्गचरणे युक्त: स शत्रूनधितिष्ठति॥

अर्थ~गुप्त चर्चा ज्यांच्याद्वारे फुटू शकते ती सहा द्वारे जाणून घेऊन, जो राजा ती सहा द्वारे सदैव बंद राखतो, तो राजा धर्म, अर्थ आणि काम या त्रिवर्गाचे आचरण करण्यात तत्पर असतां, शत्रूच्या मस्तकावर पाय देऊन उभा राहतो(शत्रूला आपल्या नियंत्रणात ठेवतो).
मूळ श्लोक -महाभारत(उद्योगपर्व)

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५४१
न वै श्रुतमविज्ञाय वृद्धाननुपसेव्य च।
धर्मार्थौ वेदितुं शक्यौ बृहस्पतिसमैरपि॥

अर्थ~श्रुती म्हणजे वेद. श्रुतींचा म्हणजेच वेद-वेदांगांचा अभ्यास केल्याशिवाय आणि वृद्धांची म्हणजेच ज्ञानवृद्ध, तापोवृद्ध आणि वयोवृद्ध लोकांची सेवा केल्याशिवाय धर्म आणि अर्थ हे दोन पुरुषार्थ जाणून घेणे प्रत्यक्ष बृहस्पतीला देखील अशक्यच आहे.

धर्मशास्त्राचे अध्ययन करणे आणि वृद्ध वडीलधाऱ्या लोकांची सेवा करणे हाच धर्माचा आत्मा आहे हेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे.

श्लोक क्र ५४२
राजोपसेवितं वैद्यं धार्मिकं प्रियदर्शनम्।
मित्रवन्तं स्ववाक्यं च सुहृदं परिपालयेत्॥

अर्थ~स्वराज्याची/स्वदेशाची मनःपूर्वक सेवा करणारा विद्वान, वैद्य, धार्मिक, प्रसन्नवदन, पुष्कळ मित्र असलेला आणि मधुर भाषण करणारा असा मित्र सदैव सुरक्षित राखावा.

वरील श्लोकांत उल्लेखिलेले सर्वच गुण ज्यांच्या ठायीं होते अशा कवी कलश यांना संभाजी महाराजांनी सदैव आपले जिवलग मित्र मानले. अगदी अखेरच्या कसोटीच्या क्षणीं देखील हे दोघे जिवलग मित्र अत्यंत धीरोदात्तपणे देशासाठी आणि धर्मासाठी बलिदान झाले हा इतिहास तर सर्वश्रुतच आहे.
मूळ श्लोक -महाभारत(उद्योगपर्व)

क्षत्रिय राजा : देवाचा अंश
श्लोक क्र ५५३
आशा धृतिं हन्ति समृद्धिमन्त:
क्रोध: श्रियं हन्ति कदर्यताम्
अपालनं हन्ति पशूंश्च भूपे
एक: क्रुद्धो ब्राह्मणो हन्ति राष्ट्रम्॥

अर्थ~कोण कोण कशाचा नाश करते हे या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे. आशा धैर्याचा नाश करते. मृत्यू समृद्धीचा नाश करतो. क्रोध संपत्तीचा नाश करतो. कृपणपणा(कंजूष वृत्ती) कीर्तीचा नाश करतो. आपल्या कर्तव्यांचे पालन न करणारा राजा आपल्या राज्यातील प्रजाजन आणि प्राणिमात्रांचा नाश करतो आणि यज्ञदीक्षा घेतलेला, राज्याभिषिक्त राजा(यालाच ब्राह्मण असे म्हटले आहे) जेव्हा क्रोधीत होतो तेव्हा तो सर्व राष्ट्राचा नाश करतो. महाभारतात याच कारणाने 'राजा कालस्य कारणम्' असे म्हटले आहे.

श्लोक क्र ५५४
अधीत्य वेदान्परिसंस्तीर्य चाग्नीनिष्ट्वा
यज्ञै: पालयित्वा प्रजाश्च।
गोब्राह्मणार्थे शस्त्रपूतान्तरात्मा
हत: संग्रामे क्षत्रिय: स्वर्गमेति॥

अर्थ~ज्या राजाने वेदांचे अध्ययन केलेले आहे, ज्याने अग्नीची स्थापना करून यज्ञ केलेला आहे, ज्याने प्रजेचे पालन उत्तम तऱ्हेने केलेले आहे आणि ज्याने गायी(गोमाता) आणि ब्राह्मण(विद्वज्जन) यांच्या रक्षणार्थ हातांत शस्त्र धारण करून आणि प्रसंगी प्राणार्पण करून त्यांचे रक्षण केलेले आहे असा राजा जर युद्धात मारला गेला तर त्यास स्वर्गलोक प्राप्त होतो.

गायीचे आणि ब्राह्मणाचे रक्षण करतां करतां जो राजा प्राणार्पण करतो त्याला स्वर्गप्राप्ती होते असेच संभाजी महाराजांनी या श्लोकांत सांगितले आहे. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या बाबतीत अनेकदा 'गोब्राह्मणप्रतिपालक' या उपाधीवरून वाद निर्माण केला जातो. या वादाचे अत्यंत योग्य निराकरण सदर श्लोकांत संभाजी महाराजांनी केलेले आहे.

मूळ श्लोक -महाभारत(उद्योगपर्व)

कामन्दक:।
(कामन्दक नीती...)
श्लोक क्र ५५५
प्रभाव: शुचिता मैत्री त्याग: सत्यं कृतज्ञता।
कुलं शीलं दमश्चेति गुणा: संपत्तिहेतव:॥

अर्थ~प्रभाव, पवित्रता, मैत्री, त्यागीपणा, सत्य बोलण्याची वृत्ती, कृतज्ञता(इतरांनी केलेल्या उपकारांची जाणीव ठेवण्याची वृत्ती), शास्त्रमार्गाने वर्तणे(धर्म आणि नीतिमत्ता यांविषयी धर्माने सांगितलेल्या मार्गाने चालण्याची प्रवृत्ती), स्वतःचे शील जपण्याची वृत्ती आणि इंद्रियांचे दमन(नियंत्रण) हे सर्व गुण मानवास सर्व प्रकारची संपत्ती प्राप्त होण्यासाठी आधारभूत, सहाय्यक आणि प्रेरक ठरतात.

श्लोक क्र ५५६
सकामासक्तमनसां कान्तामुखविलोकने।
गलन्ति गलिताश्रूणां यौवनेन सह श्रिय:॥

अर्थ~ज्यांचे मन कामवासनेने आसक्त झालेले असून कांतेचे मुख पाहण्यात रममाण झालेले असते, त्यांचे वैभव, धन, संपत्ती, लक्ष्मी, ऐश्वर्य आणि तारुण्य हे सर्व काही अश्रूंच्या धारांसह गळून नष्ट होऊन जाते.

ज्यांना राष्ट्राच्या, धर्माच्या हिताचे कार्य करायचे असेल त्यांनी स्वतःला इंद्रियांच्या, कामवासनेच्या मोहापासून दूर ठेवले पाहिजे असे संभाजी महाराज वरील श्लोकांत सांगत आहेत.

मूळ श्लोक - कामन्दकीय नीतिसार

कामन्दक:।
(कामन्दक नीती...)
श्लोक क्र ५५९
याने शय्यासने भोज्ये पाने शस्त्रे विभूषणे।
सर्वत्रैवाप्रमत्त: स्याद्बुद्धे न विषदूषणम्।।

अर्थ~वाहन, शय्या(झोप), आसन, खाणे-पिणे, वस्त्र आणि अलंकार इत्यादी बाबतींत राजाने मर्यादेचे पालन करावे आणि अतिरेक करू नये. या सर्व वस्तूंमध्ये विष मिसळण्यात येत असते म्हणून या सर्व वस्तूंची नीट परीक्षा करून मगच त्यांचा वापर करावा. जर या वस्तू विषदूषित असल्याचे आढळले तर त्या फेकून द्याव्यात.

श्लोक क्र ५६०
संधिं च विग्रहं चैव यानमासनमेव च।
द्वैधीभावं संश्रयं च षाड्गुण्यं चिन्तयेत्सदा।।

अर्थ~शत्रूच्या बाबतीत संधी(तह), विग्रह(युद्ध), स्थान(शत्रूवर आक्रमण), आसन(उपेक्षा), समाश्रय(बलवानाची मदत घेणे) आणि द्वैधीभाव(शत्रुसैन्यात फूट पाडून त्यांची शक्ती विभागणे) हे राजमंत्रणेचे सहा गुण आहेत. या नीतीचा अवलंब देश, काल आणि परिस्थिती पाहून याथोचितपणे

कामन्दक:।
(कामन्दक नीती...)
श्लोक क्र ५६१
पौरा जानपदान्सर्वा: शत्रुग्रहणसमय:।
दीर्घाध्वनि परिश्रान्तं क्षुत्पिपासाहितश्रमम्।।

अर्थ~आपल्या देशावर शत्रूने आक्रमण केले असतां, त्या संकटाच्या वेळी, राजाने आपल्या थकलेल्या, भुकेलेल्या, तहानलेल्या सैन्याचे आणि प्रजेचे शत्रूच्या आक्रमणामुळे उद्भवणाऱ्या त्रासापासून(यातनांपासून) संरक्षण करावे तसेच त्या आपत्तीचे निराकरण करावे.

श्लोक क्र ५६२
व्याधिदुर्भिक्षमरकपीडितं तद्वदेव हि।
घोराग्निभयवित्रस्तं वृष्टिवातसमाहतम्।।

अर्थ~रोगराई, महामारी, आजारांची साथ(व्याधी), दुष्काळ, रोगग्रस्तता, भयंकर अग्नी आणि भय यांमुळे त्रस्त झालेले आणि अतिवृष्टी, वादळे यांमुळे संकटात सापडलेल्या लोकांचे राजाने रक्षण करावे.

मूळ श्लोक - शुक्रनीतिसार/कामन्दकीय नीतिसार

कामन्दक:।
(कामन्दक नीती...)
श्लोक क्र ५६३
पङ्कपांसुजलस्कन्नव्यस्तं श्वासाकुलाकुलम्।
प्रसुप्तं भोजने व्यग्रमभूमिष्वसनं स्थितम्।।

अर्थ~ज्या लोकांचे जीवन चिखल, पूर, धुळीची वादळे इत्यादी आपत्तींमुळे उध्वस्त झाले आहे, अशा लोकांपासून राजाने प्रजेचे रक्षण करावे. तसेच निद्राधीन, भोजनव्यस्त, चोर, अग्नी आणि पाऊस यांच्यामुळे त्रासलेल्या सैन्याचे राजाने शत्रुसैन्यापासून रक्षण करावे.

श्लोक क्र ५६४
एवमादिषु जातेषु व्यसनेषु समाकुलम्।
स्वसैन्यं साधु रक्षेत परसैन्यं च घातयेत्।
विशिष्टो देशकालाभ्यां युक्त: प्रकृतिर्भिबलै:।।

अर्थ~शत्रूच्या सैन्याचा राजाने संहार करवावा. जेव्हा देश(युद्धभूमी) आणि काल(वेळ) आपल्याला अनुकूल असेल आणि शत्रूपक्षाला प्रतिकूल असेल, तेव्हा बलवान राजाने रात्रीच्या वेळी युद्ध करावे. याच्या विपरीत परिस्थितीमध्ये मात्र कूट-युद्ध करावे.

शिवाजी महाराजांनी या नीतीचा अवलंब आपल्या सामरिक जीवनात सातत्याने केलेला आपल्या निदर्शनास येतो.
मूळ श्लोक - कामन्दकीय नीतिसार

कामन्दक:।
(कामन्दक नीती...)
श्लोक क्र ५६५
निशि विश्रम्भसंयुक्तं तत्सौप्तिकविधानवत्।
इत्येवं कूटयुद्धेन हन्याच्छत्रून्लघूत्थित:।।

अर्थ~सौप्तिक म्हणजे झोपलेल्या अवस्थेत शत्रुसैन्यावर अचानकपणे हल्ला करून त्यांना ठार करणे. याच पद्धतीने अश्वत्थाम्याने महाभारत युद्धात द्रौपदीच्या पाच पुत्रांना झोपेतच ठार केले होते. लघुत्थित म्हणजे कमी श्रमांत शत्रूपक्षाची जास्तीत जास्त हानी करणे.

शत्रुपक्षाचे जे सैनिक रात्रीच्या वेळी सुखाने झोपलेले असतील, त्या वेळी सौप्तिक विधानाप्रमाणे त्यांच्यावर हल्ला करून त्यांस मारावे. अशा प्रकारे कूट-युद्धाचा वापर करून कमी प्रयत्नांत शत्रूची जास्तीत जास्त हानी करावी. लालमहालात शाईस्तेखानावर शिवाजी महाराजांनी रात्रीच्या वेळी अचानकपणे केलेला हल्ला(surgical strike) हे या सौप्तिक नीतीचे उत्तम उदाहरण आहे.
मूळ श्लोक - कामन्दकीय नीतिसार

श्लोक क्र ५६६
उपरून्धन्ति राजानो भूतानि विविधानि च।
त एव विनयं प्राप्य वर्धयन्ति पुनः प्रजा:।।

अर्थ~राजे लोक सर्व प्राणिमात्रांच्या प्रगतीत अडथळे निर्माण करतात. परंतु त्याच जीवांनी नम्रतेचा स्वीकार केला तर तेच राजे प्रजेची उन्नती करतात.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ५६७
ता लुण्ठेत्पीडयेच्च शत्रो: प्रकृतय: स्वयम्।
वशे जाते पुनस्तासु पितृवद्वृत्तिमाचरेत्।।

अर्थ~राजाचे हे कर्तव्यच आहे की त्याने आपल्या शत्रूला बाहेर खेचून काढावे, त्याला त्रस्त करावे आणि पराभूत करावे. परंतु एकदा शत्रू आपल्याला वश झाला असतां, राजाने त्या शत्रूशी पित्यासमान आचरण करावे. म्हणजेच त्या पराभूत शत्रूचे पालकत्व स्वीकारावे.

श्लोक क्र ५६८
द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ।
परिव्राड्योगयुक्तश्च युद्धे चाभिमुखो गत:।।

अर्थ~या जगात सूर्यमंडल भेदून जाणारे केवळ दोनच श्रेष्ठ पुरुष असतात. एक म्हणजे 'योगी परिव्राजक'(विद्वान आणि तपस्वी असे संन्यासी) आणि दुसरे म्हणजे युद्धात शत्रूच्या समोर जाऊन उभा राहिलेला धैर्यवान क्षत्रिय योद्धा.

हिन्दु धर्मशास्त्राप्रमाणे सूर्यमंडल भेदून जाणे म्हणजे मोक्षगतीला प्राप्त होणे, अर्थातच जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होणे. युद्धात शत्रूच्या समोर धैर्याने उभा ठाकणाऱ्या वीर पुरुषाला मोक्षप्राप्ती होते असे संभाजी महाराज या श्लोकांत म्हणत आहेत.
शिवाजी महाराजांच्या पदरी नोकरी मागण्यास आलेल्या छत्रसाल बुंदेल्याला शिवाजी महाराजांनी नोकरी न करतां, आपल्या क्षात्रतेजाच्या बळावर औरंगजेबाशी युद्धास सिद्ध होण्याचा सल्ला दिला होता. त्या प्रसंगीं शिवाजी महाराज छत्रसालास उद्देशून म्हणतात,"छत्रसालजी, आपण तर क्षत्रियांचे मुकुटमणी! आपण हातीं खड्ग घेऊन आणि व्रजराज श्रीकृष्णाचे स्मरण करून, आपला मुलुख(बुंदेलखंड) स्वतंत्र करण्यासाठी सिद्ध व्हावे. या कामी आपण यशस्वी झालात तर पृथ्वीवर राज्य कराल आणि दुर्दैवाने अपयशी झालात तर सूर्यमंडल भेदून जाल."

शिवाजी महाराजांनी महाभारताचे सखोल अध्ययन केले असावे असे या प्रसंगावरून निश्चितपणे वाटते.
मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)
श्लोक क्र ५७१
स्वर्गस्य मार्गा बहव: प्रदिष्टास्ते
कृच्छ्रसाध्या: कुटिला: सविघ्ना:।
निमेषमात्रेण महाफलोयमृजुश्च
पन्था: समरे व्यसुत्वम्॥

अर्थ~स्वर्गप्राप्तीचे अनेक मार्ग(धर्मशास्त्राने) सांगितलेले आहेत. ते सर्वच मार्ग अत्यंत कष्टप्रद, संकटांनी भरलेले आणि वाकडेतिकडे असेच आहेत. परंतु क्षणभरात फार मोठे फळ(मोक्षप्राप्ती) देणारा एकमेव सरळ आणि सहज मार्ग- 'रणांगणात शत्रूंशी युद्ध करताना मृत्यू येणे' हा होय.

श्लोक क्र ५७२
द्विजा अपि न गच्छन्ति यां गतिं नैव योगिन:।
स्वाम्यर्थे संत्यजन्प्राणांस्तां गतिं याति सेवक:॥

अर्थ~अत्यंतिक ज्ञानी(द्विज), तपःपूत योगी आणि तपस्वी जनांना त्यांच्या तपश्चर्येच्या अथवा ज्ञानाच्या आधारे देखील जी अवस्था(मोक्षगती) प्राप्त होत नाही, ती गती(मोक्षगती) आपल्या धन्याच्या(स्वामींच्या) कामासाठी प्राणार्पण करणाऱ्या सेवकांना प्राप्त होते.

भगवान श्रीकृष्णाने हाच उपदेश भग्वद्गीतेमध्ये अर्जुनाला केलेला आहे. रणांगणात लढताना आणि आपल्या स्वामींचे कार्य पार पाडत असताना युद्धभूमीवर आलेला मृत्यू हा मोक्षगती प्राप्त करून देतो ही आपल्या धर्माची श्रद्धा आहे. हेच तत्व शिरोधार्य मानून, तानाजी मालुसरे, बाजी प्रभू देशपांडे, सूर्यराव काकडे, शिवा काशीद, रामाजी पांगेरा, मुरारबाजी इत्यादी नरवीरांनी आपले प्राण आपल्या स्वामींच्या म्हणजेच शिवछत्रपतींच्या कार्यासाठी हसत हसत अर्पण केले.

स्वतः संभाजी महाराजांनी हिन्दवी स्वराज्याच्या आणि स्वधर्माच्या रक्षणासाठी, अवघ्या बत्तीसाव्या वर्षी केलेले धीरोदात्त बलिदान हे याच तत्वाला अनुसरून केले आहे.

आजच्या काळात देखील आपल्या देशाच्या रक्षणार्थ सीमेवर बलिदान देणाऱ्या जवानांना हाच न्याय लागू होतो. राष्ट्राच्या रक्षणार्थ युद्धभूमीवर बलिदान पत्करणारे भारतीय सैनिक हे निश्चितपणे मोक्षगतीला प्राप्त होतात.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित/शारङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५७३
एतत्तपश्च पुण्यं च धर्मश्चैव सनातन:।
चत्वारश्चाश्रमास्तस्य यो युद्धे न पलायते॥

अर्थ~युद्धात शत्रूशी लढताना तोंड वळवून, त्याला पाठ दाखवून रणांगणातून माघारी निघून नयेणे(माघार न घेणे), हेच तप आहे. शत्रूला पाठ न दाखवता धैर्याने लढणे हेच पुण्य आहे, हाच शाश्वत(सनातन) धर्म आहे आणि हेच चार आश्रमांचे यथायोग्य पालन करणे आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम हे चार आश्रम मानले गेले आहेत.

मूळ श्लोक - शुक्रनीतीसार

श्लोक क्र ५७४
यदि समरमपास्य नास्ति जन्तो-
र्भयमिति युक्तमतोन्यत: प्रयातुम्।
अथ मरणमवश्यमेव जन्तो: किमिति
मुधा मलिनं यश: कुरुध्वम्॥

अर्थ~जर युद्धापासून दूर राहण्याचे(युद्ध टाळण्याचे) कारण भय हे नसेल, तर इतर पर्याय स्विकारता येईल. परंतु प्रत्येक जीवाला मरण जर अटळच आहे, न चुकणारे आहे, तर मग (केवळ जीवाच्या भीतीने रणांगणातून पळ काढून) आपले यश कलंकित करण्याचा वेडेपणा का करावा?

रणांगणातून जीवाच्या भयाने पळ काढणे हे क्षात्रवृत्तीला(क्षत्रियत्वाला) कलंक आहे असेच संभाजी महाराजांना या श्लोकांत सांगायचे आहे. हाच विचार त्यांनी त्यांच्या बलिदानाच्या प्रसंगी आचरून दाखविला आहे.

मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ५७५
वृध्दो बालो न हन्तव्यो नैव स्त्री नैव वा द्विज:।
तृणपूर्णमुखश्चैव तवास्मीति च यो वदेत्॥

अर्थ~वृद्ध मंडळी, लहान बालके, स्त्रिया आणि विद्वज्जन(द्विज/ब्राह्मण) यांची हत्या कधीही करू नये. ज्याने मुखात अन्नाचा घास घेतलेला असेल आणि 'मी तुमचाच आहे...मला मारू नका' अशी याचना करीत असेल त्याला कोणीही कधीही मारू नये. अन्न-पाणी भक्षण करणाऱ्या कोणालाही कधीही मारू नये, या धर्माच्या तत्वाचे सर्वांनी पालन करणे संभाजी महाराजांना अभिप्रेत आहे.

श्लोक क्र ५७६
ब्राह्मणार्थे समुत्पन्ने भिनिसृज्य युध्यति।
आत्मानं यूपमुत्सृज्य स यज्ञोनन्तदक्षिण:॥

अर्थ~जो क्षत्रियकुलोत्पन्न राजा ब्राह्मणाच्या(विद्वज्जनांच्या) रक्षणासाठीच जन्माला आलेला असून त्याच कारणास्तव युद्ध करतो, आणि त्या युद्धरुपी यज्ञात स्वतःला समर्पित करून त्या यज्ञाची पूर्तता करतो, तो यज्ञ सर्वश्रेष्ठ होय.

विद्वान लोकांच्या रक्षणार्थ राजाने प्रसंगी स्वतःचे सर्वस्व पणाला लावावे हेच संभाजी महाराजांना या श्लोकांत सांगायचे आहे.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित
श्लोक क्र ५८१
प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशन:।
राज्ञ: श्रियं कुलं प्राणान्नादग्ध्वा विनिवर्तते॥

अर्थ~प्रजेला पीडल्याने म्हणजेच त्रास देण्यामुळे, दुःखे देण्यामुळे जो संतापाचा अग्नी निर्माण होतो, तो अग्नी राजाचे कुळ, संपत्ती, वैभव, कीर्ती आणि प्राण इत्यादी सर्व काही जाळून राख करून मगच शांत होतो. म्हणूनच राजाने प्रजेच्या हिताची कामे करावीत, त्यांचे सुख चिंतावे आणि त्यांचे आशीर्वाद घ्यावेत हेच योग्य!

श्लोक क्र ५८२
भूमिर्मित्रं हिरण्यं वा विग्रहस्य फलत्रयम्।
नास्त्येकमपि यद्येषां तन्न कुर्यात्कथंचन॥

अर्थ~भूमी(भूप्रदेश), मित्र(सहयोगी) आणि सोने-नाणे(हिरण्य) ही युद्धाची फळे आहेत. म्हणजेच युद्ध जिंकल्याने या गोष्टी प्राप्त होतात. या तीन पैकी एकही गोष्ट जर प्राप्त होणार नसेल तर ते युद्ध कोणत्याही स्थितीत आणि कोणत्याही अन्य कारणास्तव कधीही करू नये.

युद्धाच्या प्रसंगात जय होवो अथवा पराजय, अनेक सेवकांचे प्राण पणाला लागत असतात. लोकांचे प्राण संकटात घालून काही प्राप्ती होणार असेल तरच युद्ध करणे श्रेयस्कर मानावे असेच संभाजी महाराज या श्लोकांत सांगत आहेत.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५८३
शपथै: संधितस्यापि न विश्वासं व्रजेद्रिपो:।
राज्यलोकोद्धतो वृद्ध: शक्रेण शपथैर्हत:॥

अर्थ~शपथ घेऊन संधी(म्हणजे तह) केल्यानंतर देखील, शत्रूवर कधीही विश्वास ठेवू नये. राज्याचा लोभ बाळगणाऱ्या वृत्राची(वृद्ध) हत्या तर इंद्राने शपथ घेतल्यानंतरही केली होती.

वृत्राने इंद्राचा पराभव केल्यानंतर, इंद्राने या वृत्रासह तह केला होता आणि त्यास अर्धे इंद्रपद दिले होते. तरीही इंद्राने तह मोडून पुढे या वृत्राचा वध केलाच.

पराभूत झालेला शत्रू कितीही गयावया करत असेल आणि क्षमायाचना करीत असेल तरीही त्याच्यावर कधीही विश्वास ठेवू नये हेच संभाजी महाराजांना सांगायचे आहे.
मूळ श्लोक - कामन्दकीय नीतिसार

श्लोक क्र ५८४
कौर्मम् संस्थानमास्थाय प्रहारानपि मर्षयेत्।
काले काले च मतिमान् उत्तिष्ठेत्कृष्णसर्पवत्।॥

अर्थ~कासव जसे संकटाच्या क्षणीं आपल्या सर्व इंद्रियांचा संकोच करून घेते आणि सर्व आघात सहन करते, तसेच (राजानेही) कठीण प्रसंगी इंद्रियांचा संकोच करून आपल्या शत्रूचे आघात सहन करावे. परंतु अनुकूल काळ प्राप्त होताच, योग्य संधी पाहून राजाने शत्रूंविरुद्ध क्रूर सापाप्रमाणे फणा काढून शत्रूवर कठोर प्रहार करण्यास सिद्ध झाले पाहिजे.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५८५
तावद्भयाद्धि भेतव्यं यावद्भयमनागतम्।
आगतं तु भयं दृष्टा प्रहर्तव्यमभीतवत्।॥

अर्थ~जोपर्यंत आपल्यावर एखादे संकट(भीतीदायक प्रसंग) आलेले नसते, तोपर्यंत त्याला घाबरणे (एकवेळ) योग्य ठरेल. मात्र एकदा ते संकट आल्यावर मात्र त्याला न घाबरतां, त्या संकटावर पूर्ण शक्तीने आणि क्षमतेने प्रहार करावा.

श्लोक क्र ५८६
(मा तात साहसं कार्षिर्विभवैर्गर्वमागत:।)
स्वगात्राण्यपि भाराय भवन्ति हि विपर्यये।
मा त्वं तात बले स्थित्वा बाधेथा दुर्जनं जनम्॥

अर्थ~दुष्ट लोकांना देखील निष्कारण त्रास देऊ नये असा संदेश या श्लोकात दिलेला आहे. आपल्या शरीराचे अवयव देखील कधी कधी ओझे वाटू लागतात, परंतु आपण त्यांचा त्याग करत नाही. तसेच आपण बलवान असलो तरीही आपल्या शक्तीचा गर्व बाळगून, दुष्टांना अकारण त्रास देऊ नकोस.

श्लोक क्र ५८७
न हि दुर्बलदग्धानां बाल किंचित्प्ररोहति॥

अर्थ~हे अवश्य ध्यानात ठेव की, दुबळेपणाने जे होरपळून गेलेले असतात, त्यांच्या हातून काहीही घडत नाही.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५९०
न काल: खड्गमादाय शिर: कस्यापिकृन्तति।
कालस्य बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम्॥

अर्थ~काळ हा कधीही हातात तलवार(शस्त्र) घेऊन कोणाचाही शिरच्छेद(सर्वनाश) करीत नसतो. त्यापेक्षा(सर्वनाशापेक्षा) विपरीत म्हणजेच जास्त दुःखद गोष्टींचे दर्शन घडविणे हेच काळाचे खरे सामर्थ्य आहे.

श्लोक क्र ५९१
न तु हन्यान्महीपालो दूतं कस्यांचिदापदि।
दूतं हत्वा तु नरकं प्राविशेन्मन्त्रिभि: सह॥

अर्थ~राजाने कोणत्याही अडचणीच्या प्रसंगांत देखील, कोणाच्याही दूताची हत्या करू नये. ज्या राजाच्या हातून पराराज्याच्या दूताची हत्या घडते, तो राजा आपल्या मंत्रीगणांसह नरकात जातो.

म्हणूनच आपल्या भारतीय(अर्थात हिन्दु) परंपरेत दूताची हत्या करणे पापकर्म मानलेले आहे. शत्रूच्या दूताला देखील प्रसंगी जीवदान द्यावे असेच धर्म सांगतो.

मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५९२
नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रै:।
इति महति विरोधे वर्तमाने समाने।
तदुभयहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रै:॥

अर्थ~राजाच्या सतत जवळ असणारा, राजाचे हित चिंतणारा जो कार्यकर्ता असतो, त्याला नेहमीच सामान्य लोकांच्या द्वेषाचा सामना करावा लागतो. सामान्य लोकांच्या हितासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्याचा राजाकडून त्याग केला जातो. अशा प्रकारचा विरोधाभास नेहमीच प्रत्ययाला येतो. या परस्परविरोधी असलेल्या दोन्ही बाजूंच्या हितासाठी झटणारा कार्यकर्ता देखील अंततः राजाच्या लोकांकडून टाळला जातो. राजा आणि जनता या दोहींचे हित व्हावे यासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याचा राजाच्या पक्षाच्या लोकांकडून विरोध(त्याग) केला जातो.

राजा आणि सामान्य प्रजा या दोन्हीचे हित यशस्वीपणे सांभाळणारा कार्यकर्ता खरोखर दुर्मिळ असतो.

श्लोक क्र ५९३
न कश्चिच्चण्डकोकानामात्मीयो नाम भूभुजाम्।
होतारमभिजित्स्वन्ते दहत्येव हि पावक:॥

अर्थ~अत्यंत क्रोधी(रागीट) असणाऱ्या राजाला अत्यंत जवळचा असा हितचिंतक(माणूस) कोणीही नसतो. 'अभिजित' या यज्ञानंतर निर्माण होणारा अग्नी हा यज्ञकर्त्याला अत्यंत तीव्रतम गरम चटके देतोच.
सदैव क्रोधी असणाऱ्या माणसाला, त्याच्या रागीट स्वभावामुळे कोणीही जवळ करत नाही. अशा प्रकारे क्रोधी व्यक्तीला स्वतःला देखील आपल्या क्रोधाग्नीचे अत्यंत गरम चटके सहन करावे लागतात.
या श्लोकांत क्रोधावर अग्नीचे रूपक करण्यात आलेले आहे.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ५९८
आयाच्चतुर्थभागेन व्ययकर्म प्रवर्तयेत्।
प्रभूततैलदीपोपि चिरं भद्राणि पश्यति॥

अर्थ~आपली जेवढी मिळकत(उत्पन्न) असेल त्याच्या एक चतुर्थांश एवढ्या भागापुरताच आपला खर्च मर्यादित ठेवावा. आपल्या एकूण उत्पन्नाचे चार भाग करून त्यापैकी एक भाग आपल्या खर्चासाठी वापरावा. उरलेले तीन भाग भविष्यातील खर्चाच्या तरतुदीसाठी शिल्लक ठेवावे. असे करण्याने, भरपूर तेल असल्याने दीर्घकाळ प्रज्वलित राहणाऱ्या तेलाच्या दिव्यप्रमाणे, मनुष्य दीर्घकाळपर्यंत सत्कृत्ये करण्यासाठी सक्षम राहतो. तसेच स्वतः केलेल्या सत्कार्याची सातत्यता आणि निरंतरता अनुभवतो.

कोणतेही सत्कार्य करण्यासाठी अनेकदा आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते. बचतीच्या माध्यमातून जमा केलेले धन अशा सत्कार्याची सातत्यता टिकविण्यासाठी उपयोगी पडते.

श्लोक क्र ५९९
अबुद्धिमाश्रितानां च क्षन्तव्यमपराधिनाम्।
न हि सर्वत्र पाण्डित्यं सुलभं पुरुषे क्वचित्॥

अर्थ~ज्यांच्याकडे बुद्धीचा अभाव आहे अशा निर्बुद्ध लोकांना आश्रय देणे तसेच ज्यांनी काही अपराधी कृत्य केले आहे अशा लोकांना क्षमा करणे हे योग्यच आहे. समाजात सर्वच लोक बुद्धिमान आणि सद्विचारी असणे हे कधीही सहजसाध्य नसते. पांडित्य आणि विद्वत्ता हे गुण सर्वच लोकांकडे कधी आढळत नाहीत, ते कधीही सुलभपणे मिळत नाहीत.

समाजातील सर्वच लोक बुद्धिमान आहेत असे कधीही समजू नये. म्हणूनच त्यांचे अज्ञान ध्यानात घेऊन त्यांच्याबद्दल दयाबुद्धीने वर्तावे.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ६०३
परान्नं परवस्त्रं च परशय्यासनेस्थितं।
परमेश्मनिवासं च दुरत: परिवर्जये त्॥

अर्थ~दुसऱ्याचे अन्न, दुसऱ्याच्या शय्येवर असलेली स्त्री आणि परक्याच्या घरी मुक्काम करणे या तीन गोष्टी दुरूनच वर्ज्य मानाव्यात.

श्लोक क्र ६०४
धनधान्यप्रयोगेषु विद्यासंग्रहणेषु च।
आहारे व्यवहारे च त्यक्तलज्ज: सुखी भवेत्॥

अर्थ ~ संपत्तीचा उपयोग करताना, धान्याचा व्यवहार करताना, विद्या प्राप्त करताना, भोजन करताना आणि व्यवहार करताना जो लाज, संकोच, भीड याचा त्याग करेल तोच सुखी होईल.

श्लोक क्र ६०५
मूर्खस्तु परिहर्तव्य: प्रत्यक्षो द्विपद: पशु:।
विध्यते वाक्यशल्येन अदृष्ट: कण्टको यथा॥

अर्थ~मूर्ख माणसांचा नेहमी त्याग करावा म्हणजेच मूर्खांच्या नादी लागणे टाळावे, कारण मूर्ख मनुष्य हा दोन पायांचा पशूच असतो. जसा शरीरात घुसलेला काटा सतत वेदना देतो, तसेच मूर्ख मनुष्य त्याच्या टोचणाऱ्या शब्दांनी इतरांच्या हृदयाला छिद्रे पाडत राहतो आणि वेदना देत राहतो.
मूळ श्लोक - चाणक्यनीति

श्लोक क्र ६०६
कणशेषं शत्रुशेषमग्निशेषं तथैव च।
पुन: पुन: प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न धारयेत्॥

अर्थ~एखाद्या विघातक गोष्टीचा शिल्लक राहिलेला लहानसा कण योग्य वेळी उपटून फेकून दिला नाही तर भविष्यात मोठे स्वरूप धारण करून मोठे नुकसान करतो. जसे पूर्ण न विझलेला अग्नि आणि पूर्ण न मारलेला शत्रू हे दोन्ही मोठे रूप धारण करून पुनःपुन्हा उद्भवतात आणि नाशाला कारणीभूत होतात. म्हणूनच बुद्धिमान राजाने शत्रूला कधीही शिल्लक ठेवू नये.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६०९
रिपुराजाग्निसर्पेषु विषे चाग्निषु शृङ्गिषु।
शस्त्रपाणिषु मूर्खेषु विश्वासो न कदाचन॥

अर्थ~शत्रुराष्ट्राचा राजा, अग्नी, साप, विष, दाह करणारा विषाग्नी, शिंग असलेले प्राणी आणि हातात शस्त्र घेतलेला मूर्ख मनुष्य यांच्यावर कदापिही विश्वास ठेवू नये.

श्लोक क्र ६१०
न क्लेशविरहे द्रव्यं द्रव्यहीने कुत: क्रिया।
क्रियाहीने कुतो धर्मो धर्महीने कुत: सुखम्॥

अर्थ~कष्ट केल्याशिवाय संपत्ती कशी प्राप्त होणार?, संपत्ती नसलेला(धनविहीन) मनुष्य कोणतेही सत्कार्य करू शकत नाही. सत्कार्य न करता धर्माचरण कसे करणार?, आणि धर्महीन मनुष्याला सुख तरी कसे मिळणार?

म्हणूनच धर्माचे कार्य करू इच्छिणाऱ्याने उत्तम कष्ट करून द्रव्यार्जन करावे आणि त्याच्या द्वारे धर्माची सेवा करून सुख प्राप्त करून घ्यावे असेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे.

माणसाच्या आयुष्यात धर्माचे महत्व किती अनन्यसाधारण आहे हे देखील संभाजी महाराजांनी अधोरेखित केला आहे.

'धर्महीने कुत: सुखम्' म्हणजे धर्म नसलेल्या(धर्म न मानणाऱ्या) माणसाला सुख प्राप्त होत नाही हे संभाजी महाराजांचे विधान कथित पुरोगाम्यांना अस्वस्थ करणारे आहे हे मात्र नक्की!

धर्म हा शब्द आपल्या संस्कृतीत व्यापक अर्थाने वापरला जातो. राष्ट्रधर्म, दानधर्म, राजधर्म, स्वधर्म, मातृधर्म, शेजारधर्म अशा शब्दांतून धर्म या शब्दाची व्यापकता आपल्या ध्यानांत येते. परमार्थी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेला उदातत् भाव म्हणजे धर्म होय. म्हणूनच जीवनात धर्माचे स्थान खूप महत्वाचे आहे.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६११
जीवितं मृतकं मन्ये देहिनां धर्मवर्जितम्।
मृतो धर्मेण संयुक्तो दीर्घजीवी भविष्यति॥

अर्थ~ज्या मनुष्याने धर्माचा त्याग केलेला आहे त्याचे शरीर जिवंत असले तरी तो मनुष्य मृतच मानावा. परंतु धर्माचरण करतां करतां ज्याने प्राणार्पण केलेले आहे असा मनुष्य देहाने जरी मृत असला तरी चिरंजीव(सदैव जिवंत) मानावा.

संभाजी महाराजांनी हा श्लोक केवळ लिहिलेला नसून त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणीं अत्यंत टोकाला जाऊन त्यांनी याच सिद्धांताचे पालन केलेले आहे.

औरंगजेबाच्या कैदेत असताना स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी धर्मपरिवर्तनाचा पर्याय त्यांच्या समोर होता. परंतु स्वधर्माचे पालन करतांना मृत्यू आला तरी चालेल परंतु परधर्माचा स्वीकार न करण्याचा ठाम निर्धार संभाजी महाराजांनी केला आणि आपल्या प्राणांचे बलिदान केले. 'स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:।' या गीतावचनाचे पालन संभाजी महाराजांनी त्या कसोटीच्या क्षणीं केले आहे.

खरोखर, महापुरुषांचे जीवन म्हणजे सद्विचारांच्या प्रतिपालनाचे, आचरणाचे आदर्श उदाहरण असते. ते केवळ सद्विचार सांगत नाहीत तर जगून दाखवितात.

श्लोक क्र ६१२
स धर्मो यत्र नाधर्मस्तत्सुखं यत्र नासुखम्।
तज्ज्ञानं यत्र नाज्ञानं सा गतिर्यत्र नागति:॥

अर्थ~जेथे अधर्म नाही तेथेच धर्माचे वास्तव्य आहे. जेथे दुःख नाही तेथेच सुख असते. जेथे अज्ञान नाही तेथेच ज्ञान वसते. जेथे अगती(वाईट गती, अडथळा) नाही तेथेच गती असते.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६१३
सत्यं शौचं दया ज्ञानं परद्रव्यं न गृह्यते।
ब्रह्मचर्यं तपोमूलमेतद्धर्मस्य लक्षणम्॥

अर्थ~सत्य, शुचिता(पवित्रता), दयाळूता, दातृत्व, दुसऱ्याचे द्रव्य न स्विकारण्याची प्रवृत्ती आणि तपश्चर्येचे मूळ असलेले ब्रह्मचर्य ही धर्माची लक्षणे आहेत.

श्लोक क्र ६१४
क्षीयन्ते सर्वदानानि राज्ञां होमे बलिक्रिया।
न क्षीयते महादानमभयं सर्वदेहिनाम्॥

अर्थ~जसे यज्ञात पशूंचा बळी दिल्यानंतर ते नष्ट होतात त्याप्रमाणे राजाने दिलेली इतर प्रकारची दाने कालांतराने नष्ट होतात. म्हणजेच त्याचे पुण्य ओसरते. परंतु राजा जी अभयदाने सर्व प्रजाजांना देतात, ती कधीही नष्ट होत नाहीत, त्याचे पुण्य कधीच कमी होत नाही.

अभयदान म्हणजे लोकांना शत्रूच्या भीतीपासून मुक्ती देण्याचे दान. जो राजा आपल्या प्रजाजनांना शत्रूच्या तसेच सर्व प्रकारच्या भीतीपासून मुक्त करतो म्हणजेच त्यांना अभयदान देतो, त्या राजाला दानाचे अक्षय पुण्य प्राप्त होते असेच संभाजी महाराजांना या श्लोकांत सुचवायचे आहे.

स्वराज्याच्या सीमेवरील गवताचे पाते देखील शत्रूच्या भीतीपासून मुक्त असले पाहिजे असे शिवाजी महाराजांना सतत वाटे. त्या दृष्टीनेच शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याच्या सीमांचे रक्षण केले. म्हणूनच कवी भूषणाने शिवछत्रपतींना "अभयदानी" अशी उपाधी दिलेली आहे.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६१५
राज्यं च संपदो भोगा: कुले जन्म सुदृष्टता।
पाण्डित्यमायुरारोग्यं धर्मस्यैतत्फलं विदु:॥

अर्थ~राज्यलाभ, संपत्तीचा उपभोग, उच्च(चांगल्या) कुळांत जन्म, चांगले रूप, पांडित्य(बुद्धिमत्ता), दीर्घायुष्य आणि आरोग्यपूर्ण जीवन ही सर्व धर्माचरणाची फळे(परिणाम) मानावीत.

श्लोक क्र ६१६
आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपु:।
नास्त्युद्यमसमो बन्धु: कृत्वा यं नावसीदति॥

अर्थ~आळस हा माणसाच्या शरीरात वास्तव्य करणारा परंतु माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. उद्यमशीलतेसारखा दुसरा जवळचा बंधू नाही. उद्योगी वृत्तीमुळे कोणाचेही नुकसान होत नाही, सर्वनाश होत नाही. उद्यमशील वृत्ती जोपासणाऱ्या माणसाचा सहजासहजी नाश होत नाही.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६१७
उत्तमै: सह संयोगं पण्डितै: सह संकथा:।
अलुब्धै: सह मित्रत्वं कुर्वाणो नावसीदति॥

अर्थ~उत्तम(चांगल्या) लोकांशी स्नेहपूर्ण संबंध, विद्वान(बुद्धिमान) लोकांशी साथसोबत/चर्चाविनिमय, निर्लोभी लोकांशी मित्रता या तीन गोष्टी आचरणारा मनुष्य कधीही अयशस्वी होत नाही. असा मनुष्य कधीही नाश पावत नाही.

श्लोक क्र ६१८
अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च।
नीचवाक्यं चापमानं मतिमान्न प्रकाशयेत्॥

अर्थ~धनसंपत्तीचा नाश, मनस्ताप, घरांतील व्यक्तीचे दुर्वर्तन(चुकीचे वर्तन), आपल्यापेक्षा कमी योग्यतेचा माणसांकडून केले गेलेले अपमानजनक वक्तव्य आणि कुटुंबातील/जवळच्या व्यक्तींकडून मिळालेली वाईट वागणूक या गोष्टींची उघड वाच्यता बुद्धिमान मनुष्य कधीही प्रकट करत नाही.
मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

श्लोक क्र ६२१
अतिलौल्यप्रसक्तानां विपत्तिर्नैव दूरत:।
गॅलिका इव लुब्धानां मीनानां तु यथाम्भसि॥

अर्थ~अतिलोभी माणसांपासून संकटे, आपत्ती फार दूर नसतात. जसे पाण्यात फेकलेल्या जाळ्यात लोभी मासे अडकतात, तसेच ही लोभी माणसे (शत्रूच्या/विरोधकांच्या) जाळ्यात सहज सापडतात.

म्हणूनच आपल्या साधुसंतांनी तसेच ऋषीमुनींनी काम, क्रोध, लोभ, मोह यांना रिपु म्हणजे शत्रू मानलेले आहे.

श्लोक क्र ६२२
स्त्रिषु राजसु सर्पेषु स्वाध्याये शत्रुविग्रहे।
भार्यादिष्विपि विश्वासो न कर्तव्य: कथंचन।।

अर्थ~स्त्री, राजा, साप, पाठांतर, युद्धांत शत्रूची सेवाचाकरी करणारा सेवक, कामोपभोगी व्यक्ती आणि स्वतःचे आयुष्य या सातांपैकी कोणावरही कोणत्याही प्रकारे विश्वास ठेवू नये.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६२९
यो राष्ट्रमनुगृह्णाति स राज्यं परिरक्षति।।

अर्थ~जे (राजे) राष्ट्रातील लोकांशी उदारबुद्धीने, दयाळूपणे आणि कृपा करण्याच्या भावनेने वागतात, ते सर्वार्थाने राष्ट्राचे रक्षण करतात.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

श्लोक क्र ६३०
ग्रामस्याधिपतिंकुर्याद्येशग्रामाधिपं तथा।
विंशतीशं शतेशं च सहस्रपतिमेव च।।

अर्थ~प्रत्येक गावचे ग्रामाधिपती(ग्रामाध्यक्ष, ग्रामरक्षक) नियुक्त केले जावेत. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी, प्रशासन ठेवण्यासाठी, दहा दहा गावांसाठी प्रत्येकी एक अधिपती नियुक्त केले जावेत. या रीतीने वीस, तीस, शंभर आणि हजार अशा चढत्या क्रमाने अधिपती नियुक्त केले जावेत.
मूळ श्लोक - मनुस्मृति

।। इति श्रीमद्भूशबलान्वयमुकुटालंकारश्रीमच्छाहराजसुत श्रीमच्छिवच्छत्रपतिसुत श्रीमच्छम्भुराजविरचिते बुधभूषणे राजनीति: ।।

अशा तऱ्हेने भोसलेकुलदीपक मुकुटालंकार मंडित अशा श्री शहाजी महाराजांचे सुपुत्र असलेल्या श्रीशिवछत्रपतींचा सुपुत्र श्रीशंभुराजा यांनी रचलेल्या बुधभूषण या ग्रंथातील राजनीति हा द्वितीय अध्याय समाप्त झाला.

**श्रीमच्छम्भुनृपविरचितम् बुधभूषणम्**

**(धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांनी रचलेले बुधभूषण)**

**।। श्री गणेशाय नमः ।।**

**।। श्री नृसिंहाय नमः ।।**

**अध्याय क्र ३**

**।।प्रकीर्णनीती।।**

**श्लोक क्र १**
**उक्त्वा भूरिविभेदां बुधसंतुष्ट्यै राजनीतिमनवद्याम्।**
**संप्रति मिश्रकनीतिर्विबुधविनोदाय तन्यते शिरसा।।**

अर्थ~विद्वज्जनांच्या समाधानासाठी निर्दोष राजनीतीचे अनेक प्रकार (मागील अर्थात दुसऱ्या अध्यायात) कथन करून झाले. आता त्यांच्या(विद्वान लोकांच्या) मनाला विनोद/आनंद/संतोष वाटावा म्हणून आम्ही बुध्दिपूर्वक मिश्रकनीतीची(प्रकीर्णनीतीची) रचना करीत आहोत.

मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

**श्लोक क्र २**
**क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति विज्ञाय चार्थम् भजते च कामान्।**
**नासंस्पृष्टो ह्युपयुङ्क्ते परेषां तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य।।**

अर्थ~विद्वान, बुद्धिमान, पंडित अर्थात ज्ञानी मनुष्य आधी जाणून घेतो, खूप काळ ऐकून घेतो(श्रवण करतो), अर्थ जाणून घेऊन मुख्य विषयाची सेवा करतो(मूळ कामावर लक्ष केंद्रित करतो) आणि संपर्कात असलेल्या लोकांच्या तो उपयोगी पडतो. पंडिताचे हे खरे अग्रक्रमाचे पांडित्य होय.

आपल्या बुद्धिमत्तेचा, गुणांचा आणि कर्तृत्वाचा उपयोग इतरांसाठी करणे हेच खरे पंडित्याचे लक्षण, असेच संभाजी महाराजांनी या श्लोकांतून सांगितले आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र ३**
**नाप्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति याचितुम्।**
**आपत्सु न विमुह्यन्ति मरा: पण्डितबुद्धय:।।**

अर्थ~पांडित्य असणारे म्हणजेच बुद्धिमान लोक, ज्या गोष्टी प्राप्त होण्यास अशक्य नाहीत(म्हणजे प्राप्त होणे शक्य आहे) अशाच गोष्टींची अभिलाषा बाळगतात, ज्या गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत, अशांची इच्छा करीत नाहीत आणि संकटात दूर पळत नाहीत.

बुद्धिमान लोकांच्या धीरोदात्त मनोवृत्तीचे वर्णन या श्लोकांत केलेले आहे.

**श्लोक क्र ४**
**प्रवृत्तवाक्चित्रकथा ऊहवान्प्रतिभानवान्।**
**आशुग्रन्थार्थवक्ता च य: स पण्डित उच्यते।।**

अर्थ~जो आपल्या वाणीच्या द्वारे परिस्थितीचे जसेच्या तसे चित्र उभे करण्यात वाकबगार असतात, जे उहापोह आणि तार्किक चर्चाविनिमय करतात, ज्यांना कालानुरूप अनेकानेक गोष्टींचे स्मरण होत असते, ज्यांना ग्रंथांतील वचनांचे अर्थ चटकन सांगता येतात, त्यांना पंडित(बुद्धिमान) मानले जाते.

बुद्धिमान व्यक्तीची महत्वाची लक्षणे संभाजी महाराजांनी या श्लोकांत सांगितली आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र ५**
**स्वमर्थम् य: परित्यज्य परार्थमनुतिष्ठति।**
**मिथ्या चरति मित्रार्थे यश्च मूढ: स उच्यते।।**

अर्थ~जो स्वतःचे कर्तव्य/हित/नफा सोडून(अथवा त्याकडे दुर्लक्ष करून), दुसऱ्याच्या(मित्राच्या) हितासाठी कामे करत राहतो त्याला मूर्ख म्हणतात. तसेच जो असत्याचे आचरण करतो, त्याला मूर्ख अथवा अडाणी असे म्हणतात.

**श्लोक क्र ६**
**अमित्रं कुरुते मित्रं द्वेष्टि हिनस्ति च।**
**कर्म चारभते दुष्टं तमाहुर्मूढचेतसम्।।**

अर्थ~जो मित्र नसलेल्याला(मित्र होण्याची पात्रता नसताना) मित्र बनवतो, जो मित्राचा द्वेष करतो, जो मित्राला मारतो, जो वाईट कामाला आरंभ करतो, त्याला मूर्ख अंतःकरणाचा असे म्हणतात.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र ७**
**अनाहूत: समभ्येति अपृष्टो बहु भाषते।**
**अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम:।।**

अर्थ~अज्ञानी(मूर्ख) आणि नराधम(दुष्ट) असा मनुष्य हा न बोलावता जवळीक साधायचा प्रयत्न करतो, विचारले नसतानाही खूप बोलतो आणि विश्वास नसलेल्यावर देखील विश्वास ठेवतो.

मूळ श्लोक - हितोपदेश

**श्लोक क्र ८**
**एक: क्षमावतां दोषो द्वितीयो नोपलभ्यते।**
**यदेनं क्षमया युक्तमशक्तं मन्यते जन:।।**

अर्थ~क्षमाशील लोकांमध्ये दोष म्हणावा असा एकच आढळतो, दुसरा काही आढळत नाही. तो दोष हाच की त्यांच्या क्षमाशील वर्तनाला लोक त्यांचा दुबळेपणा मानतात.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र ९**
**सोस्य दोषो न मन्तव्य: क्षमा हि परमं बलम्।**
**अक्षमावान्परं दोषैरात्मानं वापि योजयेत्।।**

अर्थ~क्षमाशीलता हा क्षमावान(क्षमा करणाऱ्या) माणसाचा दोष कधीही मानू नये. क्षमा हेच सर्वश्रेष्ठ असे बल आहे. क्षमा न करणे हा मात्र दोष आहे. क्षमा न करणाऱ्या(दुष्ट/तापट) माणसाने आपल्यातील दोषांचे परिशीलन करावे.

**श्लोक क्र १०**
**द्वे कर्मणी नर: कुर्वन्नस्मिंल्लोके महीयते।**
**अब्रुवन्परुषं किंचिदसतो वर्जयन्स्तथा।।**

अर्थ~या पृथ्वीतलावर दोन प्रकारची कर्मे आचरणारेच मोठेपणा प्राप्त करतात. एक किंचित देखील वाईट कृत्य न करणारा आणि दुसरा कधीही कठोर न बोलणारा!

जगात मान-सन्मान, कीर्ति आणि मोठेपणा सदाचारी आणि मृदुवचनी लोकांनाच प्राप्त होतो. म्हणूनच माणसाने पापाचरण करू नये आणि सर्वांशी नम्रतेने आणि मृदुतेने वर्तावे असे साधुसंत नेहमी सांगतात.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र ११**
**षड् दोषा: पुरुषेणैव हातव्या भूतिमिच्छता।**
**निद्रा तन्द्रा भयं क्रोध आलस्यं दिर्घसूत्रता।**

अर्थ~स्वतःचे हित इच्छिणाऱ्या पुरुषाने(व्यक्तीने) झोप, तंद्री, भीती, राग(क्रोध), आळशीपणा आणि दिर्घसूत्रीपणा(चालढकल करण्याची वृत्ती) या सहा दुर्गुणांचा(दोषांचा) त्याग करावा.

**श्लोक क्र १२**
**अष्टौ पूर्वाणि चिह्नानि नरस्य विनशिष्यत:।**
**ब्राह्मणान्प्रथमं द्वेष्टि ब्राह्मणैश्च विरुध्यते।।**

अर्थ~माणसाच्या विनाशाची वेळ जवळ आली असतां, त्याच्याकडून काय काय वाईट कृत्ये घडतात ते श्लोक क्र १२, १३ आणि १४ या तीन श्लोकांत संभाजी महाराजांनी स्पष्ट केले आहे. या तीन श्लोकांत एकंदरीत आठ प्रकारची लक्षणे सांगितली आहेत. पैकी श्लोक क्र १२ चा अर्थ जाणून घेऊ.

माणसाचा घात(सर्वनाश) जवळ आला असतां, त्याच्या आठ पूर्व खुणा पुढील प्रमाणे आहेत. यापैकी पहिल्या दोन खुणा श्लोक क्र १२ मध्ये सांगितलेल्या आहेत. ब्राह्मणांचा द्वेष करणे आणि ब्राह्मणांना विरोध करणे(अथवा ब्राह्मणांकडून विरोधला जाणे) ही विनाशकाल जवळ आलेला आहे हे दर्शविणारी पहिली दोन पूर्वलक्षणे होत.

अर्थात इथे ब्राह्मण जात म्हणून नव्हे तर वर्ण म्हणून संभाजी महाराजांना अपेक्षित आहे. म्हणजेच जो विद्वान, बुद्धिमान आणि विनयसंपन्न आहे असा गुण आणि कर्माने युक्त असलेला ब्राह्मण संभाजी महाराजांना अभिप्रेत आहे.

संभाजी महाराजांच्या ग्रंथांचा अजिबात अभ्यास न करतां त्यांच्याच नावाने संस्था काढून ब्राह्मणविरोधी कामे करणाऱ्यांना हा श्लोक म्हणजे मोठी चपराक आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र १३**
**ब्राह्मणस्वानि चादत्ते ब्राह्मणांश्च जिघांसति।**
**रमते निन्दया चैषां प्रशंसां नाभिनन्दति।।**

अर्थ~माणसाचा घात(सर्वनाश) जवळ आला आहे हे दर्शविणाऱ्या आठ खुणांपैकी पहिल्या दोन खुणा(लक्षणे) श्लोक क्र १२ मध्ये आलेल्या आहेत.

या श्लोकांत पुढील चार लक्षणे सांगितली आहेत. जो ब्राह्मणांस(विद्वान लोकांना) दास्यत्वात ठेवतो, त्यांची संपत्ती लुबाडतो, त्यांना हिंसा पोहोचविण्याचा प्रयत्न करतो, विद्यावंत आणि कर्तृत्ववान लोकांची निंदा करण्यात आनंद मानतो आणि ज्याला गुणवान लोकांची प्रशंसा पाहवत नाही त्याचा नाश होण्याची वेळ जवळ आली आहे असे समजावे.

**श्लोक क्र १४**
**नैतान्स्मरति कृत्येषु याचितश्चाभ्यसूयति।**
**एतान्दोषान्नरः प्राज्ञो वध्ये बुद्ध्वा विवर्जयेत्।।**

अर्थ~शेवटची दोन लक्षणे या श्लोकांत दिलेली आहेत. ज्याचा सर्वनाश जवळ आलेला आहे तो स्वतःवर इतरांनी केलेले उपकार विसरतो आणि याचना करणाऱ्यांचा तो मत्सर करतो.

घातकी/दुष्टबुद्धी लोकांचे हे दोष जाणून घेऊन बुद्धिमान लोकांनी अशा माणसांना टाळावे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र १५**
**नाक्रोशी स्यान्नावमानी परस्य मित्रद्रोही नोत नीचोपसेवी।**
**न चाभिमानी न च हीनवृत्तो रुक्षां वपसंति वर्जयन्तीम्।।**

अर्थ~इतरांविषयी अथवा शत्रूविषयी ओरड/आक्रोश करू नये. तसेच त्यांची अवहेलना देखील करू नये. मित्रांचा विश्वासघात करू नये. नीच(नालायक/दुष्ट) प्रवृत्तीच्या माणसांची सेवा करू नये. स्वतःविषयी कधीही गर्व बाळगू नये. आपले वर्तन कधीही हीन दर्जाचे म्हणजेच हलक्या दर्जाचे असू नये. रुक्ष लोकांना पसंत करू नये आणि अवास्तव(वायफळ) बोलणे त्यागावे.

बुद्धिमान लोकांनी आपल्या जीवनात वरील तत्वांचे पालन करावे.

**श्लोक क्र १६**
**अप्रशस्तानि कार्याणि यो मोहादनुतिष्ठति।**
**स तेषां विपरिभ्रंशाद्भ्रश्यते जीवितादपि।।**

अर्थ~मोहात पडल्यामुळे(मोह अनावर झाल्यामुळे) जो मनुष्य अप्रशस्त(चुकीची/वाईट) कामे करतो, तो सर्व बाजूंनी भ्रष्ट होतो तसेच स्वतःच्या जीवितापासून देखील भ्रष्ट होतो अर्थात मृत्यू पावतो.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)

**श्लोक क्र १७**
**दैवतेषु च यत्नेन राजसु ब्राह्मणेषु च।**
**नियन्तव्य: सदा क्रोधो वृद्धबालातुरेषु च।।**

अर्थ~देवदेवता, राजा, ब्राह्मण, विद्वज्जन, वृद्ध लोक, लहान मुले आणि दुर्बळ लोक यांच्याविषयी आपल्या मनांत असलेला राग प्रयत्नपूर्वक नियंत्रणात ठेवावा.

**श्लोक क्र १८**
**निरर्थं कलहं प्राज्ञो वर्जयेन्मूढचेतसम्।**
**कीर्तिं च लभते लोके न चार्थेन योजयेत्।।**

अर्थ~ज्याच्याकडे विचार करण्याची क्षमता नाही(वैचारिक पातळी नाही) अशा माणसाशी शहाण्या व्यक्तीने निष्कारण वाद करणे टाळावे. मूर्खांशी वाद करणे टाळल्याने तो मनुष्य जगात प्रसिद्धी पावतो, त्याला नावलौकिक टिकून राहतो. शहाण्या व्यक्तीने धन/द्रव्य/पैसा खर्च करून प्रसिद्धी मिळविण्याची योजना करू नये.

इंग्रजीत याच अर्थाचे एक प्रसिद्ध वचन आहे. Don't argue with a fool, he will bring you down to his level and will beat you with his experience. संभाजी महाराजांनी हाच उपदेश उपरोक्त श्लोकांत केलेला आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व/विदूरनीति)
**श्लोक क्र १९**
**विनयेन विना का श्री: का निशा शशिना विना।**
**रहिता सत्कवित्वेन कीदृशी सा विदग्धता।।**

अर्थ~विनयशील वृतीशिवाय वैभवाला काय किंमत?, रात्रीच्या आकाशात चंद्र नसेल तर त्या रात्रीला काय अर्थ? आणि उत्तम कवित्वाशिवाय बुद्धिमत्तेला काय किंमत?

मूळ श्लोक - संभाजी महाराज कृत

**श्लोक क्र २०**
**आकारैङ्गितैर्गत्वा चेष्टया भाषणेन तु।**
**नेत्रवक्त्रविकारैश्च ज्ञायतेन्तर्गतं मन:।।**

अर्थ~आकार,शारीरिक हालचाली(body language), हावभाव, भाषण(बोलणे), डोळ्यांचे अविर्भाव, चेहऱ्यावरील भाव इत्यादींच्या द्वारे माणसाचे मन(अंतरंग) जाणले जाते.

मूळ श्लोक - हितोपदेश/मत्स्य पुराण

**श्लोक क्र २१**
**सिद्धमन्त्रौषधं धर्मं गृहच्छिद्रं च मैथुनम्।**
**कुभुक्तं कुश्रुतं चैव मतिमान्न प्रकाशयेत्।।**

अर्थ~या श्लोकांत बुद्धिमान(शहाण्या) माणसाने चारचौघात कोणत्या गोष्टी उघडपणे बोलू नये ते सांगितले आहे. सिद्धमंत्र, औषध, धर्म, गृहच्छिद्र म्हणजे घरातील कलह/दोष/वैगुण्य, प्रणयक्रीडा, निकृष्ट भोजन, ऐकलेल्या वाईट गोष्टी इत्यादी सर्व गोष्टींविषयीं बुद्धिमान(शहाण्या) व्यक्तीने कधीही चारचौघात प्रकट कथन करू नये.

**श्लोक क्र २२**
**येषु दुष्टेषु दोष: स्याद्योगक्षेमस्य भारत।**
**सदा प्रसादनं तेषां देवतानामिवाचरेत्।।**

अर्थ~हे भरतश्रेष्ठा, जे लोक असंतुष्ट राहिले(अथवा काही कारणास्तव बिघडले) असतां आपल्या उदरनिर्वाह इत्यादी योगक्षेमाच्या साधनांत व्यत्यय येऊ शकतो, अशा लोकांना सदैव देवतांप्रमाणे संतुष्ट राखावे.
राजकारण तसेच व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत हा विचार अत्यंत मार्गदर्शक आहे.
मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

**श्लोक क्र २३**
**दुर्बुद्धिमकृतप्रज्ञं छन्नं कूपं तृणैरिव।**
**विवर्जयति मेधावी तस्मिन्मैत्री प्रणश्यति।।**

अर्थ~गवताने झाकलेल्या विहिरीप्रमाणे, अज्ञानी माणसाची दुष्ट बुद्धि ओळखण्याची दक्षता बुद्धिमान माणूस घेतो. अज्ञानी माणसाचे दुष्ट हेतू ओळखून ज्ञानी मनुष्य त्याच्याशी मैत्रीचे संबंध कधीही ठेवत नाही. अंततः त्यांची मैत्री संपुष्टात येते, नाश पावते.

मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धति

**श्लोक क्र २४**
**मार्दवं सर्वभूतानामनसूया क्षमा धृतिः।**
**आयुष्याणि बुधा प्राहुर्मित्राणां चापि मानना।।**

अर्थ~सर्व प्राणिमात्रांच्या विषयी द्वेषरहित भावना, क्षमाशीलता, आत्मीयता, आस्था आणि धैर्य बाळगणे हेच बुद्धिमान मनुष्याचे मार्दव होय.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

**श्लोक क्र २५**
**अवृत्तिं विनयो हन्ति हन्त्यनर्थं पराक्रमः।**
**हन्ति नित्यं क्षमा क्रोधमाचारो हन्त्यलक्षणम्।।**

अर्थ~अवृत्ति म्हणजे दुष्प्रवृत्ती(वाईट वृत्ती). विनय वाईट वृत्तींचा नाश करतो. पराक्रम अनर्थाचा नाश करतो. क्षमाशील वृत्तीने क्रोधाला नेहमीच जिंकता(मारता) येते. आणि सदाचार हा दुराचाराला मारतो(पराभूत करतो).
मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

**श्लोक क्र २६**
**नानीयात्प्रेषेणे भृत्यान्बान्धवान्व्यसनागमे।**
**मित्रं चापत्तिकाले च भार्यां च विभवक्षये।।**

अर्थ~दुःखाच्या प्रसंगी आश्रित, सेवक, बालक आणि पोष्य इत्यादींना त्यात ओढू नये. संकटाच्या वेळी नातेवाईक, बांधव यांना पाचारण करून त्यांस संकटात ओढू नये. आपत्तीच्या वेळी मित्राला त्यात ओढू नये आणि संपत्तीचा क्षय(नाश) होत असताना त्यात पत्नीला ओढू नये.
मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित
**श्लोक क्र २७**
**स्वामिनि गुणान्तरज्ञे गुणमपि भृत्येनुवर्तिनि कलत्रे च।**
**मित्रे चानुपवर्गे निवेद्य ... सुखी भवति।।**

अर्थ~जो कोणी आपला धनी(मालक), गुणदाते/ज्ञानदाते, एकनिष्ठेने सेवा करणारे सेवक, पत्नी, मित्र आणि जवळचे सहकारी इत्यादी लोकांच्या चांगल्या गुणांबद्दल प्रकटपणे(चारचौघांत) बोलून दाखवतो, तो आपल्या जीवनांत सुखी होतो.

मूळ श्लोक -पंचतंत्र

**श्लोक क्र २८**
**उत्पाद्य पुत्राननृणांश्च कृत्वा वृत्तिं च तेभ्योऽनुविधाय कांचित्।**
**स्थाने कुमारी: प्रतिपाद्य सर्वा अरण्यसंस्थोथ मुनिर्बुभूषे।।**

अर्थ~पुत्रांना जन्म देऊन, त्यांना कर्जापासून मुक्त ठेवून, त्यांना उपजीविकेचे चांगले साधन उपलब्ध करून देऊन, त्यांचा अनुरूप आणि सुयोग्य स्त्रियांशी विवाह घडवून आणून, अरण्यात जाऊन मुनी होऊन राहण्याची इच्छा बाळगावी.

थोडक्यात गृहस्थाश्रमीची सर्व कर्तव्ये पार पाडून, उत्तम पुरुषाने त्याचा(गृहस्थाश्रमाचा) त्याग करून, वानप्रस्थाश्रम स्वीकारावा असेच या श्लोकांत संभाजी महाराजांना सांगायचे आहे.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

**श्लोक क्र २९**
**उत्थानं संयमो दाक्ष्यमप्रमादो धृति: स्मृति:।**
**समीक्ष्य च समारम्भो वृद्धिमूलं भविष्यति।।**

अर्थ~उत्साहाने काम करण्याची वृत्ती, संयम, मनावर/इंद्रियांवर असलेले नियंत्रण, कामातील कौशल्य, धैर्यशीलता आणि पूर्ण अभ्यास/विचार करूनच कार्यास प्रारंभ करण्याची वृत्ती ही भरभराटीची/प्रगतीची मूलभूत कारणे आहेत.

**श्लोक क्र ३०**
**अतिक्लेशेन येर्था: स्युर्धर्मस्यातिक्रमेण च।**
**अरेर्वा प्रणिपातेन मा स्म तेषु मन: कृथा:।।**

अर्थ~जी संपत्ती/धन/यश अतिशय टोकाच्या काबाडकष्टाने, धर्माची तत्त्वांचे उल्लंघन करून(डावलून) अथवा शत्रूपुढे स्वाभिमान गहाण ठेवून, लाचारी पत्करून, लोटांगण घालून प्राप्त होत असेल, तर अशा संपत्तीच्या/यशाच्या प्राप्तीसाठी मनांत मोह निर्माण होऊ देऊ नये.

मूळ श्लोक - महाभारत(उद्योगपर्व)

**श्लोक क्र ३१**
**त्यागेन हीनस्य कुतोस्ति लक्ष्मी:।**
**ध्यानेन हीनस्य कुतोस्ति सिद्धि:।।**

अर्थ~हीन(वाईट/दुष्ट) माणसाच्या त्यागाने वैभव कुठून मिळणार? आणि त्याच्या ध्यानाने सिद्धी तरी कशी प्राप्त होणार?

**श्लोक क्र ३२**
**आर्तो वा यदि वा त्रस्त: परेषां यदि वागत:।**
**अपि प्राणान्परित्यज्य रक्षितव्य: कृतात्मना।।**

अर्थ~दुःखी असो वा त्रस्त, भयभीत झालेला असो वा दुसऱ्याच्या तावडीत सापडलेला, संयमी, पवित्र अंतःकरणाच्या आणि सत्कृत्ये करणाऱ्या व्यक्तीने नेहमीच प्राण पणाला लावून दुसऱ्याच्या प्राणांचे रक्षण करावे.

सद्वर्तनी माणसाने नेहमीच संकटात सापडलेल्या लोकांना आधार द्यावा, त्यांना मदत करावी हेच संभाजी महाराजांनी या श्लोकांतून सांगितले आहे. इतरांना संतुष्ट आणि सुरक्षित ठेवणे हेच तर धर्माचे सार आहे.

मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

**श्लोक क्र ३३**
**देहे पातिनि का रक्षा यशो रक्ष्यमपातयन्।**
**नर: पतितकायोपि यश:कायेन जीवति।।**

अर्थ~देहपतन(शरीर सोडून जाताना म्हणजेच मृत्यू जवळ आलेला असताना) होत असताना या नश्वर शरीराचे रक्षण काय आणि कसे करणार? परंतु यश हे अशा नश्वर आणि नाश होऊ पाहणाऱ्या शरीराचे देखील रक्षण करते. किंबहुना मनुष्य देहरूपाने जरी लोप पावला तरीही त्याच्या यशाच्या रूपाने तो सदैव जिवंत राहतो.

अगदी याच तत्वाच्या आधारे पुण्यश्लोक श्रीशिवछत्रपती तसेच धर्मवीर श्री संभाजी महाराज हे दोघेही त्यांच्या दैदीप्यमान यशाच्या रूपाने अजरामर झालेले आहेत.

मूळ श्लोक - भोजप्रबंध

**श्लोक क्र ३६**
**प्रिय: प्रजानां दातैव न पुन: द्रविणेश्वर:।**
**आगच्छन्काङ्क्ष्यते लोकैर्वारिदो न तु वारिधि:।।**

अर्थ~जनतेला(प्रजेला) दान देऊन संतुष्ट राखणारा राजाच प्रजेला प्रिय असतो. राजसंपत्तीचा स्वतःच उपभोग घेणारा राजा प्रजेला प्रिय नसतो. पाणी देणाऱ्या मेघांची इच्छा लोक बाळगतात. परंतु पाणी साठविणाऱ्या समुद्राविषयी लोकांना यत्किंचितही अभिलाषा/पसंती नसते.

म्हणूनच राजाने संपत्तीचा विनियोग स्वतःच्या उपभोगासाठी न करतां, प्रजाजनांच्या कल्याण आणि अभिवृद्धीसाठी करावा हेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून निर्देशित करायचे आहे. आजच्या राजकीय नेत्यांनी या श्लोकांतून खूप काही शिकण्यासारखे आहे.

शिवाजी महाराजांचा उल्लेख तर अनेक संत महंत 'उपभोगशून्य स्वामी' असा करतात. रामदासांनी महाराजांविषयी लिहिताना 'दानशील धर्मशील सर्वज्ञपणे सुशील' असे म्हटलेले आहे. भूषणाने तर शिवाजी महाराजांवर 'महादानी शिवराज खुमान या जहाँ पर, दान के प्रमान तेरे अति अगनित है।' असं काव्य रचले आहे. या सर्व समकालीन उल्लेखांतून शिवाजी महाराजांनी वरील श्लोकांत सांगितलेला विचार अत्यंत प्रभावीपणे आचरणात आणलेला आहे असे आपल्या ध्यानात येते.

मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

**श्लोक क्र ३८**
**पुत्रो वशी स्वार्थकरी च विद्या**
**अरोगिता मित्रसमागमश्च।**
**भार्या विनीता प्रियवादिनी च**
**शोकस्य मूलाद्भरणानि पञ्च।।**

अर्थ~ऐकण्यात असलेला(म्हणजे अनुकूल असलेला) पुत्र, धनसंपत्तीचा लाभ मिळवून देणारी विद्या, निरोगी शरीर(आरोग्य), चांगल्या मित्रांचा सहवास आणि विनयसंपन्न आणि गोड बोलणारी पत्नी ह्या पाच गोष्टी माणसाच्या जीवनातील दुःखांना समूळ उखडून टाकतात. या पाच गोष्टींचा लाभ होणाऱ्या व्यक्तीला आयुष्यात दुःखाला सामोरे जाण्याची वेळ शक्यतो येत नाही.

**श्लोक क्र ४०**
**कान्तावियोग: स्वजनापमानो**
**ऋणस्य शेष: कुजनस्य सेवा।**
**दारिद्र्यदावाभिमुखं तु मित्रं**
**विनाग्निना पञ्च दहन्ति गात्रं।।**

अर्थ~पत्नीचा वियोग, स्वजनांकडून झालेला अपमान, डोक्यावर शिल्लक असलेला कर्जाचा भार, वाईट/दुष्ट/दुर्जनं लोकांची करावी लागणारी सेवा आणि आपल्या मित्रपरिवारासमोर दारिद्र्याचे चटके सोसणे(मित्रांसमोर आपले दारिद्र्य उघडे पडणे) या पाच गोष्टी माणसाला अग्नीशिवाय जाळतात. अर्थात या पाच गोष्टी माणसाला दुःखाचे अत्यंत गरम चटके देतात.

**श्लोक क्र ४१**
**द्यूतं च मासं च सुरा च वेश्या पापर्द्भिचौर्यं परदारसेवा।**
**एतानि सप्तं व्यसनानि सप्तं नरं सुघोरं नरकं नयन्ति।।**

अर्थ~कोणती सात प्रकारची व्यसने केल्याने मनुष्याला घोर नरकाची प्राप्ती होते ते या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे.
द्यूत(जुगार/लॉटरी/सट्टा) खेळणे, मांसभक्षण करणे, दारू अथवा अन्य व्यसनाच्या पदार्थांचे सेवन करणे, वेश्यागमन करणे, पापाने अथवा भ्रष्ट मार्गाने संपत्ती गोळा करणे, चोरी करणे आणि परस्त्रीची सेवा करणे(व्यभिचार) ही सात प्रकारची व्यसने केल्यास मनुष्य नरकांत पडतो.

संभाजी महाराजांनी सांगितलेली ही व्यसने माणसाला मृत्यूनंतरच नव्हे तर जिवंतपणी देखील नरकयातना देतात असे पाहायला मिळते.
लॉटरी, सट्टा खेळणे हे व्यसन नरकात टाकणारे आहे असे संभाजी महाराज सांगतात.
मांसभक्षण करण्याने नरक प्राप्त होतो असे सांगणारे संभाजी महाराज निश्चितच शाकाहारी असले पाहिजेत.

ज्या संभाजी महाराजांनी दारू आणि अन्य अंमली पदार्थांच्या सेवनाने नरक प्राप्त होतो असे म्हटले आहे त्यांनाच काही लोकांनी अभ्यासाअभावी म्हणा अथवा अन्य कारणाने व्यसनी ठरविले हे किती दुर्दैव!
व्यभिचार आणि अनैतिक संबंधांना निषिद्ध मानणाऱ्या संभाजी महाराजांचे विचार आजच्या काळात आचरणात आणण्याची नितांत आवश्यकता आहे.

पापमार्गाने संपत्ती जमविणे(भ्रष्टाचार) हे नरकात टाकणारे व्यसन आहे असे संभाजी महाराजांनी लिहिले आहे. आज आपल्या देशात भ्रष्टाचार ही खूप गंभीर समस्या बनलेली आहे. भ्रष्टाचाराचे प्रमाण सर्वाधिक असणाऱ्या देशांच्या यादीत हिन्दुस्थानचे स्थान वरच्या क्रमांकावर आहे. ही अत्यंत लाजिरवाणी आणि खेदाची गोष्ट

आहे. देशाचे अपरिमित नुकसान या भ्रष्टाचारामुळे होत आहे. संभाजी महाराजांचे विचार आचरणात आणणे हाच यावरील रामबाण उपाय आहे.

राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाने, या सात व्यसनांना आपल्या आयुष्यातून हद्दपार केल्यास देशाचे भवितव्य नक्कीच उज्ज्वल असेल यात शंकाच नाही.

**श्लोक क्र ४२**
**वाञ्छा सज्जनसंगमे परगुणे प्रीतिर्गुणे नम्रता।**
**विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिर्लोकापवादाद्भयम्।**
**भक्तिः शूलिनि शक्तिरात्मदमने संसर्गमुक्तिः खले।**
**एते येषु वसन्ति निर्मलगुणास्तेभ्यो नरेभ्यो नमः।।**

अर्थ~मनुष्याच्या ठायीं असले पाहिजेत असे नऊ निर्दोष गुण या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहेत.
१. सज्जनांच्या सहवासाची इच्छा असणे.
२. इतरांच्या चांगल्या गुणांविषयी प्रेम असणे.
३. उत्तम गुण असणाऱ्यांविषयी आदरभाव असणे.
४. विद्याध्ययनाचे व्यसन असणे.
५. स्वतःच्या पत्नीविषयी प्रेम असणे.
६. लोकापवादाचे(लोकांकडून केली जाणारी निंदा) भय असणे.
७. भगवान श्री शंकरांच्या प्रती निस्सीम भक्ती असणे.
८. स्वतःवर संयम(नियंत्रण) मिळविण्यासाठी आवश्यक अशी शक्ती असणे.
९. खलपुरुषांच्या संगतीपासून मुक्त असणे. वाईट लोकांच्या सहवासापासून स्वतःला दूर ठेवणे.

हे नऊ निर्दोष गुण ज्याच्या ठायीं आहेत, त्या मनुष्याला नमस्कार असो.

**श्लोक क्र ४४**
**दौर्मन्त्र्यान्नृपतिर्विनश्यति यतिः सङ्गात्सुतो लालनात्।**
**विप्रोऽनध्ययनात्कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात्।**
**मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्स्नेहः प्रवासाश्रयात्।**
**स्त्री गर्भादनवेक्षणादपि कृषिस्त्यागावमानाद्धनम्।।**

अर्थ~कशामुळे कशाचा नाश होतो ते या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे.

दुष्ट मंत्र्यांमुळे राजा नाश पावतो. स्त्रीच्या सहवासामुळे संन्यासी नाश पावतो. लाडाने मुलगा, अध्ययन न केल्याने विद्वान आणि वाईट पुत्रामुळे कुळाचा नाश होतो. दुष्ट लोकांशी संगत केल्याने शील नाश पावते. प्रेमाच्या अभावी मैत्रीचा नाश होतो. चुकीच्या मार्गावर वाटचाल केल्याने वैभव नष्ट होते. सतत प्रवासामुळे(एखाद्या ठिकाणी सतत गेल्याने) स्नेह संपुष्टात येते. सतत गर्भधारणा झाल्याने स्त्रीचा विनाश होतो. दुर्लक्ष केल्याने शेतीचा नाश होतो आणि संपत्तीचा अवमान अथवा त्याग केला असतां ती संपते.

मूळ श्लोक - भर्तृहरी कृत नीतिशतक

**श्लोक क्र ४३**
**कलासु यत्नः पुरुषेण कार्यो**
**न किंचिदप्राप्यतमं कलानाम्।**
**कलाप्रकर्षादुडुपेन शम्भो-**
**रनर्घ्यमासादितमुत्तमाङ्गम्।।**

अर्थ~विविध कलांमध्ये प्राविण्य प्राप्त करण्यासाठी मनुष्याने प्रयत्न अवश्य करावा. प्रयत्न केल्यास कोणतीही कला साध्य करणे अशक्य नाही. चंद्राच्या अंगी विविध कला असल्यामुळेच भगवान शंभू महादेवांनी चंद्राला आपल्या मस्तकीं धारण केले आहे. चंद्राला कलानिधी असेही म्हणतात.

मनुष्याने आपल्या आयुष्यात प्रयत्नपूर्वक एखादी कला उत्तम तऱ्हेने आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा, असेच संभाजी महाराजांना या श्लोकांतून सांगायचे आहे.

मूळ श्लोक - संभाजी महाराज विरचित

**श्लोक क्र ४५**
**उचितमनुचितं वा कुर्वता कार्यजातम्।**
**परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन।**
**अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्ते-।**
**र्भवति हृदयदाहे शल्यतुल्यो विपाकः।।**

अर्थ~बुद्धिमान मनुष्याने कोणतेही काम करताना, त्याची योग्यायोग्यता तपासूनच पुढे पाऊल टाकावे. आपण करीत असलेल्या कामाचा शेवट(परिणाम) काय असेल हे ध्यानात घेऊन, प्रयत्नपूर्वक काम करावे. घाईघाईने केलेल्या कामाचा परिणाम अनेकदा संकटात टाकणारा आणि अंतःकरणाला वेदना देणारा असतो.

मूळ श्लोक - संस्कृत सुभाषित भांडार

**श्लोक क्र ४६**
**विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा**
**सदसि वाक्पटुता युधि विक्रमः।**
**यशसि चाभिरतिर्व्यसनं श्रुतौ**
**प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम्।।**

अर्थ~संकटाच्या काळात धैयशील वृत्ती बाळगणे, अभ्युदयाच्या म्हणजे भरभराटीच्या काळात क्षमाशीलता/दयाळूता बाळगणे, सभेमध्ये वाक्पटुता असणे म्हणजे उत्तम संभाषण करणे, युद्धाच्या प्रसंगी पराक्रम गाजवणे, यशाच्या शिखरावर असताना वृत्ती समाधानी ठेवणे आणि वेदाध्ययनात रुची बाळगणे(ज्ञानार्जनाची उत्कट आवड असणे) हे सद्गुण महान लोकांच्या ठायीं अगदी निसर्गसिद्ध नियमानुसार वास्तव्य करतात.

मूळ श्लोक - संस्कृत सुभाषित भांडार/भर्तृहरी नीतीशतक/शार्ङ्गधर पद्धती

**श्लोक क्र ४७**
**यदिच्छसि वशीकर्तुम् जगदेकेन कर्मणा।**
**परापवादसस्यैश्च चरन्तीं गां निवारय।।**

अर्थ~जर संपूर्ण जगाला एकाच कर्माने(सत्कृत्याने) वश करण्याची इच्छा बाळगत असशील तर इतरांच्या विषयांत(भानगडीत) लक्ष घालणे बंद कर.

या श्लोकांत परापवादरुपी शेतात चरणाऱ्या गायी याचा अर्थ इतरांच्या गोष्टींमध्ये निष्कारण लक्ष घालणे असा आहे. ज्याला जग जिंकायचे असेल त्याने इतरांच्या विषयांत विनाकारण लक्ष घालणे बंद करावे असे संभाजी महाराजांनी या श्लोकांत सांगितले आहे.

मूळ श्लोक - कौटिलीय अर्थशास्त्र

**श्लोक क्र ४८**
**अविवेकमतिर्नृपतिर्मन्त्री गुणवत्सु वक्रितग्रीव:।**
**यत्र खला(श्च) प्रबलास्तत्र कथं सज्जनावसर:।।**

अर्थ~जिथे राजा हा अविवेकी(योग्य आणि अयोग्य याची पारख नसलेला), मंत्री हा गुणवंतांकडे वक्रदृष्टीने(वाईट भावनेने) पाहणारा आणि दुर्जन(दुष्ट) लोक प्रबळ असतात तिथे सज्जनांना अर्थात चांगल्या लोकांना थारा कोठून मिळणार?
अगदी थोडक्यात सांगायचे तर संभाजी महाराजांनी अत्यंत समर्पक शब्दांत आजच्या सर्वपक्षीय राज्यकर्त्यांचे वर्णन केले आहे.
मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**श्लोक क्र ४९**
**राजा संपत्तिहीनोपि सेव्य: सेवागुणान्वितै:।**
**भवत्यजीवनं तस्मात्फलं कालान्तरादपि।।**

अर्थ~राजा संपत्तीहीन झाला तरी तरी विशुद्ध सेवाभावनेने त्याची सेवा केली असतां, जीवन असह्य होते. परंतु या सेवेचे कालांतराने बरे अथवा वाईट जे काही असेल ते फळ मिळते.
प्रकीर्णनीती म्हणजे सामान्य जनतेने आचरणात आणावयाची कर्तव्ये. ज्या कार्याने स्वतःचे हित होईल अशी सामान्य जनतेने करावयाची कर्तव्ये या प्रकरणात समाविष्ट केलेली आहे. हा श्लोक देखील तशाच प्रकारातील आहे. धनहीन राजाची सेवा केल्याने सेवा केल्याचे पुण्य मिळेल परंतु त्या सेवेचा सांपत्तीक लाभ होणार नाही. हेच संभाजी महाराजांनी या श्लोकाद्वारे सांगितले आहे.
मूळ श्लोक - भोजप्रबंध

**श्लोक क्र ५०**
**मित्रं स्वस्थतया रिपुं नयबलैर्लुब्धं धनैरीश्वरं।**
**कार्येण द्विजमादरेण युवतिं प्रेम्णातितीर्वम् स्तवैः।**
**बन्धुं च क्षमया गुरुं प्रणतिभिर्मूर्खम् कथाभिर्बुधं।**
**विद्याभि रसिकं रसेन सकलं शीलेन कुर्याद्वशम्।।**

अर्थ~कोणाला कशाच्या साहाय्याने वश करावे हे या श्लोकात संभाजी महाराजांनी सांगितले आहे.

मित्राला सौहार्दाने, शत्रूला बळाने, लोभी माणसाला संपत्तीने, ईश्वराला सत्कार्याने, विद्वान लोकांना आदर देऊन, युवतींना प्रेमाने वागून, बांधवांना क्षमेने, गुरूंना नम्रतेने, मूर्खांना गुजगोष्टी करून, बुद्धिमान मनुष्यास ज्ञानाच्या प्रभावाने, रसिकांस रसिकतेने आणि हे सर्व सदाचाराने वश करावे.

अशा तऱ्हेने, हुशार माणसाने विविध प्रकारच्या लोकांना आपल्या बाजूने वश करावे.

मूळ श्लोक - शार्ङ्गधर पद्धती

**श्लोक क्र ५१**
**अर्थी लाघवमुच्छ्रितो नियतनं कामातुरो लाञ्छनम्।**
**लुब्धोऽकीर्तिमसङ्गर परिभवं दृष्टोन्यदोषे रतिम्।**
**निःस्वो(पाशैः) वञ्चनमुन्मना विकलतां शोकातुरो म्लानताम्।**
**दुर्वागप्रियतां दुरोदरवशः प्राप्नोति कष्टं मुहुः।।**

अर्थ~द्यूताच्या(जुगार/लॉटरी) आहारी गेलेल्या माणसाला वारंवार दुःखे भोगावी लागतात. त्याचे विविध प्रकार या श्लोकांत सांगितले आहेत. असा जुगाराच्या आहारी गेलेला माणूस याचना करीत असेल तर क्षुद्र होतो, जर उच्चपदावर गेला तर त्याला खाली खेचण्यात येते, तो कामासक्त झाल्यास कलंकीत ठरतो, लोभी झाल्यास त्याची बदनामी होते, त्याने युद्ध न केल्यास त्याची बदनामी/मानहानी होते, तो दरिद्री झाला तर फसविला जातो, तो उदासीन झाला तर खिन्नतेने ग्रासला जातो, तो शोकाने व्याकुळ झाला तर निस्तेज बनतो आणि तो वाटेल तसे(वाईट) बोलू लागला तर ते कोणासही आवडत नाही.

म्हणून द्यूताच्या नादी लागणे कधीही घातकच!

मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

**श्लोक क्र ५२**
**कीर्तिर्भूमिभुजां रतिर्गुणवतां हीरङ्गनानां धृति-।**
**र्दम्पत्योः शिशवो गृहस्य कविता बुद्धेः प्रसादो गिराम्।**
**विद्वांसः सदसोम्बुजानि सरसां सस्योन्नतिर्नोवृताम्।**
**उद्यानं नगरस्य वारि सरितां स्वास्थां सतां मण्डनम्।।**

अर्थ~कोणास काय शोभून दिसते अथवा भूषण ठरते ते या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे.

राजा कीर्ति शोभिवंत बनवते, गुणवान जनांना अनुराग शोभून दिसतो, स्त्रीयांना सौंदर्य भूषण ठरते, दाम्पत्यांस धैर्य भूषण ठरते, घराला मूल शोभायमान बनवते, बुद्धीचे सौंदर्य काव्य खुलवते, वाणीला माधुर्य शोभून दिसते, राजसभेचे सौंदर्य विद्वान लोकांमुळे खुलते, सरोवरांना कमळे शोभायमान बनवितात, मोठ्या जनसंख्येच्या प्रदेशाला भरपूर धान्य पिकविणारी भूमी भूषण ठरते, नगरांची शोभा उद्याने वाढवितात, नदीचे सौंदर्य पाण्यामुळे वाढते आणि सज्जनांना उत्तम आरोग्य(आरोग्यमय जीवन) भूषण ठरते.

चांगल्या लोकांनी आपले आरोग्य उत्तम राखले तर त्यांचे सद्गुण जास्त शोभून दिसतात हा महत्वाचा संदेश या श्लोकांत संभाजी महाराजांनी दिलेला आहे.

मूळ श्लोक - विष्णुधर्मोत्तर/मत्स्य पुराण

**श्लोक क्र ५३**
**कार्पण्येन यशः क्रुधा गुणचयो दम्भेन सत्यं क्षमा।**
**लोभेन प्रमदा हठेन जरया रूपं तमो ज्योत्स्नया।**
**सेवाभिर्महिमा मदेन विनयः स्नेहः प्रवासैस्तथा।**
**मानोनुव्रजनेन कर्म कपटैर्विद्या धनैर्गच्छति।।**

अर्थ~कशामुळे काय नाश पावते, ते या श्लोकांत संभाजी महाराजांनी संगितले आहे.

कंजूष(कृपण) वृत्तीमुळे यश/कीर्ती नाश पावते, क्रोधामुळे गुणांचा नाश होतो, दांभिक(खोटारडे)पणामुळे सत्य नाश पावते, हावरटपणामुळे क्षमाशीलता नष्ट होते, हट्टीपणामुळे स्त्रीचा नाश होतो, वार्धक्याने सौंदर्याचा/देहाच्या बांधेसूदपणाचा नाश होतो, चंद्राच्या प्रकाशाने अंधार नष्ट होतो, सेवेने मोठेपणा नष्ट होतो, उद्धटपणा(माजखोरपणा)मुळे आणि नम्रता नष्ट होते, एखाद्या स्थानीं सतत प्रवास केल्याने तेथील लोकांचे स्नेह कमी होते, मागे मागे जाण्याने सन्मान नष्ट होतो, कपटीपणामुळे सत्कार्याचा नाश होतो आणि धनसंपत्तीमुळे विद्या नाहीशी होते.

मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**।। राष्ट्रांत निर्मू अवघ्या श्रीशिवसुर्यजाळं ।।**

**श्लोक क्र ५४**
**मूर्खः शान्तस्तपस्वी क्षितिपतिरलसो मत्सरी धर्मशीलो।**
**दुःस्थो मानी गृहस्थः प्रभुरतिकृपणः शास्त्रविद्धर्महीनः।**
**प्रज्ञाहीनो नरेन्द्रः स च सचिववशो नास्तिकः शास्त्रद्रष्टा।**
**वृद्धो रोगी दरिद्रः स च युवतिपतिर्धिग्विडम्बप्रकारः।।**

अर्थ~या श्लोकांत संभाजी महाराजांनी ज्या दुष्प्रवृत्तींचा/विडंबनांचा धिक्कार केलेला आहे त्या पुढीलप्रमाणे आहेत.

शांतवृत्तीचा तपस्वी असूनही मूर्ख असणे, पृथ्वीचा(राज्याचा) स्वामी असूनही आळशी असणे, धर्माचरणी असूनही मत्सरी असणे, दरिद्री परंतु मानी असणे, गृहस्थाश्रमी असूनही कंजूष असणे, शास्त्रांचे ज्ञान असूनही धर्महीन(धर्माच्या तत्वांचे पालन न करणारा) असणे, राजा हा बुद्धी नसलेला परंतु मंत्र्यांच्या सल्ल्याने वागणारा असणे, शास्त्रांचे ज्ञान असूनही नास्तिक असणे, वृद्ध/रोगी/दरिद्री असूनही तरुण स्त्रीचा पती असणे या सर्व विटंबनांचा तीव्र धिक्कार असो.

विद्वान असूनही नास्तिक असणाऱ्यांचा धिक्कार करणारे संभाजी महाराजांना कथित फुरोगामी स्वीकारतील काय?

मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**श्लोक क्र ५५**
**स्त्रीणां यौवनमर्थिनामनुगमो राज्ञः प्रतापः सताम्।**
**सत्यं स्वल्पधनस्य संततिरसद्वृत्तस्य वाग्डम्बरः।**
**आचारस्य सुशीलता नयवतां स्थैर्यं कुलस्यैक्यता।**
**पूजाया धनमुन्नतेर्गुणचते शान्तेर्विवेकोचयम्।।**

अर्थ~कोणाला काय शोभून दिसते ते या श्लोकांत संभाजी महाराजांनी सांगितले आहे.
स्त्रीचे तारुण्य तिला शोभून दिसते, याचकाचे मागे मागे जाणे त्यास शोभून दिसते, राजाला त्याचा पराक्रम तर सज्जनांना त्यांचा खरेपणा शोभा देतो, धनहीनास संतती तर असभ्य वर्तन करणाऱ्यास बोलण्यातला मोठेपणा(बडेजाव) शोभून दिसतो, सदाचारी मनुष्यास त्याचे उत्तम चारित्र्य आणि चांगले वर्तन शोभून दिसते, योग्य मार्गाने चालणाऱ्याला स्थैर्य तर कुळाला(कुटुंबाला) ऐक्य शोभून दिसते, मनांतील आदरभाव हा संपत्तीने अधिक शोभून दिसतो, गुणी व्यक्तीबद्दल इतरांना असणारी आपुलकी त्यास शोभून दिसते आणि शांतीला उच्च दर्जाचा विवेक शोभून दिसतो.
मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**श्लोक क्र ५६**
**विद्वान्संसादि पाक्षिक: परमतो मानी गृहस्थो व्ययी।**
**भिक्षुर्भोगपरो यतिर्वसुमना मूर्खश्च पाण्डित्यकृत्।**
**नि:स्व: कामयतेथ कुप्यति मृषा वृद्धो विवाहोद्यतो।**
**वेदान्ती हतसत्क्रिय: किमपरं हास्यास्पदं भूतले।।**

अर्थ~स्वाभिमानी असून दुसऱ्याच्या मताने वागणे, गृहस्थ असूनही खर्चिक वृत्ती असणे, भिक्षू असूनही भोगी असणे, संन्यासी असूनही संपत्ती बाळगणे, मूर्ख असूनही उगाचच स्वतःचे (नसलेले) पांडित्य प्रदर्शन करणे, निर्धन असूनही कामना(इच्छा) बाळगणे, खोटारडा/निरर्थक असूनही क्रोधी असणे, वृद्ध असूनही विवाहोत्सुक असणे आणि वेदांती(वेद जाणणारा) असूनही हतबल असणे यांपेक्षा दुसऱ्या हास्यास्पद गोष्टी या भूतलावर कोणत्या असतील?

मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार

**श्लोक क्र ५७**
**को लोभी? गुणिसंगम: किमपरं? प्राज्ञेतरै: संगति।**
**का हानि? समयच्युतिर्निपुणता का? धर्मतत्त्वे रति:।**
**शूरो? विजितेन्द्रिय: प्रियतमा कानुव्रता किं धनम्?।**
**विद्या: किं सुखमप्रवासगमनं, राज्ञ: किमाज्ञा फलम्।।**

अर्थ~या श्लोकाचे वैशिष्ठ्य असे की यांत विविध प्रश्न विचारलेले असून त्यांची उत्तरे देखील त्यानंतर लगेच दिलेलीय आहेत.

१. लाभ कोणता? - गुणवान लोकांची भेट होणे.
२. दुःख कोणते? - मूर्ख लोकांच्या सहवासात राहावे लागणे.
३. हानी कोणती? - कसोटीच्या(मोक्याच्या) क्षणी हातून चूक होणे.
४. (खरे)नैपुण्य कोणते? - धर्माच्या तत्त्वांचे अध्ययन आणि आचरण करण्याची आवड असणे.
५. (खरा)शूर कोण? - जो स्वतःच्या इंद्रियांवर विजय मिळतो.
६. (खरी)प्रिया/भार्या कशी असावी? - पतिव्रते सारखी.
७. खरे धन(संपत्ती) कोणती? - विद्याधन.
८. खरे सुख कोणते? - प्रवासाला जाण्याची वेळ न येणे.
९. खरे(चांगले) राज्य कोणते? - ज्या राज्यातील प्रजा राजाची आज्ञा शिरसावंद्य मानते ते राज्य खरे.

मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार/नीतिशतक

**श्लोक क्र ५८**
**उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी**
**दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति।**
**दैवं विहाय कुरु पौरुषमात्मशक्त्या**
**यत्ने कृते यदि न सिध्यति कोत्र दोष:।।**

अर्थ~लक्ष्मी नेहमी उद्योगी(पराक्रमी/कृतिशील) लोकांच्या जवळच वास्तव्य करते. दैव म्हणजे नशीब हेच श्रेष्ठ आहे असे घाबरट/कर्तृत्वशून्य लोक म्हणतात. नशिबावर(दैवावर) अवलंबून न राहतां, स्वतःच्या आत्मबळाच्या(बुद्धिमत्ता, प्रयत्न, साहस, कर्तृत्व इत्यादी) आधारे पराक्रम गाजवावा. परंतु आटोकाट प्रयत्न करूनही एखादी गोष्ट साध्य झाली नाही तर दोष कोणाला द्यावा?
पराक्रमी, हिम्मतवान लोक आपल्या जीवनात आपल्या बुद्धिमत्ता, पौरुष, साहस, कर्तृत्व इत्यादी गुणांच्या आधारेच यशस्वी होतात. नशिबावर अवलंबून राहणारे लोक भित्रे असतात. म्हणूनच नशिबावर देखील मात करण्याचे सामर्थ्य प्रयत्नांत असते हा महत्वाचा विचार शंभूराजांनी या श्लोकांत सांगितला आहे.
आदरणीय श्री संभाजीराव भिडे गुरुजींनी प्रयत्नांचे माहात्म्य अत्यंत समर्पक शब्दांत सांगितले आहे.

**दौर्बल्य टाका भजा यत्नदेव।**
**गांढ्याळ जे लोक भाजतात दैव।**
**प्रयत्नांती कोणासही प्राप्त ईश्वर।**
**प्रयत्नांती त्रैलोक्य आणू धरेवर।।**

**नसे दैववादी असे देवनिष्ठ।**
**नसे भोगवादी असे कर्मनिष्ठ।**
**यत्नाग्नींत जाळे सुखासीनतेला।**
**मराठा म्हणावे अशा वाघराला।।**

**बघे ना कदापि हि राशिभविष्य।**
**जगे पूर्णतः कर्मयोगी आयुष्य।**
**पूजे कर्मपुष्पांनी नारायणाला।**
**मराठा म्हणावे अशा वाघराला।।**

**प्रयत्नांती ईश्वर उरीं वज्रभाव।**
**स्वकर्मपुष्पांनी पूजे यत्नदेव।**
**मनामाजी ध्यातो भगिरथकुळाला।**
**मराठा म्हणावे अशा वाघराला।।**
**~गुरुवर्य श्री संभाजीराव भिडे**
मूळ श्लोक - सुभाषित रत्न भांडार/शार्ङ्गधर पद्धती

**श्लोक क्र ५९**
**लभेत सिकतासु तैलमपि यत्नत: पीडयन्।**
**पिबेच्च मृगतृष्णिकासु सलिलं पिपासार्दित:।**
**कदाचिदपि पर्यटञ्छशविषाणमासादयेन्न।**
**तु शृंगम् प्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत्।।**

अर्थ~एकवेळ प्रयत्नपूर्वक वाळूचे कण रगडले तर त्यांतून तेल देखील मिळेल. अत्यंत तहानलेल्या माणसाची तहान सुध्दा एकवेळ मृगजळाने शमेल. वनांत फिरता फिरता एकवेळ सशाचे शिंग देखील मिळेल. परंतु मूर्ख/हेकट अशा व्यक्तीचे समाधान करणे अथवा त्याचे मतपरिवर्तन करून त्यास सन्मार्गावर आचरण करावयाला प्रवृत्त करणे शक्य नाही.

वाळूपासून तेल गाळणे, मृगजळाने तृष्णा भागवणे अथवा सशाचे शिंग सापडणे या व्यवहारात अशक्य असलेल्या घटना एकवेळ संभव आहेत परंतु मूर्खांना उपदेश करून सन्मार्गाला लावणे अशक्य आहे असे या श्लोकात संभाजी महाराजांनी सांगितले आहे.

मूळ श्लोक भर्तृहरी कृत नीतीशतकांतील असून त्याचा वामन पंडित या मराठी कवीने पृथ्वी वृत्तांत सुंदर पद्यानुवाद केलेला आहे.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे।
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे।
सशाचेही लाभे, विपिनिं फिरता शृंगहि जरी।
परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी।।

~वामनपंडित

मूळ श्लोक - नीतिशतक/शार्ङ्गधर पद्धती

अशा तऱ्हेने श्रीमत् भृशबलान्वय(भोसलेवंशीय) शिरोमुकुटालंकार श्रीमत् शहाजी महाराजांचे सुपुत्र असलेल्या श्रीमत् शिवछत्रपतींचे सुपुत्र श्रीशंभुराज विरचित 'बुधभूषण' या ग्रंथातील 'प्रकीर्णनीती' हा तिसरा अध्याय खंडित अवस्थेमध्ये संपूर्ण झाला. इथून पुढील ग्रंथाचा भाग उपलब्ध नसल्याने हा ग्रंथ अनुवाद करून इथेच संपूर्ण झाला.

**।। जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।**

धर्मवीर श्री संभाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी लिहिलेला 'बुधभूषण' हा ग्रंथ अपूर्ण अवस्थेमध्येच उपलब्ध आहे. दुर्दैवाने प्रकीर्णनीती या तिसऱ्या अध्यायातील केवळ ५९ श्लोकच उपलब्ध आहेत. त्यामुळे या ग्रंथाचे मराठी निरूपण आज समाप्त होत आहे. धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांनी राजकारण शास्त्रावर लिहिलेला 'बुधभूषण' हा ग्रंथ आजच्या राजकीय नेत्यांनी अवश्य अभ्यासावा असाच आहे. जनहीताचे राजकारण कसे असावे याविषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन संभाजी महाराजांनी या ग्रंथात केले आहे. केवळ राजकीय क्षेत्रातील नव्हे तर सर्वसमान्य जनतेनेही आपल्या आयुष्यात आचरण करावे अशा उदात्त तत्वांचा अनमोल संग्रह म्हणजे हा ग्रंथ आहे.

धर्मवीर श्री संभाजी महाराजांचे विचार सर्व शिव-शंभू भक्तांपर्यंत पोहोचावे हाच या लिखाणामागील हेतू होता. धर्मवीर श्री शंभूराजांच्या कृपाशीर्वादाने त्यांच्याच एका अद्वितीय ग्रंथाचा अनुवाद माझ्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचला ही केवळ ईश्वरकृपा! वीस वर्षांपूर्वी आदरणीय श्री संभाजीराव भिडे गुरुजींच्या सहवासात आलो नसतो, तर असं काही करावं हा विचारही मनाला स्पर्शला नसता. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज या राष्ट्रोद्धारक मंत्रांचा साक्षात्कार गुरुजींच्या कृपेनेच झाला. म्हणूनच या ग्रंथाच्या निरूपणांत काही चांगले असेल तर ते केवळ गुरुजींच्या आशीर्वादामुळेच!

धर्मवीर श्री संभाजी महाराजांच्या धर्मनिष्ठ आणि राष्ट्रोद्धारक विचारांना आदर्श मानून देशासाठी जगण्याची दिशा यातून हिन्दु समाजाला मिळो हीच श्रीभवानीशंकाराच्या चरणीं प्रार्थना.

**नव्हती माझे बोल जाणा हा निर्धार।**
**मी आहें मजूर विठोबाचा।।**

**निर्धारा वचन सोडविलें माझ्या।**
**कृपाळूवें लज्जा राखियेली।।**

**निर्भर मानसीं झालों आनंदाचा।**
**गोडावली वाचा नामघोषें।**

**आतां भय माझें नासलें संसारी।**
**झालोंसें यावरी गगनाचा।।**

**तुका म्हणे हा तों संतांचा प्रसाद।**
**लाधलो आनंद प्रेमसुख।।**

**~जगद्गुरू तुकोबाराय**

**।। राष्ट्रांत निर्मू अवघ्या श्रीशिवसुर्यजाळं ।।**